
CMYK




सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, २० जुलै २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २५१ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघामध्ये कोणी आज येईल, कोणी उद्या येईल. आपले काम तत्त्वनिष्ठेवर आधारित असल्यामुळे जे आज आपले नाही, ते उद्या आपले होईल, हा विश्वास ठेवून संघकार्य वाढवले पाहिजे.

**श्रीगुरुजी**
रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक

# उत्तरप्रदेशात जिहादींचा उच्छाद

## धर्मांतरण घडविणारी आणखी एक टोळी उद्ध्वस्त

**आग्रा, १९ जुलै**

उत्तरप्रदेशात जिहादींनी उच्छाद मांडला असून धर्मांध छांगुर बाबाच्या टोळीनंतर आग्रा येथे धर्मांतरण करणारी आणखी एक टोळी उद्ध्वस्त करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी सहा राज्यांमध्ये छापेमारी करीत १० जणांना अटक केली, अशी माहिती पोलिस महासंचालक राजीव कृष्ण यांनी दिली. ही टोळी अल्पवयीन मुलींना 'लव्ह जिहाद'मध्ये अडकवून त्यांचे बळजबरीने धर्मांतरण करायची.

या टोळीची काम करण्याची पद्धत इसिस या दहशतवादी संघटनेसोबत जुळणारी आहे. या टोळीचा संबंध प्रतिबंधित एसडीपीआय आणि पाकिस्तानातील गुप्तचर संघटना आयएसआयसोबत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. दोन बहिणी बेपत्ता असल्याची एक तक्रार मार्चमध्ये आली होती. या प्रकरणाच्या तपासादरम्यान या टोळीचा सुगावा लागला. सहा राज्यांमध्ये ही टोळी पसरलेली असल्याचे सायबर सेलच्या मदतीने केलेल्या तपासात समोर आले. त्यानंतर पोलिसांनी ५० सदस्य असलेली पथके गोवासह कित्येक राज्यांत पाठवण्यात आली. या राज्यांमधून दहा जणांना अटक केली. या सर्वांची भूमिका वेगवेगळी होती.

त्यापैकी काही कायदेशीर मदत, काही जण मोबाईल फोन, तर काही सुरक्षित आश्रय उपलब्ध करून द्यायचे, अशी माहिती आग्राचे पोलिस आयुक्त दीपक कुमार यांनी दिली.

या टोळीने आतापर्यंत शेकडो जणांचे धर्मांतरण केले आहे. ही टोळी वेगवेगळ्या मॉड्युलमध्ये काम करायची. टोळीतील सदस्यांना निधी उभारणे, कट्टर बनवणे आणि सावज आढळ्यास त्यांना लपवून ठेवणे आदी कामे त्यांना वाटून देण्यात आली होती. अटक केलेल्या




आरोपींपैकी एका धर्मांतरण केलेल्या मुलीचे एके-४७ रायफलीसोबतचे छायाचित्रही समोर आले आहे.

**अमेरिका, कॅनडा व दुबईतून निधी**

या टोळीला अमेरिका, कॅनडा आणि दुबईतून निधी मिळाल्याचे पुरावे आढळले आहेत. टोळीचा संबंध प्रतिबंधित पीएफआय-एसडीपीआयसोबतच पाकिस्तानी दहशतवादी संघटनांसोबतही असावा, असा संशय पोलिसांना आहे. टोळीच्या सूत्रधाराला अटक करण्यात आली असून, तिचे पाळेमुळे खोदले जात असल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली. (वृत्तसंस्था)

| आरोपी | राज्य |
|---|---|
| आयशा (एसबी कृष्णा) | गोवा |
| अली हसन (शेखर रॉय) | कोलकाता |
| ओसामा | कोलकाता |
| रहमान कुरेशी | आग्रा |
| अब्बू रहमान | मुजफ्फरनगर |
| अबुर रहमान | डेहराडून |
| मोहम्मद अली | जयपूर |
| मुस्तफा | दिल्ली |
| मोहम्मद अली | जयपूर |

### छांगुरचे स्वित्झर्लंड कनेक्शन उघड



हिंदू मुलींच्या धर्मांतर करणारा छांगुर बाबाचे एक एक कारनामे पुढे येत असून त्याने जवळच्या सहकाऱ्यांच्या नावावर स्वित्झर्लंडमधील बँकेत खाती उघडली आहेत,असा खुलासा ईडीने केला आहे. छांगुरने धर्मपरिवर्तन करण्याच्या नावावर शारजा, दुबई आणि युएईमधून प्रचंड पैसा गोळा केला आहे. हा सर्व पैसा स्वीस बँकेत जमा केल्याचे ईडीने म्हटले आहे.

# सर्वोच्च न्यायालयात राज ठाकरेंविरुद्ध याचिका

### हिंदी भाषिकांविरुद्ध हिंसाचार भडकवण्याचा आरोप

**नवी दिल्ली, १९ जुलै**



मीरा भाईंदर येथे झालेल्या मनसेच्या सभेत पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हिंदी भाषिकांविरोधात आक्षेपार्ह टिप्पणी केल्याचा आरोप करीत वरिष्ठ वकील घनश्याम उपाध्याय यांनी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. यात त्यांनी हिंदी भाषिक लोकांविरुद्ध हिंसाचार भडकवण्याचा आरोप राज ठाकरे यांच्यावर केला आणि त्यांच्याविरोधात राष्ट्रीय सुरक्षा कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्याचा आदेश द्यावा अशी मागणी याचिकेत केली.

सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ वकील घनश्याम उपाध्याय यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की, महाराष्ट्रात भाषा वादावरून तणाव वाढवण्यात कथित सहभागाबाबत राज ठाकरे आणि त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा नोंदवण्याची जनहित याचिकेत केली आहे. ठाणे जिल्ह्यातील मिरा भाईंदरमधील जाहीर सभेत परप्रांतियांना मराठी शिका, नीट व्यापार करा, मस्ती दाखवलीत तर दणका बसणार असा इशारा देत महाराष्ट्रातील नागरिकांना भडकवणारी भाषा वापरली. राज ठाकरे हिंदी भाषिक लोकांविरुद्ध हिंसाचार भडकवण्याचा आणि द्वेष पसरवण्याचा प्रयत्न करीत असून यामुळे दगंलीसारखी परिस्थिती महाराष्ट्रात उद्‌भवू शकते. महाराष्ट्रात भाषा वादावरून तणाव वाढवण्यात त्यांचा सहभाग असल्याचे याचिकेत नमूद केले आहे. याप्रकरणी त्यांच्यावर आणि मनसे पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश द्यावे, अशी मागणी याचिकेत केली आहे.

**परप्रांतीयांना मारहाण, कायद्याचे उल्लंघन**

भाषेच्या मुद्द्यांवरून मनसे कार्यकर्त्यांनी काही परप्रांतियांना मारहाण केल्याची घटना घडली होती. विशेषतः मराठी न बोलणाऱ्यांना लक्ष्य केल्याच्या घटना घडल्या. हा प्रकार कायद्याचे उल्लंघन असून यासाठी राज ठाकरे जबाबदार असताना त्यांच्यावर कारवाई झालेली नाही असा उल्लेख याचिकेत करण्यात आला. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### पाकिस्तानमध्ये नऊ दहशतवादी ठार

**पेशावर** : शनिवारी खैबर पख्तूनख्वा प्रांतात पोलिस आणि सुरक्षा दलांनी केलेल्या संयुक्त कारवाईत नऊ दहशतवादी ठार झाले आणि पाकिस्तानी लष्कराच्या एका अधिकाऱ्यासह तीन अधिकारी जखमी झाले. हांगू जिल्ह्यातील शिनावारी जरगरी भागात दहशतवाद्यांच्या उपस्थितीबद्दल विश्वासार्ह गुप्त माहिती मिळाल्यानंतर सुरू केलेल्या कारवाईत दोन पोलिस अधिकारी आणि एक मेजर रँक लष्करी अधिकारी जखमी झाले. सुरू असलेल्या या कारवाईत आतापर्यंत नऊ दहशतवादी मारले गेले आहेत. सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांवर पूर्ण प्रमाणात हल्ला करत ही कारवाई सुरूच आहे, असे पोलिस उपमहानिरीक्षक अब्बास मजीद मारवत यांनी सांगितले. जखमींना वैद्यकीय उपचारांसाठी रुग्णालयात हलवण्यात आले आहे, जिथे त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे वृत्त आहे. संघीय गृहमंत्री सय्यद मोहसीन नक्वी यांनी जखमी जवानांशी दूरध्वनीवरून संवाद साधला आणि त्यांच्या शौर्याचे कौतुक केले.

# तपास प्रक्रियेत आढळल्या त्रुटी

### सुपेकरांवर कारवाईची शिफारस

**पुणे, १९ जुलै**



वैष्णवी हगवणे यांच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी विधिमंडळाच्या महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीने प्रथम अहवाल सादर केला आहे. या अहवालात तपास प्रक्रियेत त्रुटी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. हा प्रकार केवळ आत्महत्येचा नसून, हे प्रकरण कौटुंबिक अत्याचार, हुंडाबळी व अमानुष छळाचे असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे. यामुळे तपासाची दिशा बदलून संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करावी, अशी शिफारस करण्यात आली आहे.

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सरकारच्या वतीने आमदार मोनिका राजळे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती.

समितीच्या निरीक्षणानुसार, वैष्णवी यांच्यावर पती व सासरच्या लोकांकडून सातत्याने छळ, मारहाण व मानसिक अत्याचार करण्यात येत होता. यासोबतच हुंड्याच्या माध्यमातून ब्रँडेड गाडी, चांदीची भांडी, दागिने व रोख रक्कम घेतल्याचे ठोस पुरावे समितीपुढे सादर करण्यात आले आहेत. (वृत्तसंस्था)

### बंगळुरु विमानतळावर प्रवाशाकडून ४० कोटींचे अंमली पदार्थ जप्त

**नवी दिल्ली** : डीआरआय अधिकाऱ्यांनी बंगळुरू आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका प्रवाशाकडून ४० कोटी रुपये किमतीचे ४ किलोपेक्षा जास्त अंमली पदार्थ जप्त केले आहे व त्या प्रवाशाला अटक करण्यात आली आहे, असे महसूल गुप्तचर संचालनालय (डीआरआय) बंगळुरू क्षेत्र विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी १८ जुलै रोजी दोहाहून बंगळुरू आंतरराष्ट्रीय विमानतळावर आलेल्या एका भारतीय पुरुष प्रवाशाला रोखले. या प्रवाशाकडे जड असलेले दोन सुपरहिरो कॉमिक्स/मॅगझिन होते. अधिकाऱ्यांनी मासिकांच्या कव्हरसाईडमध्ये लपवून ठेवलेली पांढरी पावडर जप्त केली. पावडरमध्ये कोकेन असल्याचे आढळून आले. जप्त केलेले कोकेन ४,००६ ग्रॅम वजनाचे आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील सुमारे ४० कोटी रुपये मूल्याचे होते, असे मंत्रालयाने म्हटले आहे.

# बिहारमध्ये ३६.८६ लाख मतदार गायब!

### निवडणूक आयोगाची माहिती

**पाटणा, १९ जुलै**

बिहारमध्ये आगामी विधानसभा निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर सुरू करण्यात आलेल्या विशेष मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेत राज्यातील ९०.१२ टक्के मतदारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत, अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली. मात्र, यामध्ये ३६.८६ लाख मतदार गहाळ, मृत किंवा कायमस्वरूपी स्थलांतरित असल्याचेही आढळले आहे.

या विशेष पुनरीक्षणाची सुरुवात २५ जून रोजी झाली होती. आयोगाने २४ जून रोजी आदेश जारी केल्यानंतर लगेचच बिहारमध्ये ही प्रक्रिया सुरू झाली. राज्यातील सुमारे ७.८ कोटी नोंदणीकृत मतदारांना मतदार यादीत नावाची पुष्टी करण्यासाठी फॉर्म भरून देण्याचे आवाहन करण्यात आले होते. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, आतापर्यंत ७.११ कोटी अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ६.८५ कोटी अर्ज डिजिटल स्वरूपात प्रक्रियेत आणण्यात आले आहेत.

त्यात ३६.८६ लाख मतदार (सुमारे ४.६७ टक्के) मृत, स्थलांतरित किंवा एकापेक्षा जास्त ठिकाणी नोंदणीकृत असल्याचे दिसून आले आहे. ६,९७८ मतदार (०.०१ टक्के ) शोधता न येणार असल्याचेही नोंदवले गेले आहे. १ ऑगस्ट ते १ सप्टेंबर दरम्यान मसुदा यादीवर हरकती व दावे सादर करता येतील. निवडणूक नोंदणी अधिकारी २५ सप्टेंबरपर्यंत या हरकतींचा निपटारा करतील. ३० सप्टेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित केली जाईल. (वृत्तसंस्था)




### राजकीय पक्षांना यादी मोफत

प्रिंट व डिजिटल स्वरूपात अंतिम मतदार यादी सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना मोफत दिली जाणार असून, ती निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावरही उपलब्ध असेल.

### बुथ एजंटांना दररोज ५० अर्जांची परवानगी

प्रत्येक बुथ लेव्हल एजंटला (बीएलए) दररोज ५० अर्ज सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे. सुमारे १.५ लाखांहून अधिक एजंट हे काम करीत आहेत. यामुळे एकही पात्र मतदारयादीतून वगळला जाणार नाही, याकडे आयोग लक्ष देत आहे. ही मोहीम फक्त बिहारपुरती मर्यादित नसून, संपूर्ण देशभरात अशीच सघन मतदार यादी पुनरीक्षण मोहीम टप्प्याटप्प्याने राबवली जाणार असल्याचे संकेत आयोगाने दिले आहेत.

## बनावट लोणी जप्त, तिघांना अटक

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यातील एका गोदामावर छापा टाकल्यानंतर स्थानिक पोलिसांच्या सहाय्याने अन्न आणि औषध प्रशासनाने बनावट लोण्याचा साठा जप्त केला. यात तीन जणांना अटक केली, असे एका अधिकाऱ्याने शनिवारी सांगितले. एका गुप्त माहितीच्या आधारे, एफडीए आणि पोलिसांनी शुक्रवारी भिवंडीतील कासिमपुरा परिसरातील एका गोदामावर संयुक्तपणे छापा टाकला. भेसळयुक्त बटर तयार करीत असताना आरोपी जिशान मुस्तक अन्सारी, मोहम्मद मुसद्दीर मोहम्मद अक्रम शेख आणि एस. संजय यांना अटक करण्यात आली आणि १.१३ लाख रुपयांच्या बनावट बटर आणि इतर वस्तूंचा संपूर्ण साठा जप्त करण्यात आला. उत्पादन आणि साठवणुकीसाठी वापरण्यात येणारे गोदाम घटनास्थळीच सील करण्यात आले, असे त्यांनी सांगितले.



गणरायाच्या आगमनाला अजून एका महिन्यापेक्षा जास्त कालावधी असला तरी मुंबईत मात्र गणेशाच्या स्वागताची तयारी सुरू झाली आहे. परळ भागातील एका गणेश मंडळाची तयार झालेली भव्य आणि देखणी गणेशमूर्ती वाजतगाजत मंडपस्थळी आणताना गणेशभक्त. आता महिनाभर मंडप आणि परिसर सुशोभीकरणाचे काम चालणार आहे.

### रानडुकराच्या हल्ल्यात शेतमजूर जखमी

**अकोला, १९ जुलै**

येथील कुंभारी परिसरात रानडुकरांचा उपद्रव वाढला असून, १७ जुलै रोजी सायंकाळी शेतात रखवाली करीत असताना श्रीकांत वासुदेव थुंकेकर या शेतमजुरावर रानडुकराने हल्ला केला. यात थुंकेकर जखमी झाले असून, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.या घटनेमुळे कुंभारी परिसरातील शेतकऱ्यांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे. वाढत्या रानडुकरांच्या हल्ल्यामुळे शेतीत काम करणे धोक्याचे बनले असल्याची भावना व्यक्त होत आहे. वनविभागाने तत्काळ या रानडुकरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी जोर धरत आहे. (तभा वृत्तसेवा)

# हरयाणातील विद्यार्थी शिकतील गीतेचे श्लोक

### नैतिक मूल्ये आणि नेतृत्वक्षमता विकासाचा उद्देश



### प्रार्थना सभेत अनिवार्य

**नवी दिल्ली, १९ जुलै**

शिक्षणात भारतीय परंपरा आणि आध्यात्मिक मूल्यांचा समावेश करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलत, हरियाणा सरकारने राज्यातील सर्व शाळांमध्ये श्रीमद्भगवद्गीतेचे श्लोक वाचन सकाळच्या प्रार्थना सभेत अनिवार्य केले आहे. या निर्णयाची अंमलबजावणी १७ जुलैपासून झाली आहे. यामुळे राज्यातील सरकारी आणि खाजगी दोन्ही प्रकारच्या शाळांमध्ये दररोज एका श्लोकाचे पठण केले जाईल. रियाणा शालेय शिक्षण मंडळाने यासाठी सर्व शाळांना सूचना जारी केल्या आहेत.

अध्यात्म, नैतिक मूल्ये आणि विद्यार्थ्यांमधील नेतृत्व क्षमता विकसित करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे. या उपक्रमाचा औपचारिक शुभारंभ भिवानी येथील सर्वपल्ली राधाकृष्णन लॅब स्कूलमध्ये मंडळाचे अध्यक्ष डॉ. पवन कुमार यांच्या उपस्थितीत झाला. ते म्हणाले, विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. गीतेमधील तत्वज्ञान त्यांना आत्मसंयम, नैतिकता, विचारशक्ती आणि नेतृत्वाचे धडे देऊ शकते. शाळांमध्ये गीतेचे श्लोक वाचन केवळ धार्मिक उपक्रम नसून विद्यार्थ्यांच्या चारित्र्य विकासासाठी उपयुक्त आहे. हरियाणा मंडळाच्या निर्णयानुसार, शाळांमध्ये श्लोकाचे अर्थासह प्रदर्शन सूचना फलकावर करण्यात येईल आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्याचा भावार्थ समजावून सांगावा. यामुळे गीतेतील श्लोकांचा अर्थ केवळ वाचनापुरता मर्यादित न राहता तो आचरणात उतरवण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळेल. (वृत्तसंस्था)

### गीतेमध्ये मार्गदर्शन करणारी तत्त्वे

या उपक्रमाला अनेक आध्यात्मिक संघटनांचा तसेच गीता अभ्यासक स्वामी ज्ञानानंद महाराज यांचा पाठिंबा मिळाला आहे. ते म्हणाले, गीता हे पुस्तक केवळ धार्मिक ग्रंथ नसून, त्यात जीवनातील प्रत्येक समस्येवर मार्गदर्शन करणारी तत्वे आहेत.

# चंद्रभागा नदीत बुडून तीन महिला भाविकांचा मृत्यू

### विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनाची आस राहिली अधुरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ जुलै-**

विठ्ठलरुक्मिणीच्या दर्शनासाठी आलेल्या तीन महिला भाविकांचा चंद्रभागा नदी मध्ये बुडून दुर्दैवी मृत्यु झाला. ही घटना शनिवारी सकाळी सातच्या सुमारास घडली. या मधील दोन महिला भाविक जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील असून एका महिलेची ओळख पटलेली नाही.





दरम्यान विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी आलेल्या या महिला भाविकांची दर्शनाची आस मात्र अधुरीच राहिल्याच्या प्रतिक्रिया या महिलांचे मृतदेह पाण्याबाहेर काढल्या नंतर चंद्रभागेत स्नानासाठी आलेल्या अन्य महिला भाविकांतून आपसुकच उमटत होत्या. या दुर्दैवी घटनेची सविस्तर माहिती अशी की, विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शना अगोदर या तिनही महिला चंद्रभागेच्या स्नानासाठी शनिवारी सकाळी सातच्या सुमारास पाण्यात उतरल्या असता काळाने त्यांच्यावर घाला घातला. जालन्याच्या भोकरदन तालुक्यातील धावडा गावच्या दोन महिला भाविक आणि एक अनोळखी महिला भाविक शनिवारी सकाळी चंद्रभागा नदीच्या काठावरील पुंडलिक मंदिरा जवळ स्नानासाठी पाण्यात उतरल्या होत्या. मात्र त्यांना पाण्याचा अंदाज आला नसल्याने तिघीही पाण्यात बुडाल्या. काही भाविकांच्या ही गोष्ट लक्षात येताच त्यांनी आरडाओरडा करुन या महिलांना वाचविण्याचा प्रयत्न देखील केला. मात्र पाण्याचा प्रवाह वेगात असल्याने तिन्हीही महिला बुडाल्या. सुनीता सपकाळ (वय ४३) आणि संगीता सपकाळे (वय ४0) या दोन महिला भोकरदन तालुक्यातील धावडा गावच्या रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे.

● **उजनीच्या विसर्गामुळे चंद्रभागा वाहतेय दुथडी :** सध्या उजनी धरणातून भीमा नदी मध्ये पाण्याचा विसर्ग सुरु आहे. त्यामुळे येथील चंद्रभागा नदीच्या पाणी पातळी मध्ये कमालीची वाढ झालेली आहे. चंद्रभागा नदी सध्या दुथडी भरुन वाहते आहे. त्यामुळे या महिला भाविकांना चंद्रभागेतील पाण्याचा अंदाजच आला नाही. त्यामुळेच ही दुर्दैवी घटना घडली.

● **आपत्ती व्यवस्थापन विभागाचा दावा फोल :** पंढरपूर येथील प्रशासनाकडून चंद्रभागा नदीत आपत्कालीन परिस्थितीसाठी एक यांत्रिकी बोट आणि काही कर्मचारी दिल्याचा दावा करण्यात आलेला होता. पण प्रत्यक्षात नदीत कोणताही आपत्कालीन व्यवस्था उपलब्ध करण्यात आलीच नाही. दरम्यान शनिवारी सकाळी स्थानिक कोळी बांधवांनी या बुडालेल्या महिलांचे मृतदेह पाण्याबाहेर काढण्याचे काम केले.

● **वाळू उपश्यामुळे चंद्रभागेच्या पात्राची झाली चाळणी :** येथील चंद्रभागेच्या पात्रात अवैध वाळु उपसा राजरोसपणे सुरु आहे. चंद्रभागेच्या पात्रातून शहरात बांधकामासाठी लागणारी वाळू गाढवावरुन अवैध वाळू उपसा करुन पुरविली जाते. त्यामुळे चंद्रभागेच्या पात्राची या वाळु उपश्यामुळे अक्षरशः चाळणी झाली आहे. त्यामुळे महसूल प्रशासनाने वाळू उपश्याला लगाम लावला पाहिजे अशी मागणी भाविकांमधून केली जात आहे.

● **प्रशासन गाफिल राहिल्यानेच घटना :** चंद्रभागेच्या पात्रात उजनी धरणातून पाण्याचा विसर्ग केला जात आहे याची माहिती स्थानिक प्रशासनाला देण्यात आलेली आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनाकडून चंद्रभागेच्या वाळवंटात खबरदारीच्या उपाय योजना करणे अपेक्षीत होत्या. मात्र चक्क स्थानिक प्रशासन गाफिल राहिले. चंद्रभागा नदी दुथडी भरुन वाहत असताना कोणताही पोलिस बंदोबस्त, यांत्रिकी बोट, सुरक्षारक्षक वाळवंटात तैनात करण्यात आलेले नव्हते. त्यामुळेच तीन महिला भाविकांना आपले प्राण गमवावे लागले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...

### विधानसभेवेळी आमच्यातील 'मी'पणा नडला : उध्दव ठाकरे

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ जुलै-**

लोकसभेच्या निवडणुका महाविकास आघाडीने 'आम्ही' म्हणून लढवल्याने यश मिळाले. पण विधानसभेवेळी तो जाऊन 'मी' पणा आल्याने आम्हाला मोठा फटका बसला, अशी प्रांजळ कबुली माजी मुख्यमंत्री व मविवा आघाडीचे उद्धव ठाकरे यांनी दिली आहे. अशा चुका पुन्हा होणार असल्यास एकत्र येण्यात काही अर्थ नसल्याचे त्यांनी सांगितले.

**पराभवाचे खापर 'मविआ'वर फोडले**

खा. संजय राऊत यांनी ठाकरे यांच्या घेतलेल्या दिर्घ मुलाखतीचा पहिला भाग 'सामना'मध्ये शनिवारी प्रसिद्ध झाला. त्यामध्ये त्यांनी राज्यातील सध्य परिस्थिती, ठाकरे ब्रँड, राज ठाकरे सोबतची युती याबाबत सविस्तर मते मांडली. 'मविआ' बाबत केलेल्या विधानामुळे त्यांच्यात सारे काही आलबेल नसल्याचे स्पष्ट झाले आहे. लोकसभेतील मोठया यशानंतर विधानसभेतील दारुण पराभवाबाबत विचारणा केली असता ते म्हणाले,' ईव्हीएमच्या घोटाळ्याची चर्चा सुरू आहे. मतदार याद्यांवर त्याच्याबद्दलही चर्चा आहे. बोगस मतदार, मतदार कसे वाढले हे लोकांसमोर आले आहे. मतदारसंघ छोटा होतो तसतशी स्पर्धा वाढते. आघाडीत दोन तीन पक्ष एकत्र आल्यावर खेचाखेची सुरू होते. युतीतही होत होती. आम्ही महाविकास आघाडी म्हणून लोकसभेची पहिली निवडणूक लढवली. त्यावेळीही शिवसेनेने जिंकलेले मतदारसंघ सोडले. विधानसभेत शेवटपर्यंत खेचाखेची सुरू होती. त्याचा दुष्परिणाम असा झाला की जनतेला वाटले यांच्यात आताच खेचाखेची आहे तर नंतर काय होईल?, लोकसभेत माझ्याकडे उमेदवार होते, जागा होती, पण निशाणी नव्हती. विधानसभेत निशाणी होती, पण जागा नव्हत्या. जागा कोणत्या हा प्रश्न होता. जागा मिळाल्या तर उमेदवारी कुणाला देणार हे निश्चित नव्हते. तू तू मै मै झाली ती स्वीकारली पाहिजे. आपल्याकडून झालेली ही सर्वात मोठी चूक होती. ही चूक परत करायची असेल तर एकत्र येण्याला काही अर्थ राहत नाही. असे सांगून ते म्हणाले,'लोकसभेत महाविकास आघाडीत नेत्यापासून कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांमध्ये आपल्याला जिंकायचे आहे, हा आपलेपणा होता. विधानसभेत नाही नाही मला जिंकायचे आहे. हा आपल्यातून मी पणा आला तेव्हा पराभव झाला. त्याचबरोबर ज्या तांत्रिक बाबी होत्या, त्या कारणीभूत ठरल्याचे त्यांनी सांगितले. माहिती सरकार बद्दल बोलताना ते म्हणाले की,'गेल्या काही दिवसांपासून सत्तेचा माज दिसत आहे, आपण आधी आमदाराची बॉक्सिंग पाहिली, विधिमंडळाच्या आवारात हाणामारी झाली. महाराष्ट्राला शरमेने मान खाली घालावी लागेल अशा या घटना आहेत.विधिमंडळात किंवा विधानभवन परिसरात गुंडागर्दी होत असेल तर राज्यात राष्ट्रपती राजवट लावण्यासारखी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे' 'सर्व पक्षांनी एकत्र बसून पक्षातील गुंडांना पदावरून हटवलं पाहिजे. विधीमंडळ परिसरात असा राडा होत असेल तर देशामध्ये राज्याची प्रतिमा काय झाली असेल? याआधी असं कधी घडलं नव्हत. लोकशाहीचा खून करणारे असेल लोक विधिमंडळात वावरायला लागले तर जनतेने काय करायचं?' मनसेसोबतच्या युतीवर बोलताना ठाकरे म्हणाले की, वीस वर्षांनंतर आम्ही पहिल्यांदाच एका व्यासपीठावर आलो, पहिल्यांदा मराठीच्या विषयावर एकत्र आलेलो आहोत.



### हिराचंद नेमचंद महाविद्यालयाची सीएसईईटी परीक्षेत कामगिरी

**सोलापूर, दि. १९ जुलै-**

कंपनी सेक्रेटरी एक्झिक्युटिव्ह (सीएसईईटी) प्रवेशपरीक्षेचा निकाल जाहीर झाला असून हिराचंद नेमचंद महाविद्यालयाच्या १६ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे. या परीक्षेत शाद मुट्टवल्ली याने २०० पैकी १८३ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यानंतर कृष्णा अतनूर (१७८), वैष्णवी मोरे (१७६), सनत झमवर (१७२), अभिनव पोलास (१६७), तनिष्का दुस्तकर, (१६६), प्रीतम बोगा (१५६), अमृता ढगे (१५६), धनश्री जिल्ला (१५५), सुष्मिता महिंद्रकर (१५४), रिया दुसटकर (१४७), अभिषेक भीमनपल्ली (१४४), राणी दोडमिसे (१३३), वृंदा वनकुदरे (१२३), वृशाली वाले (११७) आणि कुसुम अवतानी (११२) यांनी यश संपादन केले. या सर्व विद्यार्थ्यांचा महाविद्यालयातर्फे प्राचार्य डॉ. एस. के. शहा यांनी विशेष सत्कार केला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे समस्त विश्वस्त, ॲड. सोनाली वेद, डॉ. समीना रंगरेज सर्व प्राध्यापक, समन्वयिका सारिका महिंद्रकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्रियांका अंबुरे यांनी आभार मानले.

# अंतिम आठवडा प्रस्तावावरील उत्तरातून राज्याच्या पुढील वाटचालीची दिशा स्पष्ट

## पावसाळी अधिवेशनात १६ विधेयके मंजूर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ जुलै-**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकासह महत्त्वाची १६ विधेयके मंजूर करण्यात आली. तसेच अंतिम आठवडा प्रस्तावावरील उत्तरामध्ये महाराष्ट्राच्या पुढील वाटचालीची दिशा स्पष्ट केली आहे. सर्व निर्णय सामान्य जनतेच्या हितासाठी घेतले गेले असून, विकासाला वेग देण्याचे काम अधिवेशनात झाले असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केले.



महाराष्ट्र विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाची सांगता झाल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत अधिवेशनातील कामकाजाची माहिती दिली. फडणवीस यांनी सांगितले की, यंदा राज्यात ९० टक्के पावसाची नोंद झाली असून, काही भागांत पूरपरिस्थितीही उद्भवली आहे. अशा ठिकाणी एनडीआरएफ व एसडीआरएफच्या माध्यमातून मदत पोहोचवण्यात आली असून, नुकसानग्रस्तांसाठी पंचनामे सुरू झाले आहेत. ज्या ठिकाणी पंचनामे पूर्ण झाले तेथे निधी वितरण करण्यात येत आहे. राज्यातील मोठ्या धरणांमध्ये ६७ टक्के पाणीसाठा झाला आहे. अधिवेशनात एकूण १६ विधेयके मंजूर करण्यात आली. त्यामध्ये अनुसूचित जाती आणि जमाती आयोगांना वैधानिक दर्जा देणारी विधेयके, महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक, गौण खनिकर्म प्राधिकरण विधेयक, त्र्यंबकेश्वर-नाशिक कुंभमेळा प्राधिकरण विधेयक आणि मकोका कायद्यात अंमलपदार्थांचा समावेशासंबंधातील सुधारणा अशा अनेक महत्त्वाच्या विधेयकांचा समावेश होता. महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा लोकशाही मार्गाने तयार केला असून, कोणालाही थेट अटक करण्याचा अधिकार यामध्ये नाही. संस्थांवर बंदी घालण्यासाठी न्यायालयीन समितीची परवानगी आवश्यक आहे, असे सांगून ते म्हणाले की, पुरवणी मागण्यांतून मेट्रो प्रकल्प, महानगरपालिका, जिल्हा परिषद, तसेच पिण्याचे पाणी, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शिष्यवृत्ती योजना यांना भरघोस निधी वितरित करण्यात आला आहे. दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या भत्त्यांमध्ये १५०० रुपयांवरून २५०० रुपये करण्यात आला असून, शिक्षक टप्पा अनुदान देखील जाहीर करण्यात आले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.



छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ गडकोट युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाल्याची घोषणा हा महाराष्ट्रासाठी गौरवाचा क्षण आहे. मराठा समाजाच्या विकासासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला ७५० कोटींचा निधी देण्याचा निर्णय घेतला असून यातील पहिला टप्प्याच्या निधीची वितरण करण्यात आल्याची माहितीही यावेळी दिली. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेतले. विरोधी पक्षाच्या प्रत्येक प्रश्न, लक्षवेधीवर उत्तर देण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. याशिवाय अधिवेशनात झोपडपट्टी पुनर्विकास, क्लस्टर योजना, परवडणाऱ्या घरांची निर्मिती, महिलांसाठी वसतीगृह, पोलिस व गिरणी कामगारांसाठी घरांची कामगिरी यावरही महत्त्वाचे निर्णय घेतले आहे. मुंबईच्या झोपडपट्टी विकासाला चालना देण्यासाठी शासकीय यंत्रणा व खासगी क्षेत्रात संयुक्त उपक्रम राबवण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, या अधिवेशनात ५७ हजार ५०९ कोटींची पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या. अनेक चांगली कामे या अधिवेशनात झाली आहे. यापूर्वी पेक्षा यंदा मोठ्या प्रमाणात अर्धातास चर्चा व लक्षवेधी सूचनांवर चर्चा झाली. रात्रभर तयारी करून अधिकाऱ्यांनी लक्षवेधी प्रश्नांची उत्तरं दिली. एकेका दिवशी २५-३० लक्षवेधी मांडल्या गेल्या, जे अभूतपूर्व होते.

## भाऊ म्हणून शाळेतून नेले अल्पवयीन मुलीला, त्यानंतर केला अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ जुलै -**

आजारी असल्याचे शिक्षकाला सांगून अल्पवयीन मुलीला शाळेतून नेऊन अत्याचार केल्याप्रकरणी एकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार एक जानेवारी ते १८ जुलै यादरम्यान घडला. शाळेतील शिक्षकांना भाऊ असल्याचे सांगून आरोपीने मुलीला शाळे-तून नेल्याचा प्रकार समोर आला आहे.



याबाबत पीडितेच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरून चेतन सोमा (रा. सोलापूर) विरूध्द जोडभावी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी हा जानेवारी महिन्यात पीडितेचा पाठलाग करत होता. त्यावेळी पीडितेने याबाबत आईला सांगितले होते. त्यावर पीडितेच्या आईने आरोपीच्या भावाला बोलावून झाला प्रकार सांगितला होता. याबाबत त्याने त्याची बहिणीला आरोपी करत असलेल्या प्रकाराबाबत माहिती दिली होती.

दरम्यान १८ जुलै रोजी दुपारी दोनच्या सुमारास आरोपी पीडिता शिक्षण घेत असलेल्या शाळेत गेला. त्याने पीडितेची प्रकृती ठिक नसल्याचे शिक्षकाला सांगितले. त्यांनी तशी चौकशी पीडितेकडे केली. तेव्हा पीडितेनेही तब्येत ठिक नसल्याचे शिक्षिकेला सांगितले. यानंतर आरोपी पीडितेला घेऊन तेथून बाहेर पडला. याबाबत शिक्षिकेने पीडितेच्या वडीलांना फोन करून घडला प्रकार सांगितला. पीडितेची वडील आणि आई यांना तिची चौकशी केली. परंतु मिळून आली नसल्याने आरोपीने तिला कोठे तरी नेल्याची त्यांची खात्री झाली. सायंकाळी पाचच्या सुमारास पीडिता घरी आली तेव्हा तिने आरोपीने शाळेत येऊन आरोपी घेऊन गेला आणि त्याने जबरदस्तीने अत्याचार केल्याचे सांगितल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. महिला पोलिस निरीक्षक शबनम शेख या गुन्ह्याचा तपास करत आहेत.

## जनसुरक्षा विधेयकाबाबतीत सरकारने विरोधी पक्षाची फसवणूक केली : पाटील

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१९ जुलै:-**

दुर्दैवाने सध्या काही आमदारांचा सहवास गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांबरोबर जास्त वाढलेला आहे. आमदारांचे जे समर्थक गुन्हेगार आहेत ते एवढे शिरजोर होतात की ते आमदारांच्या अगोदर आत येतात. विधिमंडळातील हे माझे छत्तीसावे वर्ष आहे. या ३६-३७ वर्षांमध्ये मी यापूर्वी कधीही अपप्रवृत्तीच्या व्यक्ती सभागृहात किंवा आवारात आलेल्या पाहिलेल्या नाहीत अशी खंत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे विधिमंडळ पक्षनेते जयंत पाटील शुक्रवारी व्यक्त केली. जन सुरक्षा विधेयकामध्ये आम्ही सुचविलेल्या बऱ्याच सुचना त्यांनी विधेयकात घेतल्या नाहीत. सरकारने एकाप्रकारे विरोधी पक्षाची फसवणूक केली, असा आरोपही त्यांनी यावेळी केला. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे आज सूप वाजले. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी गटनेते जितेंद्र आव्हाड यांच्यासह पत्रकार परिषदेला संबोधित करताना सरकारवर जोरदार हल्ला चढवला.



पाटील म्हणाले की, जन सुरक्षा विधेयकाच्या बाबतीत आम्ही संयुक्त समितीत असताना काही सुचना केल्या होत्या. त्यांची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन सरकारने दिले होते. पण ज्या दिवशी बिल सभागृहाच्या समोर आले. त्यावेळी कमिट केलेला गोष्टी विधेयकात नव्हत्या. आम्ही सांगितलेले तीन ते चार मुद्दे त्यांनी मंजूर केले पण आम्ही सांगितलेल्या बऱ्याच सुचना त्यांनी विधेयकात घेतल्या नाहीत. सरकारने एकाप्रकारे विरोधी पक्षाची फसवणूक केली आहे.आज आम्ही राज्यपालांची भेट घेऊन जे मुद्दे शंकास्पद आहे ते राज्यपाल महोदयांना कळवले तसेच हा विधेयकावर पुनर्विचार करण्याची विनंती केली आहे, असे सांगून ते म्हणाले, महाविकास आघाडी सरकारच्या काळात, उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना आम्ही कर्जमाफी दिली ती काही समिती नेमून आम्ही केली नव्हती. अधिकारी नेमून वेळकाढूपणा करणे म्हणजे शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणे आहे.

# महायुती काळात सरकारवरील कर्जात वाढ

## जनतेच्या प्रश्नांवर सरकारने पळ काढला

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंचा आरोप

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ जुलै-**

सरकारवर आधी ९ लाख १२ हजार कोटी रुपयांचे कर्ज होते ते आता १० लाख कोटीच्या वर गेले आहे. अंतिम आठवडा प्रस्तावावर उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर उत्तर देण्याऐवजी सभागृहात बाहेरील मुद्दे सत्ताधार्यांनी मांडून जनतेच्या प्रश्नांपासून पळ काढला, असा आरोप विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शुक्रवारी केला.

अधिवेशनाचे सूप वाजल्यानंतर दानवे यांनी पत्रकार परिषदेत म्हणाले की,बोगस बियांचे मोठे प्रकार घडले असताना त्याबाबत कोणताही कायदा आणलेला नाही. या अधिवेशनात बऱ्याच मंत्र्यांनी टाईमपास केला आहे.जनतेच्या आणि महाराष्ट्राच्या विरोधातील हे सरकार कार्यभार चालविण्यास अपयशी ठरल्याचा आरोपही दानवे यांनी केला.



पावसाळी अधिवेशनात विरोधी पक्षनेता म्हणून मुंबईचे गिरणी कामगार, शिक्षकांचे प्रश्न,कायदा सुव्यवस्था भ्रष्टाचार, शालार्थ आयडी घोटाळा आदी मुद्द्यांवर सभागृहात आवाज उठविला. शक्तीपीठ महामार्ग, हिंदी सक्ती, मेघा इंजिनिअरिंगचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला मात्र सरकारने खुलासा केला नसल्याबाबत दानवे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. सत्तेतील आमदारांनी वारकऱ्यांना नक्षलवादी ठरवले. जलजिवन मिशन योजनेचा निधी अद्याप दिला नाही. उत्पादन शुल्क विभागामार्फत ३२८ परवाने देण्यात येणार आहे. १९७२ पासून सत्ताधारी आमदारांना परवाने देण्याचे बंद होते ते आता सरकारच्या काळात सुरू होणार आहे. कॅन्टीन मध्ये चड्डी बनियान गँगने आंदोलन केले. सत्ताधारी आमदार गावोगावी गोंधळ घालत आहे.जिथे कायदे बनवले जातात ते लोकशाहीचे मंदिर असलेल्या विधानभवनात कायदा मोडला गेल्याबाबत दानवे यांनी सरकारवर ताशेरे ओढले. सरकार अनेक योजनांच्या नावाखाली उधळपट्टी करत आहे. कमीत कमी महिला लाडकी बहीण योजनेअंतर्गत याव्यात, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही दानवे यांनी केला. सत्ताधारी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नावाने आरती करण्याचे काम करत होते. राज्यात दुबार पेरणी व तीबर पेरण्याची संकट आले असताना सत्ताधारी यांनी राजकीय भाषण केले. निधी अभावी विकास कामांचे कंत्राट बंद पडले आहे.

# शेतकऱ्यांना मिनी ट्रॅक्टर खरेदीसाठी मिळणार अनुदान

## 30 जुलैपर्यंत अर्ज करण्यास मुदत

**सोलापूर, दि. १९ जुलै-**

सामाजिक न्याय विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरवठा करण्यासाठी योजना सुरु करण्यात आली आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना ३० जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहे, अशी माहिती समाज कल्याणचे सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी दिली. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्यांसाठी ही योजना असून, मिनी ट्रॅक्टर व त्यांची उपसाधने याची खरेदीचे कमाल मर्यादा ३.५० लाख इतकी आहे. स्वयंसहाय्यता बचत गटांनी वरील कमाल मर्यादेच्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष साधनाच्य किंमतीच्या १० टक्के स्वहिस्स भरल्यानंतर प्रत्यक्ष किंमतीच्या ९० टक्के म्हणजे कमाल ३.१५ लाख शासकीय अनुदान मिळणार आहे. लाभार्थी ३५ हजार रुपयाचा स्वहिस्सा भरल्यानंतर या योजनेचा लाभ घेता येणार आहे. बचत गटातील ८० टक्के सदस्य हे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील आणि अध्यक्ष व सचिव हे अनुसूचित जातीचे असणे आवश्यक आहे. सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र व डोमासिएल प्रमाणपत्र जोडावे लागणार आहे. अर्जासाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सात रस्ता, सोलापूर या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करावे.

# राज्यातील महत्वाकांक्षी पायाभूत प्रकल्पांना गती; गुन्हेगारीवर लगाम

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १९ जुलै-**

महाराष्ट्रातील विविध महत्वाकांक्षी पायाभूत प्रकल्पांना गती देण्यात येत असून मेट्रो, विमानतळ, रेल्वे, टनेल, सी-लिंक आणि कॉरिडॉर यांसारख्या प्रकल्पांना वेगाने चालना देण्यात येत आहे. आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करून शहरी आणि ग्रामीण विकास अधिक गतिमान केला जात आहे. तसेच, गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यात आली आहे.

सुरक्षिततेपासून विकासापर्यंत महाराष्ट्राच्या विकासाची वाटचाल सुरू आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत सांगितले.

विधानसभेत म.वि.स.नियम २९२अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले, राज्यात २०२३ च्या तुलनेत यावर्षी तब्बल ११ हजार ६५९ गुन्ह्यांत घट झाली असून, गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण कमी झाले आहे. सायबर गुन्ह्यांमध्ये उघडकीस येण्याचे प्रमाण १६ टक्क्यांवरून १९ टक्क्यांवर पोचले आहे. आर्थिक फसवणुकीतील परत मिळणाऱ्या रकमेचे प्रमाण २०.७५ टक्क्यांवरून ६१ टक्क्यांवर आले आहे. 'गोल्डन अवर'मध्ये माहिती मिळाल्यास ९० टक्के प्रकरणांत पैसे वाचवता येतात. सायबर सुरक्षेसाठी 'सायबर कॉर्पोरेशन' स्थापन करण्यात आले असून जिल्ह्यांत ५० सायबर प्रयोगशाळा सुरु करण्यात आल्या आहेत. महिला अत्याचाराच्या घटनेतील ९१ टक्के प्रकरणे उघडकीस आणण्यात यश आले आहे, बलात्काराच्या घटनेत ९८ टक्के आरोपींची ओळख पटली आहे. तसेच बलात्कार प्रकरणांत ६० दिवसांत निर्णय होण्याचे प्रमाणही ९७.३ टक्क्यांपर्यत वाढले आहे.

ते म्हणाले,' उपनगरीय रेल्वेला दरवाजे नसल्याने दुर्दैवी दुर्घटना घडत आहेत. यावर उपाययोजना म्हणून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री यांच्याकडे मेट्रोसारखे डबे उपनगरीय रेल्वेला द्यावे, अशी मागणी केली आहे. या संदर्भात सकारात्मक निर्णय झाला असून याची लवकरच घोषणा केली जाईल. त्यामुळे प्रवाशांना मुंबईतील उपनगरीय रेल्वेचे सर्व डबे मेट्रोसारखे एसी आणि दरवाजे बंद असणारे उपलब्ध होणार आहेत. यामध्ये तिकीटदर न वाढवता प्रवाशांना ही सेवा उपलब्ध होणार आहे. अंमली पदार्थाच्या विरोधात राज्यशासनाने कारवाईची कडक भूमिका घेतली आहे. २०१८ अखेरीस १५६८ आरोपींना अटक करण्यात आली होती, तर २०२५ अखेरीस ही संख्या वाढून २१९८ झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक पोलिस ठाण्यात आता नार्कोटिक्ससाठी स्वतंत्र सेल स्थापन करण्यात आले आहेत. अंमली पदार्थ प्रकरणांमध्ये जे अधिकारी थेट किंवा अप्रत्यक्षपणे गुंतलेले आढळतील, त्यांचे केवळ निलंबन न करता आता थेट बडतर्फीची कारवाई करण्यात येणार आहे. विधानभवन लोकप्रतिनिधींच्या, मंत्र्यांच्या, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या मालकीची नाही, ही विधानसभा महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेच्या मालकीची आहे. अधिवेशनात काळात जी घटना घडली ती सर्वांच्या मनाला वेदना देणारी आहे. विधानसभेतून समाजाला दिशा देण्याचे काम झाले पाहिजे.लोकप्रतिनिधींनी याविषयी चिंतन करण्याची गरज आहे. निवडून आल्यानंतर आपण सर्वांनी संसदीय परंपरांचे, संसदीय भाषेचे पालन व सातत्यपूर्ण संवाद या त्रिसूत्रीचे पालन केले पाहिजे.

धारावी पुर्नविकास प्रकल्पात झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन धारावीमध्येच केले जाणार आहे आणि उद्योजकांना त्याच ठिकाणी सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे. कोणतीही जमीन अदानींना देण्यात आलेली नाही, ही जमीन 'डीआरपी'ला देण्यात आली आहे. यामध्ये छोट्या उद्योजकांना उत्तम व्यवस्था निर्माण करुन संघटित क्षेत्रात आणणार आहे. तसेच टॅक्ससाठी पुढील पाच वर्ष टॅक्स हॉलिडे देण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांसाठी 'हरित वीज क्रांती

शेतकऱ्यांना 'हरित वीज' (ग्रीन एनर्जी) पुरवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. या निर्णयामुळे राज्याला वीज खरेदीत १० हजार कोटी रुपयांची बचत होणार आहे. राज्याच्या शाश्वत विकासासाठी 'ब्लू प्रिंट' तयार करण्यात आली असून, सध्या ५० टक्के वीज हरित स्रोतांतून निर्माण होते. पुढील पाच वर्षांत विजेचे दर कमी होतील. पीएम कुसुम योजनेअंतर्गत राज्यात ६० टक्के कृषी पंप बसविले आहेत तीन महिन्यात ३ लाख ८६ हजार कृषी पंप बसवण्यात आले आहेत.यामुळे २३ लाख एकर जमीन ओलिताखाली आली आहे. प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजनेंतर्गत घराच्या छतावर 'सोलर रूफ टॉप' यंत्रणा बसवण्यात येत आहे. या योजनेचा लाभ ३० लाख कुटुंबांना होणार असून वीजबिल भरावे लागणार नाही.

### व्यक्तीस्वातंत्र्याचे संरक्षण करणारा जनसुरक्षा कायदा

जनसुरक्षा कायद्यानुसार कोणत्याही व्यक्तीला थेट अटक करता येत नाही. व्यक्तीविरोधात अटकेची कारवाई करण्यासाठी ठोस आणि न्यायिकरित्या ग्राह्य धरता येणारे पुरावे आवश्यक असतात. तसेच, एखाद्या संघटनेवर बंदी घालायची असल्यासही ती कार्यवाही न्यायालयीन देखरेखीखाली होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान आणि लोकशाही तत्वांचे काटेकोर पालन करूनच महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा तयार करण्यात आला आहे.असे सांगून फडणवीस म्हणाले,' लोकप्रतिनिधींनी संसदीय परंपरा, संसदीय भाषा आणि संवाद ही त्रिसूत्री जपली पाहिजे.

## निधन वृत्त...

### शामराव बागल



**पंढरपूर, दि.१९ जुलै -**

तालुक्यातील गादेगाव येथील रहिवाशी असलेले, साताऱ्यातील रयत बँकेचे माजी संचालक व रयत शिक्षण संस्थेअंतर्गत असलेल्या पंढरपूर मधील यशवंत विद्यालयाचे सेवानिवृत्त वरिष्ठ लेखापाल शामराव रामचंद्र बागल (वय ६५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले सून व नातु असा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी गादेगाव मधील स्मशानभूमीमध्ये करण्यात आला.

### गोरख आटोळे



**सोलापूर, दि. १९ जुलै -**

गोयेगाव (ता. करमाळा) येथील शेतकरी गोरख राजाराम आटोळे (वय ८१) यांचे शनिवार, दि. १९ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन सुना व नातवंडे असा परिवार आहे. सदर बझार पोलिस ठाण्यातील सहायक फौजदार औदुंबर आटोळे यांचे ते वडील होते.

### अरविंद कामतकर



**सोलापूर, दि. १९ जुलै-**

अरविंद श्रीधर कामतकर (वय ८७) यांचे शनिवारी १९ जुलै रोजी सकाळी निधन झाले. ते कामतकर क्लासेसचे संचालक सुनील भालचंद्र कामतकर यांचे काका होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# रशियाचा युक्रेनवर पाशवी हल्ला

## ८ नागरिक ठार, १९ जखमी : ओडेसा शहरातील अनेक इमारती जमीनदोस्त



◆ **कीव, १९ जुलै**

रशियाच्या लष्कराने शनिवारी पहाटे युक्रेनच्या अनेक भागात जोरदार हल्ले चढविले. प्रामख्याने ओडेसा शहराला लक्ष्य करून ३०० ड्रोन आणि ३० क्रूझ क्षेपणास्त्रे डागण्यात आले. यात ८ नागरिक ठार तर १९ जण गंभीर जखमी झाले. हल्ल्यात शहरातील अनेक इमारती जमीनदोस्त झाल्या असून ढिगाऱ्यातून नागरिकांना बाहेर काढणे सुरू असल्याची माहिती ओडेसाचे महापौर हेनाडी ट्रुखानोव्ह यांनी दिली.

दोन्ही देशातील संघर्ष थांबविण्यासाठी अमेरिका आणि युरोपियन युनियनकडून रशियावर निर्बंध लादण्याची प्रक्रिया सुरू केली. अशातच शनिवारी पहाटे ५.१५ वाजताच्या सुमारास रशियाच्या हवाई दलाने युक्रेनच्या ओडेसा शहराला लक्ष्य करीत जोरदार हल्ले केले. काही तासातच रशियाने युक्रेनच्या अनेक भागात ३०० ड्रोन आणि ३० क्रूझ क्षेपणास्त्रे डागले. यातील बहुतांश ड्रोन आणि क्षेपणास्त्रे युक्रेनच्या हवाई संरक्षण प्रणालीने हवेतच नष्ट केल्याची माहिती राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी दिली. काही ड्रोन आणि क्षेपणास्त्रे निवासी भागात डागण्यात आले, यात काही इमारती जमीनदोस्त झाल्या. ढिगाऱ्यातून ८ नागरिकांचे मृतदेह आणि १९ जखमी नागरिकांना बाहेर काढण्यात आले. सुरक्षा दलाकडून बचाव कार्य सुरूच असून मृतक व जखमींची संख्या वाढण्याची शक्यता असल्याचे झेलेन्की यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. रशियाचा हल्ला शांतता प्रयत्नांना मोठा धक्का असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**दहशतवादी कृत्याचा निषेध करावा**

ओडेसाचे महापौर हेनाडी ट्रुखानोव्ह म्हणाले, ओडेसा शहरावर २० हून अधिक ड्रोन आणि एका क्षेपणास्त्राने हल्ला करण्यात आला, ज्यामध्ये एका उंच इमारतीत आग लागल्याने एकाचा मृत्यू झाला आणि पाच जणांना वाचवण्यात आले. रशियाकडून होणारे हल्ले दहशतवादी कृत्य असून जागतिक नेत्यांनी याचा निषेध करायला हवा.

**जोरदार प्रत्युत्तर देणारः झेलेन्स्की**

रशियाच्या या भयंकर हल्ल्यानंतर, युक्रेनचे राट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की म्हणाले, रशियाच्या हल्ल्यात तीन मुलांसह एका महिलेचादेखील मृत्यू झाला आहे. ईशान्य सुमी प्रदेशात महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचे नुकसान झाले आहे. या हल्ल्याला जोरदार प्रत्युत्तर दिले जाईल. युक्रेनची संरक्षण क्षमता वाढवण्यासाठी अमेरिका आणि युरोपियन संघाच्या नेत्यांनी केलेल्या मदतीबद्दल मी आभारी आहे. ◂(वृत्तसंस्था)



पाऊस थांबल्याने अमरनाथ यात्रेला पुन्हा सुरुवात झाली असून भाविकांचे जत्थेच्या जत्थे अत्यंत खडतर अशा हिमालयातील गुफेत असलेल्या बाबा बर्फानीच्या दर्शनासाठी येत आहेत. हिमालयातील पर्वतमालिका नैसर्गिक सौंदर्याने अशा काही नटलेल्या आहेत की डोळ्याचे पारणे फिटते.

# वॉल स्ट्रीट जर्नल, रॉयटर्सला वैमानिकांच्या संघटनेची नोटीस

## बेजबाबदार वार्तांकन केल्याचा आरोप

◆ **नवी दिल्ली, १९ जुलै**

भारतीय वैमानिक महासंघाने (फेडरेशन ऑफ इंडियन पायलट्स-एफआयपी) 'द वॉल स्ट्रीट जर्नल' आणि 'रॉयटर्स' या वृत्तसंस्थांच्या विरोधात कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. १२ जून रोजी एअर इंडियाच्या विमानाला झालेल्या अपघाताबाबत बेजबाबदार वार्तांकन केल्यामुळे एफआयपीने कठोर पाऊल उचलत या दोन्ही वृत्तसंस्थांना नोटीस बजावली.

विमान अपघातासाठी वैमानिकाची चूक किंवा कॉकपिटमध्ये संभ्रमावस्थेमुळे हा अपघात झाल्याचे या वृत्तांत म्हटले आहे. कोणताही ठोस पुरावा नसताना विमान अपघातामागे वैमानिकांची चुकी असल्याचे वृत्तात म्हटले. या आशयाचे वृत्त पूर्णतः चुकीचे आणि भ्रामक असल्याचा आरोप एफआयपीने केला. या वृत्तसंस्थांनी माफी मागावी, अशी मागणी एफआयपीने पाठवलेल्या नोटीसमध्ये केली आहे. या मुद्यावरील वार्तांकन निवडक आणि कोणतीही शहनिशा न करता करण्यात आल्याचे म्हटले आहे. अशा प्रकारचे वार्तांकन बेजबाबदारपणा असून, विशेषतः चौकशी सुरू असताना हा प्रकार झाला. ◂(वृत्तसंस्था)

**भीती पसरवण्याची वेळ नाही**

मोठ्या प्रमाणात लोकांचे लक्ष या अपघाताकडे वळले असले, तरी ही वेळ भारतीय विमान उद्योगाच्या सुरक्षेबाबत भीती पसरवण्याची नाही. विशेषतः कोणतेही तथ्य समोर आले नसताना हा प्रकार झाला, असे एफआयपीने म्हटले आहे. अधिकृत तपास पूर्ण होईपर्यंत कोणतेही अंदाज वर्तवले जाऊ नयेत, असेही म्हटले आहे. ■

# ईडीचा मेटा, गुगलच्या अधिकाऱ्यांना समन्स


◆ **नवी दिल्ली, १९ जुलै**

कित्येक ऑनलाईन बेकायदेशीर जुगार मंचांतील 'मनी लॉण्ड्रिंग' प्रकरणाच्या तपासाचा भाग म्हणून अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपन्या मेटा आणि गुगलच्या प्रतिनिधींना समन्स बजावत चौकशीसाठी हजर राहण्याचा आदेश दिला, अशी माहिती अधिकृत सूत्रांनी शनिवारी दिली.

येथील ईडीच्या कार्यालयात सोमवारी हजर राहून बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत बयाण नोंदवावे, असे या अधिकाऱ्यांना सांगण्यात आले. या मुद्यावर दोन्ही कंपन्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही. बेकायदेशीर सट्टेबाजी आणि जुगार लिंक्स होस्ट करणाऱ्या अनेक मंचांची चौकशी तपास यंत्रणा करीत आहे. यात विविध इंटरनेट आधारित समाज माध्यम आऊटलेट्स आणि ॲप स्टोअर्सवर त्यांच्यासाठी जाहिराती दिल्या गेल्याच्या घटनांचा समावेश आहे. असे बेकायदेशीर मंच त्यांच्या जाहिराती समाज माध्यम आणि कम्युनिकेश लिंक्सवर कशा देऊ शकतात, हे समजून घेण्यासाठी ईडीने या दिग्गज कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना बोलावल्याचे समजते. या प्रकरणांमध्ये काही अभिनेते, सेलिब्रिटी आणि क्रीडा क्षेत्रातील व्यक्ती देखील तपास यंत्रणेच्या निगराणीखाली आहेत. त्यांना ईडीकडून लवकरच समन्स बजावले जाण्याची अपेक्षा आहे. ◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### सैयाराने पहिल्याच दिवशी तोडला रेकॉर्ड



**मुंबई** : अहान पांडे आणि अनीत पड्डा स्टारर डेब्यू चित्रपट सैयाराने १८ जुलैला प्रदर्शित झाल्यानंतर पहिल्या दिवशी रेकॉर्डतोड कमाई केली आहे. मोहित सूरी यांचे दिग्दर्शन चित्रपटाने पहिल्या दिवशी २० कोटी रुपयांचे कलेक्शन केले. सैयारा चित्रपटाचे बजेट ४५ कोटींचे असल्याचे म्हटले जात आहे. सोबतच निकिता रॉय आणि तन्वी द ग्रेट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरले आहेत. सैयारा चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाल्यानंतर नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. मात्र अद्याप ओटीटी प्रदर्शनाच्या तारखेची घोषणा करण्यात आलेली नाही. ■

### किंगच्या सेटवर शाहरुख जखमी



**मुंबई** : शाहरुख खानला किंग या आगामी चित्रपटाच्या सेटवर दुखापत झाली. यामुळे निर्मात्यांना चित्रीकरण पुढे ढकलावे लागले आहे. एक ॲक्शन सीन करताना त्याच्या कंबरेला दुखापत झाली. सिद्धार्थ आनंद दिग्दर्शित किंग चित्रपटासाठी शाहरुख एका ॲक्शन सीनचे चित्रीकरण करत होता. त्यादरम्यान, त्याच्या कंबरेला दुखापत झाली. ही दुखापत तितकी गंभीर नाही आणि शाहरुख हळूहळू त्यातून बरा होत आहे. भारतात शूटिंग केल्यानंतर तो अमेरिकेला निघून गेला आणि आता तो त्याच्या कुटुंबासह यूकेमध्ये आहे. या दुखापतीमुळे शाहरुखने त्याचा श्रीलंका दौराही पुढे ढकलला आहे. चित्रपटाचे पुढील चित्रीकरण सप्टेंबर महिन्यात सुरू होण्याची शक्यता आहे. ■

### बागी ४ बाबत सोनमने दिली मोठी बातमी



**मुंबई** : प्रसिद्ध पंजाबी अभिनेत्री सोनम बाजवा हिने टायगर श्रॉफसोबत बागी ४ या तिच्या दुसऱ्या बॉलिवूड चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण केले आहे. तिने समाज माध्यम इंस्टाग्रामवर ही माहिती दिली. सोनम बाजवाने एका पोस्टमध्ये तिचे काही फोटो शेअर केले आहेत. यामध्ये ती क्लॅपरबोर्डसोबत पोज देत आहे. यासोबतच एक पोस्ट लिहून िवि; आणि अशातच बागी ४ चे चित्रीकरण पूर्ण झाले. हा माझा दुसरा हिंदी चित्रपट आहे. हा प्रवास उत्कटतेने आणि श्रद्धेने विणलेला आहे, असे लिहून चित्रपटाबद्दल माहिती दिली. बागी फ्रँचायझीचा चौथा भाग ए. हर्ष यांनी दिग्दर्शित केला आहे. यात टायगर श्रॉफ, सोनम बाजवा, संजय दत्त आणि हरनाज संधू यांच्या प्रमुख भूमिका आहेत. बागी ४ ५ सप्टेंबरला चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. ■


# एपस्टाईन प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे सार्वजनिक करणार

## ट्रम्प दबावापुढे झुकले, बाल लैंगिक शोषणाचे प्रकरण

◆ **वॉशिंग्टन, १९ जुलै**

गुंतवणूकदार व अब्जाधीश जेफ्री एपस्टाईनशी संबंधित बाल लैंगिक शोषणाच्या आरोपासंदर्भातील तपासाची कागदपत्रे सार्वजनिक करण्यास अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंजुरी दिली आहे. या प्रकरणात अनेक उद्योगपती व राजकीय लोकांचा सहभाग असल्याचा आरोप करीत उद्योगपती एलन मस्क यांनी एपस्टाईन प्रकरणाची कागदपत्रे जनतेसमोर आणण्याची मागणी केली होती.

लैंगिक तस्कर जेफ्री एपस्टाईनच्या प्रकरणाबाबत अमेरिकन राष्ट्राध्यक्षांवर सतत टीका होत होती. ट्रम्प यांनी एपस्टाईन प्रकरणाशी संबंधित काही नोंदी सार्वजनिक होऊ दिल्या नाहीत, असा आरोप केला जात होता. सततच्या टीकेनंतर ट्रम्प दबावापुढे झुकले आणि त्यांनी एपस्टाईन प्रकरणाशी संबंधित नोंदी सार्वजनिक करण्यास मंजुरी दिली. समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्टमध्ये ट्रम्प यांनी लिहिले की, जेफ्री एपस्टाईन प्रकरणाची पुरेशी चर्चा झाली. आता मी ॲटर्नी जनरल पाम बोंडी यांना ग्रॅण्ड ज्युरीच्या परवानगीने साक्षीची कागदपत्रे सार्वजनिक करण्यास सांगितले आहे. दरम्यान जेफ्री एपस्टाईन हा एक कुख्यात लैंगिक तस्कर होता, ज्याचे अमेरिकेतील उद्योगपती, राजकीय नेत्यांशी संबंध होते. एपस्टाईनवर बाल लैंगिक शोषणाचा गंभीर आरोप होता आणि त्याने २०१९ मध्ये तुरुंगात आत्महत्या केली. तथापि, एपस्टाईनच्या मृत्यूच्या इतक्या वर्षांनंतरही त्याच्याबद्दलचा वाद संपलेला नाही. ◂(वृत्तसंस्था)



उत्तर भारतात श्रावण महिन्याचे फार महत्त्व आहे. परमेश्वाप्रती असलेल्या भक्तीचे पदोपदी दर्शन घडते. पवित्र गंगाजल भरलेल्या १५ ते २० लिटर वजनाच्या सहा घागरी खांद्यावर घेऊन शेकडो किलोमीटर पायी चालत जाणे म्हणजे या भोलेभक्तांची शारीरिक आणि मानसिक कसोटीच होय. पण, भोळ्या शंकराला प्रसन्न करण्यासाठी हे भक्त कोणत्याही कसोटीला सामोरे जाण्यास तयार असतात.

# पाकिस्तानसोबतच्या संघर्षात पाच लढाऊ विमाने पडली

**डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा**

◆ **वॉशिंग्टन, १९ जुलै**



भारत आणि पाकिस्तानमध्ये मे महिन्यात झालेल्या संघर्षादरम्यान पाच लढाऊ विमाने पडली, असा नवीन दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला. केवळ इतकेच नव्हे, तर आपण हस्तक्षेप केल्यानेच दोन्ही देशांमधील युद्ध थांबले, असा दावा पुन्हा एकदा केला आहे.

नेमक्या कोणत्या बाजूची विमाने पडली किंवा दोन्ही देशांमिळून पाच विमाने पडली का हे मात्र ट्रम्प यांनी स्पष्ट केले नाही. संघर्ष संपवण्यात भूमिका पार पाडल्याचा दावा भारताने यापूर्वीच फेटाळला आहे. अमेरिकेची मध्यस्थी नव्हे, तर दोन्ही देशांच्या सैन्यात झालेल्या थेट चर्चेनंतर दोन्ही बाजूंनी लष्करी कारवाया थांबवल्या, असे भारताने वेळोवेळी स्पष्ट केले आहे.

भारत आणि पाकिस्तानमध्ये संघर्ष सुरू होता. प्रत्यक्षात चार ते पाच विमाने हवेतून पाडण्यात आली. पाच विमाने पाडल्याचे मला वाटते. हा संघर्ष दिवसेंदिवस चिघळतच चालला होता, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये रिपब्लिकन पार्टीच्या खासदारांसाठी शुक्रवारी रात्री आयोजित केलेल्या भोजन कार्यक्रमात सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

**व्यापाराच्या मार्गाने संघर्ष शांत केला**

हे दोन्ही अण्वस्त्रधारी देश आहेत. ते परस्परांवर भीषण हल्ले करीत होते. त्यांच्यातील संघर्ष चिघळत होता. आम्ही तो व्यापाराच्या मार्गाने सोडवला. तुम्हाला व्यापार करार करायचा आहे. तुम्ही शस्त्रे आणि अण्वस्त्रे टाकणार असाल, तर आम्ही व्यापार करार करणार नाही. दोन्ही खूप शक्तिशाली अण्वस्त्रधारी देश आहेत, असे ट्रम्प म्हणाले. ■

## 'आप'ने सोडली इंडिया आघाडीची साथ


◆ **नवी दिल्ली, १९ जुलै**

लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला रोखण्यासाठी विरोधी पक्षांनी एकत्र येत इंडिया आघाडीची स्थापना केली. या आघाडीशी आमचा काहीही संबंध नाही, असे आपने जाहीर केले आहे.

गेल्या लोकसभा निवडणुकीवेळी अबकी बार ४०० पारची गर्जना करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपा आणि एनडीएने निर्विवाद बहुमत मिळवण्यासाठी मोर्चेबांधणी केली होती. मात्र, तेव्हा काँग्रेसच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्षांनी एकत्र येत स्थापन केलेल्या इंडिया आघाडीने भाजपाला २४० जागांवर तर एनडीएला ३०० जागांच्या आत रोखले होते. ◂(वृत्तसंस्था)

# तेलंगणात सापडला १८०० वर्षांपूर्वीचा शिलालेख!

◆ **हैदराबाद, १९ जुलै**



भारताच्या पुरातन इतिहासात दर वेळेस नवे दालन उघडणारे शोध समोर येत असतात. त्यातलाच एक महत्त्वाचा पुरातत्त्वीय शोध अलिकडेच तेलंगणामध्ये लागला आहे. सातवाहन राजांच्या काळातील, तब्बल १८०० वर्षांपूर्वीचा शिलालेख तेलंगणाच्या यादाद्री भुवनगिरी जिल्ह्यात सापडला आहे.

तेलंगणा राज्याच्या हेरिटेज विभागाने अलिकडेच केलेल्या उत्खननात यादाद्री भुवनगिरी जिल्ह्यातील चडामध्ये इ. स. पूर्व दुसऱ्या शतकातील ब्राह्मी लिपीतील एक अपूर्ण शिलालेख सापडला आहे. हा शिलालेख दगडी फलकावर कोरलेला असून तो प्राकृत भाषेत आणि ब्राह्मी लिपीत आहे. अशा प्रकारचे शिलालेख सातवाहन काळात प्रचलित होते. या शिलालेखाचा काही भाग तुटलेला असला तरी त्या शिलालेखावर ''सच(व)लोक हित सुखाय'' असा उल्लेख आहे, ज्याचा अर्थ ''सर्व लोकांच्या कल्याण आणि सुखासाठी'' असा होतो.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे अभिलेखशास्त्र संचालक के. मुनिरत्नम रेड्डी यांच्या मते, हा शिलालेख एका बौद्ध विहाराला अर्पण केलेल्या दगडी फलकाची नोंद आहे. यावरून या ठिकाणाचे सातवाहन काळातील बौद्ध केंद्र म्हणून असलेले महत्त्व समजते. तेलंगणा सरकार वारसा विभागाच्या माध्यमातून पुरातत्त्व संशोधनाला सातत्याने पाठिंबा देत आहे आणि राज्यात बौद्ध पर्यटन परिपथ विकसित करण्यासाठी सक्रिय आहे, असेही त्यांनी सांगितले.

या ऐतिहासिक शोधामुळे तेलंगणातील बौद्ध वारसा, सातवाहन काळातील समाजरचना आणि प्राचीन काळातील लोककल्याणाची मूल्ये यांचा आणखी एक दुवा सापडला आहे. या शिलालेखाच्या माध्यमातून केवळ ऐतिहासिक तथ्ये उलगडत नाहीत, तर भारतीय उपखंडातील सांस्कृतिक वैभवाची साक्षही मिळते. ◂(वृत्तसंस्था)

**शिलालेख ब्राह्मी आणि प्राकृत भाषेत**

ब्राह्मी लिपीतील आणि प्राकृत भाषेतील या शिलालेखामुळे सातवाहन काळातील बौद्ध परंपरेचा आणि त्या काळातील लोककल्याणाच्या तत्त्वज्ञानाचा अनमोल ठसा अधोरेखित झाला आहे. या नव्या शोधामुळे तेलंगणातील बौद्ध वारसा पुन्हा एकदा प्रकाशझोतात आला आहे. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## रोखठोक

दिनेश गुणे

# मुद्दे आणि गुद्दे...

विचारांचा मुकाबला विचाराने करावा, मुद्याला मुद्याने प्रत्युत्तर द्यावे, हा सुविचार व्यक्त करण्याची वेळ जेव्हा जेव्हा कोणावरही येते, तेव्हा तेव्हा या सुविचाराच्या नेमके विपरीत असे काही अगोदर घडून गेलेले असते. त्यामुळे काळाच्या प्रवाहात भरकटत चाललेल्या या सुविचाराची धार केव्हाच संपलेली असून वारंवार वापरला गेल्याने त्यास केवळ गुळगुळीतपणा आला आहे. असे गुळगुळीत विचार कालांतराने बुळबुळीतही होत जातात आणि जेथे मुद्दे आणि विचारांचे अस्तित्वच संपते तेव्हा हा सुविचारच खुंटीवर ठेवून गुद्यांवर येणे हाच मार्ग अवलंबिला जातो, असेही अनेकदा घडलेले दिसते. महाराष्ट्राच्या राजकारणाला एक संस्कृती आहे, सभ्यतेचा वारसा आहे, विरोधी विचारांचा आदर करण्याची परंपरा आहे आणि या राज्याच्या सभ्यतेने राजकारणास दिशा दिलेली आहे, असे गेल्या अनेक पिढ्यांकडून आपण ऐकत आलो आहोत. खरोखरीच ते खरे आहे का, हे तपासण्यासाठी इतिहासाचा मागोवा घेण्याची तसदी सहसा फारशी कोणी घेतलेली नाही, कारण खरेखोटे तपासताना या सुविचारास छेद देणारे काही समोर आलेच, तर ते सहन करण्याची हिंमत महाराष्ट्राच्या राजकारणात आहे किंवा नाही याबाबतही बहुधा कोणासही खात्री नसावी. त्यामुळे हा सुविचार खरा असा भोळसट समज करून घेऊनही, सध्याच्या काळात जे काही घडते, ते पाहणे आणि सहन करण्यापलीकडे सामान्यांच्या हाती काही उरलेले नाही. गेल्या काही दिवसांत महाराष्ट्राच्या विधिमंडळात आणि त्याआधी राज्यात जे काही प्रकार घडले, ते पाहता, प्रतिवाद करावा असे विचार आहेत किंवा नाहीत आणि मुळातच, प्रतिवादाकरिता तरी काही ठोस विचार कोणाच्या गाठीशी आहेत किंवा नाही याचाच विचार करण्याची वेळ आली आहे, हेच खरे आहे. मुद्यांचा मुद्यांशी संबंध नाहीच, पण मुद्यांऐवजी गुद्दे हाच विचार बळावत आहे, हेही स्पष्ट आहे. तरीही, महाराष्ट्रात असे काही घडून गेल्यानंतर, विचारांचा प्रतिवाद विचाराने करावा आणि मुद्याला मुद्याने प्रत्युत्तर द्यावे या सुविचाराचा गजर सुरू होतो. महाराष्ट्राने गेल्या काही दिवसांत राजकारणाच्या पटावर जे काही अनुभवले, ते पाहता असे सुविचार केवळ विनोदी वाटावेत, अशीच परिस्थिती दिसू लागते. राजकारणाचा स्तर खालावला आहे. कुरघोडीच्या राजकारणाने खालचा थर गाठला आहे आणि कात्रजचा घाट हा या राजकारणातील परवलीचा शब्द झाला आहे. अनेक जण आखाड्यात उतरण्याच्या ईर्ष्येनेच राजकारण करत आहेत आणि धोबीपछाड हा अनेकांचा आवडता डाव झाला आहे. यामुळेच, राजकारणाविषयी आणि विधिमंडळात प्रतिनिधित्व करण्यासाठी जनतेने पाठविलेल्या लोकप्रतिनिधीविषयी सामान्य जनतेच्या भावनाही बदलत गेल्या आहेत. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात व्यक्त केलेली मते हे सामान्य जनतेच्या भावनांचे हुबेहूब प्रतिबिंब होते. आमदार माजले आहेत ही सामान्य जनतेची भावना आहे आणि विधिमंडळात अधिवेशनाच्या अखेरच्या आठवड्यातील अखेरच्या दोन दिवसांत जे काही घडले, हाणामारी झाली, त्यामुळे सभागृहाची व लोकप्रतिनिधींची प्रतिमा मलिन झाली आहे, हे त्यांचे वक्तव्य म्हणजे केवळ जनतेची भावना नसून राजकारणाच्या सद्यःस्थितीचे विश्लेषण आणि कबुलीदेखील ठरले आहे.

विधिमंडळाच्या परंपरेने लाजेने मान खाली घालावी अशी एक निंदनीय घटना पावसाळी अधिवेशनाच्या कामकाजातील अखेरच्या सत्रात महाराष्ट्रास पाहावयास मिळाली. त्याआधीच्या दोन आठवड्यांच्या कामकाजादरम्यान याच सभागृहात सभ्यतेचे एक सकारात्मक चित्र दिसले होते. राज्याच्या जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपयोगी ठरणारा व कट्टर विघातक अतिरेकी कारवायांना पायबंद घालणारा कायदा याच सभागृहाने विरोधाविना संमत केला होता आणि महाराष्ट्राचे प्रेरणास्थान असलेल्या छत्रपती शिवरायांच्या पराक्रमी इतिहासाचा व रयतेच्या राज्याचा आदर्श जिवंत करून नव्या पिढीला प्रेरणा देणारा त्यांचा कारकीर्दीचा वारसा जपणाऱ्या गडकिल्ल्यांना जागतिक वारसा वास्तूंचे मानांकन मिळवून देणाऱ्या निर्णयाचे एकमुखी स्वागतही याच सभागृहाने केले होते. एका बाजूला छत्रपतींच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या लोकप्रतिनिधींनी जनतेच्या प्रतिनिधिगृहात परस्परांवर असंसदीय शब्दांची प्रच्छन्न उधळण करावी, समर्थकांच्या टोळ्यांना विधिमंडळाच्या आवारात आणून एकमेकांना मारहाण करावी आणि पुढे सभागृहाच्या व लोकप्रतिनिधींच्या प्रतिष्ठेचा मुद्दा समोर येताच सावध शब्दांत दिलगिरी व्यक्त करून मोकळे व्हायचे, हा सारा खेळ पाहता, लोकप्रतिनिधी माजले आहेत, ही सभागृहात मुख्यमत्र्यांच्या मुखातून व्यक्त झालेली जनतेची भावना जनतेच्या मनातून पुसली गेली असेल असे कोणास वाटणार नाही.

लोकप्रतिनिधींच्या माजलेपणाचे अनेक मासलेवाईक दाखले याआधीही जनतेने अनेकदा अनुभवलेले आहेत. अधिवेशनाच्या अखेरच्या आठवड्यात शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्यात उडालेल्या मौखिक हाणामारीचे पर्यवसान पुढे समर्थकांमधील शारीरिक हाणामारीत झाले. असा गोंधळ याआधी कधी झाला नव्हता असे नाही. मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना नागपूरच्या एका हिवाळी अधिवेशनात सत्तारूढ आणि विरोधी सदस्यांत सभागृहामध्ये झालेल्या वादाच्या काही मुद्यांवर तोडगा काढण्यासाठी अध्यक्षांच्या दालनातील बैठकीदरम्यान तेव्हाचे मंत्री अण्णा डांगे आणि विरोधी सदस्य बबनराव ढाकणे यांच्यात झालेल्या वादावादीचे पर्यवसान शिवीगाळीत झाले आणि बैठक संपून बाहेर पडताना दोघेही हातघाईवर आले. हातघाईच्या त्या घटनेसही नाट्यपूर्ण वळण देऊन कुरघोडीचा डाव टाकणारा तो प्रसंग परवाच्या हाणामारीनंतर अनेकांस आठवला असेल. समाजवादी पार्टीचे सदस्य अबू आझमी यांच्या आमदारकीच्या शपथविधीवेळी मनसेच्या सदस्यांनी भर सभागृहात त्यांच्यावर हात उगारला होता, या आठवणीचीही उजळणी झाली असेल



आणि एका आमदाराचे वाहन अडविल्याच्या आरोपावरून एका पोलिस अधिकाऱ्यास विधान भवनात झालेल्या मारहाणीचा किस्साही या निमित्ताने अनेकांस आठवला असेल. भर सभागृहातील हमरीतुमरीच्या अनेक प्रसंगांमुळे उद्भवलेल्या गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज तहकूब करण्याची वेळ याआधी अनेकदा आली आहे. पण यंदाच्या पावसाळी अधिवेशनात आव्हाड-पडळकर यांच्या वादाने या एकूणच भूतकाळावर कळस चढविला. हमरीतुमरीच्या त्या प्रसंगांनंतर काही जणांवर कारवाईही झाली होती, पण थेट विधिमंडळाच्या आवारात, प्रवेशद्वाराशीच समर्थकांना आणून हाणामारी करत कायदा हातात घेण्याचा प्रकार मात्र, पहिल्यांदाच घडला. सभागृहाच्या प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्हे उमटविणाऱ्या त्या घटनांनी महाराष्ट्राने वेळोवेळी चिंता व्यक्त केली होती. आमदार माजले आहेत, अशा भावना तेव्हाही जनतेमध्ये उमटल्या होत्या. पण या भावनेची नोंद विधिमंडळाच्या कामकाजात खुद्द मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यातून झाली, म्हणून ही घटना अभूतपूर्व ठरते. राज्याच्या कानाकोपऱ्यातील लोकप्रतिनिधी किंवा राजकीय नेत्यांमधील राजकीय वैराचे अनेक किस्से सांगितले जातात. लोकप्रतिनिधींच्या करामतींची दबक्या आवाजातील कुजबूज हा अनेक गावांतील संध्याकाळी पारावरच्या गप्पांना रंग भरणारा विरंगुळ्याचा विषय असतो. रस्त्यावरचे राजकीय राडे हा तर राज्यात वर्षानुवर्षे चर्चिला जाणारा विषय आहे. पण या सर्वांस एक मर्यादा होती. लोकप्रतिनिधींमधील वाद किंवा वैराने लक्ष्मणरेषा आखलेली होती. कदाचित त्यामुळेच, हे रस्त्यावरचे राडे याआधी कधीही विधिमंडळाच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहोचले नव्हते. जितेंद्र आव्हाड यांनी महाविकास आघाडीचे मंत्री असताना अनंत करमुसे नावाच्या एका व्यक्तीस बंगल्यावर आणून मारहाण केल्याचा उल्लेख सभागृहातच चर्चेदरम्यान झाला. एका मंत्र्याने आपल्या पदाची प्रतिठा अशा रीतीने खुंटीवर टांगली तेव्हाही, लोकप्रतिनिधी माजले आहेत, अशीच सर्वसाधारण भावना जनतेच्या मनात उमटली होती. असे प्रकार जेव्हा जेव्हा घडले, तेव्हा तेव्हा प्रत्येक वेळी हीच भावना उमटली आणि अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात जनतेच्या मनातील ही भावना बोलून दाखविली, तेव्हा कामकाजाच्या नोंदीत या भावनेस स्थान मिळाले. कारण विधिमंडळाच्या आवारात, प्रत्यक्ष प्रवेशद्वारातच दोन आमदारांतील वैराची ठिणगी भडकून त्यांच्या समर्थकांनी किंवा कार्यकर्त्यांनी हाणामारी करावी अशी नोंदही विधिमंडळाच्या इतिहासात प्रथमच घडली आहे.

ही विधानसभा आमदारांच्या मालकीची नाही, मंत्र्यांच्या मालकीची नाही आणि मुख्यमंत्र्यांच्याही मालकीची नाही, तर महाराष्ट्रातील १४ कोटी जनता हीच याची मालक आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनात कामकाजाच्या अखेरच्या दिवशी सर्वच सदस्यांस ठणकावून बजावले हे मात्र चांगलेच झाले. शुक्रवारी सभागृहातील त्यांच्या भाषणाचा कणखर सूर मात्र जनतेच्या भावनांना दिलासा देणारा ठरणार आहे. कारण, विधानसभेच्या कामकाजातून समाजाला दिशा दाखविण्याचे कामकाज झाले पाहिजे अशी जनतेचीही अपेक्षा असते. त्याऐवजी लाथाबुक्क्यांचा संदेश समाजात जात असेल, तर चिंतन करण्याची वेळ सर्वांवर आली आहे, याची जाणीव मुख्यमंत्र्यांनी बोलून दाखविली आणि त्याचीही नोंद सभागृहाच्या कामकाजात झाली. गुरुवारच्या हाणामारीत सामील असल्याची नोंद झालेल्या दोघांनी अभ्यागत म्हणून विधानभवनात प्रवेश केला होता, त्यामुळे आता विधिमंडळाच्या आवारात अभ्यागतांच्या प्रवेशासंबंधी काही नियमावली करण्याचा एक प्रस्ताव विचाराधीन असल्याचे शुक्रवारी विधानसभा अध्यक्षांनीही जाहीर केले. या हाणामारीत सहभागी असलेली एक व्यक्ती जितेंद्र आव्हाड यांचा कार्यकर्ता होती, तर दुसरी व्यक्ती आमदार गोपीचंद पडळकर यांची नातेवाईक होती. अशा कोणाही व्यक्तीस अनाहूतपणे आपल्यासोबत विधानभवनात आणण्याचे नेमके प्रयोजन काय होते, असा प्रश्नही अप्रत्यक्षपणे त्यांनी उपस्थित केला आणि अशा अनाहूतांकडून कोणतीही आक्षेपार्ह कृती झाली तर त्याची जबाबदारी संबंधित सदस्यावर राहील असा नियम करण्याची गरजही अधोरेखित केली. लोकशाहीचे मंदिर मानल्या जाणाऱ्या विधिमंडळाच्या सर्वोच्च परंपरांचे पालन करण्याची जबाबदारी सदस्यांची आहे, सदस्यांचे वर्तन विधिमंडळाची प्रतिष्ठा वाढविणारे असावे, सभागृहाची परंपरा, उच्च प्रथा, गरिमा बाधित होईल असे कोणतेही वर्तन सदस्यांनी करू नये, असे सांगण्याची वेळ अध्यक्षांवर यावी ही बाबही लोकशाहीच्या दृष्टीने लाजिरवाणीच ठरली आहे. कारण, विधिमंडळाच्या परंपरांची प्रतिष्ठा आमदारांच्या नैतिक आचरणावरून ठरत असते. आता आमदारांच्या नैतिक आचरणाचे मापदंडच ठरवावे लागणार आहेत आणि त्यासाठी विधिमंडळाची नीतिमूल्य समिती नेमावी लागणार आहे. अधिवेशनकाळात अभ्यागतांना प्रवेश दिला जाणार नाही आणि मंत्री वा आमदारांनी प्रवेशासाठी विनंती करू नये, असेही अध्यक्षांनी बजावले आहे. १४ कोटी जनतेच्या मालकीच्या या सदनात जनतेसही आता प्रवेसासाठी काटेकोर नियमांचे टप्पे ओलांडावे लागणार आहेत. दोघा आमदारांच्या समर्थकांतील हाणामारीचे असे अनेक परिणाम आता अनुभवावे लागणार आहेत. या दोघा अभ्यागतांवर काही गुन्ह्यांचीदेखील नोंद असल्याचे दिसते. आव्हाड समर्थकावर आठ गुन्हे दाखल आहेत, तर पडळकरांच्या समर्थकावर सहा गुन्हे दाखल आहेत. अशी मंडळी विधानभवनाच्या आवारात येऊन हाणामारी करतात, याची पुरेशी लाजिरवाणी भावना शुक्रवारी मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यातून उमटली आहे.

राजकीय कारणांवरून हाणामारी, राडे घडले की त्यामधील सहभागींचे राजकीय लागेबांधे, नेत्यांसोबतचे संबंध शोधण्याची स्पर्धा सुरू होते आणि या घटनांमागे कोणा नेत्याचा किंवा पक्षाचा हात असल्याचा आरोपवजा निष्कर्षही काढला जातो. गेल्या काही वर्षांत अशा अनेक घटनांमागे कोणा ना कोणा पुढाऱ्याचा किंवा राजकीय पक्षाचा संबंध जोडला जाण्याचे राजकारणही घडले आहे. त्यालाच कुरघोडीच्या राजकारणाचे रंग चढविले जातात आणि सूडाचा प्रवास सुरू होतो. अगोरदरच, राज्यातील जनतेस अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. गुन्हेगारी, भ्रष्टाचाराची मुळे खोलवर रुजली असल्याने कोणत्याही सत्ताकाळात त्याला आळा घालण्याचे प्रयत्न तोकडेच ठरलेले दिसून येतात. गुन्हेगारीसंदर्भात आकडेवारी मांडून गुन्ह्यांचे किंवा गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण कमी झाल्याचा दावा करण्याची एक प्रथा सभागृहात प्रत्येक सत्ताकाळात दिसून येते. गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण वाढले म्हणजे गुन्हेगारी कमी झाली असे मानले जात नाही. जुन्या सत्ताकाळातील गुन्हेगारीची आकडेवारी मांडणे आणि नव्या सत्ताकाळात गुन्हे सिद्ध होण्याची आकडेवारी मांडणे हे गुन्हेगारीस आळा घालण्याच्या प्रयत्नांचे समर्थन ठरत नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वतःच ते मान्यदेखील केले आहे. त्यामुळे, गुन्हे सिद्ध होण्याच्या प्रमाणाची आकडेवारी मोजण्यापेक्षा, गुन्हेगारीच्या घटनांची आकडेवारी अधिक महत्त्वाची ठरते. राज्यातील गुन्हेगारीचे प्रमाण आणि नागरिकांची सुरक्षितता हे परस्परांशी निगडित असलेले मुद्दे आहेत. जेथे गुन्हेगारी बोकाळते, तेथे विकासाच्या प्रकल्पांनाही खीळ बसते. नवे उद्योग सुरू करण्यास कोणी धजावत नाही आणि गुंतवणुकीचा ओघ थांबला की त्याच्या परिणामी रोजगाराच्या संधी गमावल्याने अर्थकारणासही खीळ बसते. एकंदरीतच, गुन्हेगारी ही समाजस्वास्थ्याला लागलेली कीड असल्याने, ती मुळापासून नष्ट करण्याकरिता ज्या लोकप्रतिनिधींची भूमिका प्रामाणिक असावी अशी जनतेची अपेक्षा असते, त्या लोकप्रतिनिधींच्या समर्थकांवरच गुन्हे दाखल असतील आणि असे समर्थक लोकप्रतिनिधींचे बोट धरून थेट विधानभवनाच्या प्रवेशद्वारात गुंडगिरीचे सामूहिक प्रदर्शन घडवत असतील, तर सभागृहाची प्रतिष्ठा आणि जनतेच्या लोकप्रतिनिधींकडून असलेल्या अपेक्षांचे मूल्य खालावले असेच म्हणावे लागेल. आमदार माजले आहेत, ही जनतेची भावना सभागृहात व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहास त्याची दखल घेणे भाग पाडले आहे. आता नव्याने स्थापन होणारी नीतिमूल्य समिती ही भावना संपुष्टात आणण्यासाठी कोणती पावले उचलणार हे पाहणे नक्कीच औत्सुक्याचे ठरेल.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### ज्येष्ठांनी आपले श्रेष्ठत्व जपावे

भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. भारत सरकारने वर्ष २०११ मध्ये केलेल्या सर्व्हेनुसार भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्या १०.३९ कोटी होती. दरवर्षी ही संख्या ३६ टक्क्यांनी वाढते. दर १० वर्षांनी भारत सरकार सर्व्हे करून ज्येष्ठ नागरिकांची संख्या जाणून घेत असते. त्यानुसार वर्ष २०२१ मध्ये झालेल्या सर्व्हेनुसार ज्येष्ठ नागरिकांची संख्या १४.३२ कोटी झाली होती. पुढील १० वर्षांत म्हणजे वर्ष २०३१ पर्यंत ही संख्या १७.३२ कोटी झालेली असेल जी एकूण लोकसंख्येच्या १२.५० टक्के असेल.

त्या तुलनेत जन्मदर बराच कमी आहे. ० ते ६ वयोगटातील मुलांची संख्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत केवळ १३.१० टक्के होती. ज्येष्ठ नागरिकांची वाढती लोकसंख्या आणि घटत चाललेला जन्मदर हा चिंतेचा विषय आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या वाढत्या लोकसंख्येबरोबर समस्या देखील त्याच प्रमाणात वाढत आहेत. यावर बरेच विचारमंथन नियमित होत असते. पण त्यातून समाधानकारक मार्ग निघत नाही. आर्थिक कुचंबणा हे एक प्रमुख कारण असावे. आर्थिक स्वावलंबन गमावणे आणि दुसऱ्याच्या भरवशावर जीवन जगण्याची वेळ येणे यासारखे दुसरे दुःख नाही असे भूक्तभोगी सांगतात. भारतात ज्येष्ठ नागरिकांची जी संख्या आहे त्यात नोकरी आणि व्यवसायातून निवृत होणाऱ्यांची संख्या केवळ ६ टक्के आहे. यांना निवृत्तीनंतर कमी जास्त प्रमाणात निवृत्ती वेतन (पेन्शन) मिळत आहे. त्यात जवळपास २० लाख ज्येष्ठ नागरिक असे आहेत ज्यांना १००० रुपये आणि त्यापेक्षा कमी पेन्शन मिळत आहे. त्यांना दुसरा आर्थिक स्रोत नाही. त्यामुळे परिवारात तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागतो हे कटू सत्य आहे. त्यात महिलांची संख्या अधिक आहे. विशेषतः विधवांची. या अल्प वेतनात वाढ व्हावी असा प्रयत्न वर्ष २०१४ पासून होत आहे पण यश मिळत नाही आहे. पण त्याहीपेक्षा चिंता त्या ९४ टक्के लोकांची आहे जे असंघटित क्षेत्रात काम करतात. त्यांची आर्थिक स्थिती अतिशय खराब आहे. वृद्धावस्थेमुळे ते काम करू शकत नाहीत, त्यांना पेन्शन पण मिळत नाही.

अशा परिस्थितीत ज्येष्ठांनी आपले ज्येष्ठत्व जपावे अशी आपली अपेक्षा आहे. खरे तर ही तारेवरची कसरत आहे. पण या अवस्थेतून गेलेली ज्येष्ठ मंडळी आपल्या अनुभवाच्या आधारावर सांगतात, हो आपण आपले श्रेष्ठत्व जपून ठेवू शकतो. ते सांगतात, आपण दुसऱ्यावर अवलंबून आहोत ही धारणा मनातून काढून टाकली पाहिजे. माझी माझ्या परिवाराला नितांत गरज आहे. ती गरज परिवारातील एक सदस्य या नात्याने मी भागविल असा आत्मविश्वास स्वतःमध्ये प्रथम आणि परिवारात निर्माण करीन ही खूणगाठ मनाशी बाळगावी लागेल. मी कोण होतो यापेक्षा आज मी कोण आहे याचा विचार केला तर समस्या उद्भवत नाहीत. उलट आपण आपल्या अस्तित्वाची जाणीव करून दिली, हा माझा परिवार आहे, माझ्या सुख-दुःखात हीच मंडळी उपयोगात येणार आहे ही भावना मनात जोपासावी लागेल. सर्व प्रश्न सुटतील. मुख्य म्हणजे वृद्धाश्रमाचे दरवाजे पाहावे लागणार नाहीत.

या सोबतच ६० ते ७० वयोगटातील नागरिकांनी स्वतःला वृद्ध समजू नये. निवृत्ती ही स्वाभाविक प्रक्रिया आहे. पण वरील वयोगटातील मंडळीत ऊर्जा कायम असते. ते परिवारात राहून समाजकार्य करू शकतात. आर्थिक गरज भागविण्यासाठी नव्हे तर चारचौघांत राहून समाजकार्य करण्याची इच्छा बाळगली तर अनेक मार्ग सापडतात. आपले आवडते क्षेत्र आपण शोधू शकतो. समाजात अनेक उपक्रम चालतात जिथे ६० ते ७० वयोगटातील लोकांची नितांत गरज आहे. त्यावरील वयोगटातील ज्येष्ठांनी निराश होण्याचे कारण नाही. कुटुंब प्रमुखाची भूमिका घरात राहून ते पार पाडू शकतात. आपले मोठेपण जपत पण त्याचे प्रदर्शन न करता आपण आपले कर्तव्य पार पाडू शकतो हा विश्वास मनात बाळगावा लागेल. आपले श्रेष्ठत्व जपत हळुवारपणे आपल्या कुटुंबाच्या मनात स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर आपणही आपले उर्वरित आयुष्य मानाने, आनंदाने जगू शकतो त्यासाठी दुसऱ्याच्या आनंदात आपला आनंद आहे हे आपल्या मनाला समजून सांगावे लागेल.

**वसंत पिंपळापुरे**/९४२२८०७०१३

### बाजारात वस्तू विक्रीसाठी खोटा प्रचार




ग्राहकांची फसवणूक ही आधुनिक मार्केटिंग पद्धत सुरू झाली आहे. आजच्या स्पर्धात्मक बाजारपेठेत उत्पादन विक्री करणे ही फक्त गुणवत्तेवर अवलंबून राहिलेली नाही. उत्पादन किती चांगले आहे यापेक्षा ते किती चांगले दाखवले जाते हे महत्त्वाचे झाले आहे. त्यामुळेच बाजारामध्ये खोट्या प्रचाराला प्रचंड उधाण आले आहे. जाहिराती, सोशल मीडिया, इन्फ्लुएन्सर्स, भडक पॅकेजिंग यांचा वापर करून ग्राहकांच्या भावनांचा खेळ केला जातो आहे. खोट्या प्रचाराची अनेक रूपे अतिशयोक्त जाहिराती, १० दिवसांत वजन कमी, पाच मिनिटांत केस गळती थांबवा, सगळ्यात स्वस्त किंमत अशा जाहिराती खरे तर अशक्य गोष्टी सांगतात, पण आकर्षकपणे मांडल्यामुळे लोक विश्वास ठेवतात. विविध कंपन्या सर्रास नकली सवलती व ऑफर्स देतात. फक्त आजच ५० टक्के डिस्काऊंट, लिमिटेड स्टॉक अशा घोषणा खऱ्या नसतात. स्टॉक भरपूर असतो, पण ग्राहकाला घाई करण्यास भाग पाडले जाते. सिने कलाकारांनी एखादे उत्पादन वापरताना दाखवले की लोक लगेच त्या गोष्टीवर विश्वास ठेवतात. पण अनेकदा त्या कलाकारांनी ते उत्पादन वापरलेले नसते. १०० टक्के नैसर्गिक केमिकल फ्री, डॉक्टर सर्टिफाईड असे शब्द वापरून ग्राहकांना फसवले जाते. प्रत्यक्षात उत्पादनात हानिकारक घटक असतात. निकृष्ट दर्जाची उत्पादने बाजारात टिकतात. प्रामाणिक उत्पादकांवर अन्याय होतो. यामुळे ग्राहकांनाच हळूहळू विश्वास हरवतो आणि बाजारपेठ बिघडते. प्रचारातील विविध जाहिरातीवर अंधश्रद्धा ठेवू नका. अनेक कंपन्यांच्या वस्तू ऑनलाईन रिव्ह्यू वाचून निर्णय ग्राहकांनी घेतले पाहिजेत. बाजारात वस्तू विकायच्या तर गुणवत्ता महत्त्वाची आहे, पण आता खोटे बोल पण रेटून बोल हे धोरण प्रचलित झाले आहे. अशा वेळी सजग आणि विचार करणारा ग्राहकच या फसवणुकीपासून स्वतःला वाचवू शकतो. आपली जबाबदारी आहे की खरे आणि खोटे यातील फरक ओळखावा आणि योग्य वस्तूची निवड करावी. चमकदार जाहिरात ही गुणवत्तेची हमी नसते. विचारपूर्वक खरेदी हीच ग्राहकांची खरी बचत होऊ शकेल.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

### सुजाण नागरिकांनी संस्कृती-रक्षक व्हावे!

साद्यंत स्थितीत अस्तित्वात असलेली आपली सनातन संस्कृती चिरकाल टिकवण्यासाठी व्यक्तिगत आणि संघटित प्रयत्न अत्यावश्यक आहेत. विविध भौगोलिक प्रांत, भाषा, राहणीमान आणि धार्मिक आस्थांमध्ये भिन्नता आढळत असली तरी टिकून आहे याचे कारण आपण

व्यष्टी (व्यक्ती), समष्टी (समाज) आणि परमेष्ठी (परमात्मा) ही संकल्पना स्वीकारली आहे. आपल्या संस्कृतीचा संस्थापक नसल्याने निसर्गातील पंचमहाभूत म्हणजे ब्रह्मांड हेच आदी आणि अंत आहे याची ऋषी, मुनी आणि तपस्वी यांनी कठोर तपश्चर्या करून जाणीव करून दिल्याने सनातनचे आधी आणि नंतर काही नाहीच आणि हेच अंतिम सत्य, आता जगातील बुद्धिवंत वर्गाला पटत असल्याचे दिसत आहे.

पाश्चात्य देशातील अनेक संस्कृती संशोधक याकडे आकृष्ट होत असून नुकताच प्रयागराज महाकुंभमेळा यात तब्बल ४२ देशांतील विविध संस्कृती पालन करणाऱ्या संशोधक वृत्तीच्या बुद्धिवंत मंडळींनी प्रत्यक्ष उपस्थिती दर्शविली. या अभूतपूर्व घटनेचे आपण साक्षीदार असलो तरी संस्कृती घटक म्हणून आपली नैतिक जबाबदारी वाढली आहे. भावी पिढी ही विज्ञाननिष्ठा बाळगून शिक्षण घेणारी असल्याने


त्यांच्यात द्वंद्व किंवा शंकांचे डोंगर उभे राहणार नाही, याची काळजी घेणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे. त्यासाठी अस्तित्वात असलेले विविध शास्त्र, उपासना पद्धती, देवी-देवता आणि त्यांच्या मूर्ती, सणवार याबद्दल विकृत माहिती प्रसारित होत असेल तर त्याचे निराकरण आणि त्यावर त्वरित अंकुश ठेवण्यासाठी व्यक्तिगत आणि संघटित प्रयत्न अपेक्षित आहेत. शास्त्रातील कृतींचा अवलंब करताना ती आधुनिक विज्ञान आणि प्रकृतीशी किती सुसंगत आहे, हे आपण आधी पटवून घेतले आणि तसे आचरणात आणले तर त्याचा कित्येक पटीने प्रभाव जास्त पडतो, असे आढळले आहे.

आता चातुर्मासात अनेक व्रत-वैकल्य, सण, उत्सव साजरे होत असताना त्यांचा मूळ स्वरूपात समाजात संदेश प्रसारित झाल्यास नवीन पिढी आचरणात आणेल. या चातुर्मासातील आचरण आणि आपले व्यक्तिगत शारीरिक व मानसिक आरोग्य यांचा कसा अन्योन्य संबंध आहे, हे त्या त्या क्षेत्रांतील तज्ज्ञ, जाणकार व अधिकारी व्यक्तींनी पुढाकार घेऊन उपलब्ध समाज माध्यमातून प्रसारित केल्यास भावी पिढीच्या ज्ञानात निश्चित भर पडेल. उत्सवांचे मूळ स्वरूप हे बीभत्स व हिडीस प्रकारात येऊ नये, याची पण दखल घेतल्यास समाजात चांगला जाईल. आपल्या संस्कृतीत संगीत शास्त्र अत्यंत प्रगत आहे. शास्त्रीय गायन, भावगीत, सिनेमा संगीत लोकगीत, भजन, कीर्तन, वादन इ. कलांचे संवर्धन करणे, नूतन कलाकारांना व्यासपीठ मिळवून देणे, आर्थिक मदत करणे यासाठी ज्येष्ठ कलाकारांनी परिसरातील समाज भवन संस्था, शैक्षणिक संस्था, मोठी मंदिरे यांच्या साह्याने कार्यक्रम आयोजित केल्यास या कला टिकून राहतील. 'योजकस्तु दुर्लभः' हे सूत्र असले तरी आयोजकांचा शोध अत्यावश्यकच आहे तेव्हाच संस्कृती टिकून राहील, असे वाटते.

**संजय पाठक**/नागपूर

### स्नॅक्सच्या दुनियेत हरविला सुदृढ बालक

शरीराची व मनाची सुदृढता व आरोग्य संपन्नता ही आपल्या आहार विहारावर अवलंबून असते. चाळिशीत जीवन जगणाऱ्या आजच्या या पिढीला आपलं बालपण आजच्या या स्नॅक्सच्या दुनियेत हरवलेल्या बालकांकडे बघून नक्कीच आठवत असावं. चार दशकांपूर्वी बाल्यावस्थेत असलेल्या बालकांचे खिसे नेहमी तिळ, शेंगदाणे, चिंचेचा मोहर, रानमेवा यांनी भरलेले असायचे. मित्रमंडळीत धिंगामस्ती करत एकमेकांशी वाटून खाण्यात खिसा केव्हा रिकामा व्हायचा ते कळायचं सुद्धा नाही. सकस आहार, मैदानी खेळ, निकोप मैत्री या दुनियेत वाढलेल्या बालकाची रोगप्रतिकारक्षमता कमालीची होती. रखरखत्या उन्हात गिल्ली दंडा, आट्यापाट्या, डाव डूबेल, तर पावसाच्या रिपरिपित बाण खुपसणे, तारांची रिंग, सायकलचे टायर, बांबूचे घोडे, कंचे, चिंचोके, आंब्याच्या कोया खेळत दिवसभर हुंदळूनसुद्धा चेहऱ्यावर थकव्याचे नामोनिशाण नसायचे. आईने लोखंडी तव्यावर भाजलेले चटकदार चणे, देशी गाईचं दूध, दुधावरची साय, दही, मक्याची कणसे, ज्वारीचा हुरडा या घरगुती स्नॅक्सपासून बालकांना पोषकत्व मिळायचं. त्यामुळे या पिढीचं आयुर्मान नक्कीच आजच्या स्नॅक्सच्या दुनियेत वाढत असलेल्या बालकाच्या तुलनेत अधिक आहे. चाळीस वर्षांपूर्वीची हीच पिढी आज शिक्षित व उच्चशिक्षित झाली, परंतु आहाराच्या बाबतीत स्वतःच्या निरक्षर आई-वडिलांनी जे गांभीर्य जपलं त्या गांभीर्यापासून मात्र कोसो दूर असल्याचे चित्र आज पाहायला मिळते. गाव-गल्लीत, पान टपऱ्यांवर, सार्वजनिक उद्याने, शाळा, महाविद्यालये वा फेरीवाल्याकडे आकर्षक पॅकिंगमध्ये लटकत असलेली चटक-



मटक यासारखे डझनांहून अधिक स्नॅक्स खरोखर बालकांच्या आरोग्यास पोषक आहेत का? एवढा विचार करण्याची फुरसत मात्र पालकांकडे नसल्याचं चित्र आज सर्रास आपणास दिसते. जिभेच्या स्वादापोटी कित्येक घातक रसायने स्नॅक्सच्या माध्यमातून बालकांच्या पोटात दररोज सर्रास चालली. याबाबत कोणीच गांभीर्याने विचार करताना दिसत नाही. उघड्या डोळ्यांनी पोटच्या गोळ्याला कुपोषित बनविण्याची मूकसंमती आपण देत आहोत. 'कळते पण वळत नाही' या उक्तीप्रमाणे मूग गिळून गप्प आहोत. बालकाची भूक मंदावणे, अल्पवयातील लठ्ठपणा, लवकर थकवा येणे, शरीराची अकार्यक्षमता व दिवसेंदिवस कमी होत चाललेली रोगप्रतिकारक क्षमता. ही दृश्य लक्षणे उघड्या डोळ्यांनी पाहूनसुद्धा प्रत्येक कुटुंबातील मुले सर्रास चटपटा स्नॅक्स खाताना दिसतात. या देशाचे रक्षण करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी या भावी पिढीवर आहे. भविष्यात खरेच या बालकांच्या मनगटात तेवढे सामर्थ्य राहील का, याचा विचार करणे नितांत गरजेचे आहे. वाढती लोकसंख्या व या भयंकर महागाईच्या काळात स्नॅक्सच्या जुन्या पद्धतीचा स्वीकार करणे थोडे अवघड नक्कीच आहे, परंतु अशक्य मात्र नाहीच.

**विनोद तात्याजी मडावी**/यवतमाळ

### नामांकन वापरण्याची सुविधा

अधूनमधून बँकिंग संस्था ग्राहक/गुंतवणूकदाराच्या फायद्यासाठी नामांकन सुविधेचा वापर करण्याचा आग्रह धरत असतात. मी या बाबतीत माझा प्रत्यक्ष अनुभव सामायिक करू इच्छितो की नामांकन सुविधेचा वापर अवश्य करावा. अलिकडच्या काळात माझ्या आईचे निधन झाले आणि त्यामुळे त्यांची बचत बँक खाती बंद करण्याचा आणि त्यातून पैसे काढण्याचा प्रश्न माझ्यासमोर आला. या उद्देशासाठी प्रक्रियात्मक औपचारिकता पूर्ण करण्यासाठी मी संबंधित राष्ट्रीयीकृत बँकेशी संपर्क साधला तेव्हा, अर्ज औपचारिकपणे सादर करताना संबंधित अधिकाऱ्याने मला कळवले की माझ्या आईच्या खात्यात त्यांच्या संगणकात उपलब्ध असलेल्या डेटानुसार नामांकन नाही आणि म्हणून त्यांना उत्तराधिकार/कायदेशीर वारस प्रमाणपत्र इत्यादी दाखल करण्याची दुसरी प्रक्रिया अवलंबावी लागेल, जी मला वाटली ती एक कठीण प्रक्रिया आहे. बँक अधिकाऱ्यांच्या सूचना स्वीकारण्यास मी अनिच्छुक असल्याने, बँक अधिकाऱ्यांना खाते उघडताना आईने दाखल केलेल्या मूळ अर्जाची कागदपत्रांसह पडताळणी करून खात्री करण्याचा आग्रह धरला. अधिकाऱ्यांनी माझी विनंती मान्य केली आणि एक किंवा दोन दिवस वाट पाहण्यास सांगितले आणि या प्रकरणात मदत करण्याचे आश्वासन दिले आणि माझ्या सेल नंबरवर पुढील प्रगती कळविण्यात येईल असे सांगण्यात आले. माझ्या विनंतीनंतर अधिकाऱ्यांनी एकत्रित प्रयत्न केले आणि काही तासांतच त्यांच्याकडून हे जाणून आश्चर्यचकित झाले की माझ्या आईने खाते उघडण्यासाठी केलेल्या मूळ अर्जात तिच्या मोठ्या मुलाच्या नामांकनाचा विशिष्ट उल्लेख आहे. तरीही अधिकारी दुविधेत होते की हे नामांकन बँक अधिकाऱ्यांकडून स्वीकारले जाईल की नाही. मी कोणतीही प्रतिक्रिया न देता अधिकाऱ्याला माझी विनंती खाती बंद करण्यासाठी आणि मृत खात्यातील उर्वरित रक्कम नामांकित व्यक्तीच्या खात्यात हस्तांतरित करण्यासाठी उच्च अधिकाऱ्यांकडे पाठविण्यास सांगितले.

येथे, मला हे सांगण्यास आनंद होतो की बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अर्जात केलेले नामांकन स्वीकारले आणि खाते बंद करण्यासाठी आणि नामांकित व्यक्तीच्या खात्यात रक्कम हस्तांतरित करण्यासाठी औपचारिकपणे सर्व प्रक्रिया पूर्ण केल्या. अर्थात, मी अधिकाऱ्यांचा आभारी आहे आणि बँकेने नामांकनासंदर्भात दिलेल्या सुविधेबद्दलही तितकाच आभारी आहे. मी सर्व संबंधितांना विनंती करतो की त्यांनी मृत व्यक्तीचे खाते बंद करण्याशी संबंधित पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी नामांकन सुविधेचा नेहमीच वापर करावा.

**श्रीकांत हडप**/नागपूर

### मोबाईल पार्किंग एक उपाय

आजच्या युगात स्मार्ट फोन हा माणसाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. संवाद, शिक्षण, व्यवहार, मनोरंजन यासारख्या अनेक गरजा मोबाईलद्वारे पूर्ण केल्या जातात. परंतु या तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे अनेक गंभीर सामाजिक आणि वैयक्तिक समस्या निर्माण होताना दिसतात. मोबाईलच्या अतिवापरामुळे सर्वप्रथम आरोग्यावर परिणाम होताना दिसत आहेत. सततच्या मोबाईल वापरल्यामुळे मान, पाठ व हात दुखणे, मानसिक थकवा आणि नैराश्याची लक्षणे दिसून येतात. झोपेच्या वेळेचे उल्लंघन आणि स्क्रीनकडे सतत पाहिल्यामुळे डोळ्यांचे आणि मेंदूचे नुकसान होण्याची शक्यता जास्त आहे. यासोबतच शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवरही त्याचा विपरीत परिणाम होऊन मानसिक तणावामुळे अभ्यासाऐवजी मोबाईलवरील गेम्स आणि सोशल मीडियाकडे त्यांचे लक्ष जास्त जाते. शिक्षणासाठी इंटरनेट गरजेचे असले तरी त्यात दुष्परिणाम होण्याचे प्रमाण अधिक असते. अनेक वेळा मुले ऑनलाईन क्लासच्या नावाखाली मोबाईलवर गेम्स खेळताना दिसतात, ते चिंताजनक आहे.

मोबाईलमुळे कुटुंबातील संवाद कमी होत आहे. प्रत्येक जण आपल्या मोबाईलमध्ये व्यस्त असल्याने घरातील सदस्यांमध्ये नातेसंबंध ढासळतात. जेवणाच्या वेळी किंवा एकत्र बसण्याच्या क्षणी देखील मोबाईलचा अडथळा येऊन त्याचा परिणाम कौटुंबिक नात्यांवर होतो. मुलं आणि प्रौढ दोघेही सोशल मीडियावर, गेमिंगमध्ये अथवा व्हिडीओ पाहण्यात तासन्तास घालवतात. अनेक वेळा घरातील सदस्य खाजगी माहिती ऑनलाईन शेअर करतात, ज्याचा गैरवापर होण्याचा धोका असतो. या समस्येवर उपाय म्हणून 'मोबाइल पार्किंग' ही संकल्पना अत्यंत उपयुक्त ठरू शकते. घरामध्ये एक ठरावीक जागा आणि वेळ मोबाईल ठेवण्यासाठी ठरवणं म्हणजे मोबाईल पार्किंगमुळे अनेक फायदे होऊ शकतात. मोबाईल पार्किंगमुळे वेळेचे योग्य नियोजन करता येते. जेवणाच्या वेळेस, झोपण्याच्या आधी आणि कौटुंबिक वेळेत मोबाईलचा वापर टाळता येतो. यामुळे मोबाईल वापरावर वेळेची मर्यादा आपोआप लागू होईल. पालकांनी स्वत: मोबाईल शिस्तीत वापरून मुलांसमोर आदर्श ठेवणे आवश्यक आहे, कारण सांगण्यापेक्षा दाखवलेला आदर्श अधिक प्रभावी असतो. मोबाईल पार्किंगमुळे कौटुंबिक संवाद वाढवण्यास मदत होते. दिवसातून एकदा तरी संपूर्ण कुटुंबाने एकत्र बसून संवाद साधल्यास मोबाईलमुळे निर्माण झालेले अंतर भरून निघेल आणि पालक व मुलांमध्ये संवादाचे बंध अधिक घट्ट होतील. रात्री झोपण्याच्या एक तास आधी मोबाईल पार्किंगमध्ये ठेवण्याची सवय लावल्यास डोळ्यांचे आणि मानसिक आरोग्याचे रक्षण होईल. तसेच अनावश्यक नोटिफिकेशन्स बंद करून सतत मोबाईलकडे लक्ष जाण्याची सवय कमी करता येईल. मोबाईल पार्किंगमुळे स्क्रीन टाईमवर व विविध ॲप्सच्या साहाय्याने कोणत्या ॲप्सवर किती वेळ खर्च होतो हे लक्षात घेऊन त्यावर नियंत्रण ठेवता येईल. मुलांना गेम्स ऐवजी शैक्षणिक, सर्जनशील ॲप्स वापरण्याचे प्रोत्साहन देऊन मोबाईल शिवाय करमणुकीचे अनेक पर्याय उपलब्ध करून देता येऊ शकतात. जसे की खेळ, वाचन, बागकाम, हस्तकला इत्यादी. यामुळे मुलांमध्ये सर्जनशीलता वाढते.

मोबाईल उपयुक्त आहे, पण त्याचा अतिवापर आपल्या आरोग्याचे, नातेसंबंधांचे आणि भविष्याचे नुकसान करू शकतात. यावर उपाय म्हणून घराघरात मोबाईल पार्किंगची अंमलबजावणी केली पाहिजे. ही संकल्पना योग्य पद्धतीने राबवली तर मोबाईलचा दुरुपयोग निश्चितच कमी करता येईल. त्यामुळे मोबाईलचा शिस्तबद्ध आणि उद्देशपूर्ण वापर ही काळाची गरज आहे.

**समीर मुकुंदराव थोडगे**/९२२६५८७१७८

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रायगडवाडी नामकरणाबद्दल पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या दुर्गराज किल्ले श्री रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या छत्र निजामपूर या गावाचे नामकरण रायगडवाडी करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल ग्रामविकास मंत्री आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा आमदार देवेंद्र कोठे व शिवभक्त गुरुशांत धुत्तरगांवकर यांनी शनिवारी सन्मान केला.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांनी दुर्गराज किल्ले श्री रायगडाला राजधानी बनविले. बऱ्याच काळापासून दुर्गराज किल्ले श्री रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या रायगडवाडीचे नाव बदलून छत्र निजामपूर असे करण्यात आले होते. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी छत्र निजामपूरचे नामकरण रायगडवाडी करण्याचा निर्णय जाहीर केला. त्याबद्दल आमदार देवेंद्र कोठे आणि मित्र परिवारातर्फे शनिवारी ग्रामविकास मंत्री आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगांवकर, पवन खांडेकर, सागर भोसले, आकाश भोसले, अभिषेक चिंता, अंबादास सकिनाल, धनराज दुडम आदी उपस्थित होते.

### महत्वाचे...

## सुभाष बुबणे स्मृती टेबल टेनिस स्पर्धा दोन ऑगस्टपासून

**सोलापूर, दि. १९ जुलै-**

स्वर्गीय सुभाष भालचंद्र बुबणे स्मृती करंडक जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धा २ व ३ ऑगस्ट रोजी पार्क स्टेडियमवरील मुळे पॅव्हेलियनमध्ये आयोजित केली आहे. ही स्पर्धा ११, १४, १७ वर्षे मुले व मुली आणि महिला व पुरुष आणि प्रौढ एकेरी गटात होईल.२ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ६ वाजता ११ वर्षे मुले व मुली, १४ वर्षे मुले तसेच ७.३० वाजता पुरुष एकेरी व प्रौढ एकेरीचे सामने होतील. ३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता १४ वर्षे मुली १७ मुले व मुली आणि महिला एकेरीचे सामने होतील. संध्याकाळी ४.३० वाजता सर्व अंतिम सामने होतील. सायंकाळी ७ वाजता स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ होईल. प्रवेशिका १ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ५ ते ८ या वेळेत झेड. एम, पुणेकर यांच्याकडे स्वीकारले जातील. स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी भाग घेवून स्पर्धा यशस्वीपणे पार पाडून सहकार्य करावे, असे आवहान हर्षवर्धन बुबणे व सोलापूर ज़िल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ राजीव प्रधान यांनी केले आहे.



## राजेश मदने यांना पीएचडी पदवी

**सोलापूर, दि. १९ जुलै-**

महावितरणच्या सोलापूर उपविभागातील अतिरिक्त कार्यकारी अभियंता राजेश तानाजीराव मदने यांना पीएचडी पदवी प्राप्त झाली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे 'पीएचडी' पदवीचा अभ्यासक्रम पूर्ण केला. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेडमधील जनसंपर्कांचे अनुभवजन्य विश्लेषण; सोलापूर मंडळाचा अभ्यास.. हा पीएचडीचा विषय होता. शनिवारी परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे यांनी राजेश मदने यांना पदवी पूर्ण झाल्याचे पत्र दिले. या यशाबद्दल महावितरण सोलापूर मंडळाचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांनी राजेश मदने यांचे कौतुक केले. मदने यांनी एस. एल. बिराजदार, प्राचार्य डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. पी. एन. कोळेकर, सोशल कॉलेजचे मुल्ला, दयानंदचे डॉ. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी पूर्ण केली.



## 'बीगसी'चे प्रा. सचिन गाडे यांना पीएच.डी

**सोलापूर, दि. १९ जुलै-**

भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकीचे प्रा. सचिन गाडे यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ही पीएच.डी. पदवी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरने प्रदान केली. प्रा. गाडे यांनी ''Non-Integer Order Robust Auto Tuning Method for Fractional Order PID Controller using Progressive Estimation Technique with Numerical Approximation of Caputo Definition" ' या विषयावर संशोधन पूर्ण केले. या संशोधन कार्यासाठी प्रा. डॉ. महेश कुंभार (आर.आय.टी., इस्लामपूर) हे मार्गदर्शक म्हणून कार्यरत होते. या संशोधनात Caputo fractional derivative च्या संख्यात्मक सन्निकटनावर आधारित Progressive Estimation Technique चा वापर करून Fractional Order PID Controller चे ट्यूनिंग अधिक प्रभावी आणि मजबूत स्वरूपात विकसित करण्यात आले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल प्रा. गाडे यांचे बीगसीचे चेअरमन इंजि. रविद्रंजी गायकवाड, सचिवा अनामिकाजी गायकवाड, प्राचार्य डॉ. अनिल देशमाने यांनी अभिनंदन केले.



## नडगिरी पेट्रोल पंपासमोरून २ लाखांची रिक्षा चोरीस

**सोलापूर, दि. १९ जुलै -**

शहरातील विजापूर रोडवरील नडगिरी पेट्रोल पंपासमोरून चोरट्याने डुप्लीकेट चावीचा वापर करून २ लाख रुपये किंमतीची रिक्षा चोरून नेली. याबाबत अजय दगडू चव्हाण (वय २७, रा. प्रताप नगर तांडा, विजापूर रोड, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजय चव्हाण याने १६ जुलै रोजी रात्री त्याची एमएच १३ सीटी ३७६८ क्रमांकाची रिक्षा ही नडगिरी पेट्रोल पंपासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती रिक्षा डुप्लीकेट चावीने लॉक उघडून चोरट्याने चोरून नेल्याची नोंद विजापूर नाका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार परदेशी पुढील तपास करीत आहेत.

# रे नगरातील ३० हजार श्रमिकांना देणार रोजगार

- म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जैस्वाल यांची ग्वाही;
- वन महोत्सव, सौरऊर्जा व रोजगार संधीसाठी रे नगरचा पुढाकार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

पंतप्रधान आवास योजना शहरी अंतर्गत कुंभारी येथे साकारलेला ३० हजार असंघटीत कामगारांचा महत्त्वाकांक्षी व पथदर्शी गृहनिर्माण प्रकल्प म्हणून रे नगरचा सर्वत्र गौरव झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पहिल्या टप्प्यातील पंधरा हजार घरांचा लोकार्पण सोहळा पार पडला. या वसाहतीतील लाभार्थ्यांना हक्काच्या घरांसोबत हाताला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी म्हाडा कटिबद्ध असून किमान २५० कोटी बीज भांडवल उपलब्ध करून देण्याची ग्वाही म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजीव जयस्वाल यांनी दिली.

या वन महोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्र वन विभागाने हरित महाराष्ट्र - समृद्ध महाराष्ट्र अभियानांतर्गत २०२५ साली १० कोटी झाडे लावण्याची मोहीम राबविली असून, वन महोत्सव अमृतवृक्ष/आपल्या/दारी- जनसामान्य, संस्था आणि सरकारी यंत्रणांद्वारे वृक्षसंवर्धनाला मोठ्या प्रमाणावर भाग घेण्यासाठी सक्षम करते. या उपक्रमांतर्गत रोपे, संगोपनाचे बंधन, आणि सामाजिक सहभाग या सर्वांचा समावेश आहे. जे लाभार्थी लागवड केलेल्या वृक्षांचे संवर्धन करतील, त्यांना ५ तोळे चांदीचे नाणे पुरस्कार देण्याची घोषणा केली. शनिवार, दि. १९ जुलै रोजी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व रे नगर फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वन महोत्सव २०२५ च्या माध्यमातून कुंभारी येथे वसलेली श्रमिकांची वसाहत रे नगर येथे २१ हजार वृक्षांची लागवड, सौरऊर्जा व लाभार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याकामी बीज भांडवल पोटी अनुदान देण्याकामी कार्यक्रमाचे आयोजन चेअरमन कॉ. नलिनी कलबुर्गी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

यावेळी रे नगर चे मुख्य प्रवर्तक तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी मागणी केली की, रे नगर फेडरेशनच्या माध्यमातून सुरू असलेल्या घरकुल प्रकल्पात केंद्र सरकारकडील ४३.५६ कोटींची अनुदान रक्कम प्रलंबित आहे. केंद्र शासनाच्या नवीन आदेशांनुसार ही रक्कम मिळण्यास सुमारे दोन महिने लागणार आहेत. त्यामुळे कामात अडथळे येत आहेत. या पार्श्वभूमीवर, म्हाडाने सदर रक्कम तात्पुरती उपलब्ध करून द्यावी, आणि अनुदान प्राप्त झाल्यानंतर ती परत केली जाईल, अशी आमची मागणी आहे.

राष्ट्रीयकृत बँकेद्वारे पहिल्या टप्प्यातील १२०६१ लाभार्थ्यांना २५३.८२ कोटींचे कर्ज रक्कम वितरीत करण्यात आली आहे. त्यापैकी२१४ लाभार्थ्यांनी संपूर्ण रक्कम भरली आहे, तर ४५१३ लाभार्थी नियमित गृहकर्जाचे हप्ते भरत आहेत. मात्र, ५६६७ लाभार्थी गृहकर्जाचे हप्ते अदा करण्यात दिरंगाई करत असून, त्यांच्यावर थकबाकीमुळे शासन व बँकेमार्फत फौजदारी व दिवाणी कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशा सर्व लाभार्थ्यांना आवाहन आहे त्यांनी वेळेवर गृहकर्जाचे थकीत हप्ते तातडीने भरून सहकार्य करावे. दुसऱ्या टप्प्यातील घरकुल उभारणीची प्रगती उत्साहवर्धक असून, आजपर्यंत २३३६८ घरांना RCC स्लॅब पूर्ण झाले आहेत आणि २५२१० घरांना बांधकाम परवाने मंजूर झाले आहेत. उर्वरित घरांचे काम पूर्ण करण्यासाठी २५० कोटी बीज भांडवलाची गरज आहे. ही रक्कम महाराष्ट्र शासनाने त्वरीत उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली तसेच माहे ऑक्टोबर पर्यंत सुमारे १५००० कुटुंबे रे नगरमध्ये वास्तव्यास येणार आहेत. या कार्यक्रमात महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण तसेच रे नगर फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून त्याचा शुभारंभ म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, म्हाडा मुंबईचे मुख्याधिकारी मिलिंद शंभरकर, मुख्य अधिकारी राहुल साकोरे, रे नगरचे मुख्य प्रवर्तक आडम मास्तर, नलिनी कलबुर्गी, युसूफ मेजर, वित्त नियंत्रक अजयसिंह पवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, प्रांताधिकारी सुमित शिंदे, माजी नगरसेविका कॉ कामिनी आडम, कॉ.एम एच शेख, उद्योजक प्रल्हाद काशीद उपस्थित होते. प्रास्ताविक संस्थेचे सचिव कॉ युसुफ शेख मेजर यांनी केले.



## 'लोकमंगल'ची २८ वी वार्षिक सभा खेळीमेळीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जुलै-**

लोकमंगल को. ऑप बँकेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा हि. ने. वाचनालय येथील लोकमान्य टिळक सभागृह येथे आज (दि. १९) अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

यावेळी आ. सुभाष देशमुख यांची सभाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. सन २०२४-२५ सालात बँकेच्या दिवंगत संचालक, सभासद, खातेदार व देशासाठी प्राणांची आहुती देणा-या शूर वीरांना श्रध्दांजली वाहण्यात आली. याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष आमदार देशमुख यांनी सर्व सभासद हे बँकेचे मालक असून, त्यांनी वेळोवेळी शाखेत जाऊन आपल्या असलेल्या शंकेचे निरसन करून घ्यावे. वार्षिक सर्व साधारण सभेला जास्तीत जास्त सभासदांनी उपस्थित राहावे; जेणे करून हा दिवस सभासदांच्या हक्कांचा दिवस असतो. बँकेचे सभासद हे जेष्ठ नागरिक असून, त्यांनी आपल्या आयुष्यातील वेळ हा आता सामाजिक उपक्रमात घालवावा. ज्या सभासदांचे भाग भांडवल कमी आहे, त्यांना भाग भांडवल वाढविण्याचे आवाहन केले.

बँकेच्या विविध योजनामधील बँकेतून रु. १००० कोटी कर्ज वाटपाचा संकल्प आहे व आई योजना मार्फत याचा लाभ गावस्तरावर घ्यावा. सोलापूर नावारूपास येण्यासाठी पर्यटन सप्ताह राबविण्यासाठी सर्वांनी सहभाग नोंदवावा. जिल्ह्यातील तसेच, परजिल्हा राज्यातील लोकांना २७ सप्टेबर रोजी जागतिक पर्यटन दिनानिमित साजरा होणाऱ्या सप्ताहास निमंत्रण देणे. जिल्हयातील पर्यटन केंद्रांना धार्मिक स्थानकांना भेटी द्याव्या. २७ सप्टेबर ते २ ऑक्टोवर या सप्ताहात जास्तीत जास्त पर्यटकांना निमंत्रण देऊन सहभागी करून घ्यावे, असे आवाहन केले व सभासदांना ७% प्रमाणे लाभांश जाहीर केला गेला. अहवाल वर्षात बँकेच्या ठेवी ६०२ कोटी, कर्जे ४१५ कोटी, बँकेचा सीआरएआर १७.४३%, निव्वळ एनपीए २.४९% तर बँकेला ऑडिट वर्ग अ मिळालेला असून, निव्वळ नफा ४ कोटी ०८ लाख इतका झालेला आहे. यावेळी सभासदाच्या गुणवंत पाल्याचाही सत्कार करण्यात आला.

२८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला बँकेचे उपाध्यक्ष प्रदिप नागणे, देवानंद चिलवंत, सतिश लामकाने, जॉन चोप्रा, अनंता चव्हाण, प्रल्हाद कांवळे, नरेंद्र काटीकर, निलेश पटेल, जितेंद्र नाईक, सिध्दार्थ सर्जे, अशोक सापटणेकर, उज्वला चेळेकर, शितल कोकाटे, विजय कुलकर्णी, अभिजीत टाकळीकर, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशसिंह वायस तसेच बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## महिला ग्राहकांची पहिली पसंती म्हणजेच व्ही. आर. पवार

- संचालक राजेश पवार; ५० ते ७० टक्के डिस्काउंट
- महाराष्ट्रातील साड्यांचा मोठा सेल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

महाराष्ट्रातील साड्यांचा सर्वात मोठा सेल सर्वात मोठ्या साडी शोरूममध्ये सुरू झाला आहे. आणि व्हि. आर. पवार म्हणजे..! महिला ग्राहकांचा नियमित प्लॅन असतो सेलमध्ये साडी खरेदीचा, असे मत व्हि. आर. पवार सारीजचे संचालक राजेश पवार व्यक्त केले. अत्यंत नावाजलेल्या चाटी गल्ली येथील व्हि. आर . पवार शोरूम मध्ये सेल सुरू झाला असून यामध्ये पन्नास ते ७० टक्क्यापर्यंतची महिला ग्राहकांची महाबचत होत आहे. यामुळे महिला ग्राहकांनी खरेदीसाठी गर्दी केली आहे.

या महा सेलमध्ये सुटिंग - शर्टींग, ड्रेस मटेरियल, गाऊन, वन पीस, क्रॉप टॉप, कुर्ती, लेडीज होजिअरी तसेच प्रीमियम साडी, ब्रायडल शालू, पैठणी, काठपदर साडी सारख्या २४०० ते ३०००च्या साड्या अगदी १५०० ते २००० रुपयांमध्ये मिळत आहेत.



महिलांच्या आवडीच्या दर्जेदार साड्या सुद्धा व्हि. आर. पवार यांच्या सेल मध्ये मिळतात..! तसेच एकमेकाला आहेर सुद्धा करता यावेत म्हणून देखील आमच्याकडे भारी भारी साड्या खरेदी करण्याकरीता सोलापूर, लातूर, धाराशिव येथील महिला वर्ग मोठ्या प्रमाणात खरेदी करिता येत असतात.

**- गिरीश पवार**
संचालक व्हि. आर. पवार सारीज सोलापूर

त्यामुळे ग्राहक तसेच लातूर, धाराशिव, पुणे, मुंबई येथून आलेल्या महिला ग्राहकांनी खास सेलच्या दरात असलेल्या मनपसंद साड्या खरेदी करण्यासाठी व्हि. आर. पवार शोरुमला आवर्जून भेट देत आहेत. या महासेलमुळे मोठया प्रमाणात खरेदीसाठी झुंबड उडाल्याचे दिसून येत आहे. तसेच महिला वर्ग आपल्या आवडीच्या साड्या अगदी कमीत कमी दरात मिळत असल्याने खरेदी करिता गर्दी करीत आहेत. या महाबचत सेलचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमर पवार, महेश पवार, गिरीश पवार यांनी केले आहे.

## राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष तटकरेंच्या उपस्थितीत उद्या राष्ट्रवादीचा मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

आगामी महापालिका व जिल्हा परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने पक्ष संघटन वाढीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत सोमवार, दि. २१ जुलै रोजी दुपारी २ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात शहरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संतोष पवार व कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी शनिवारी राष्ट्रवादी भवनात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

या मेळाव्यात अन्य पक्षातील काही पदाधिकाऱ्यांचा पक्ष प्रवेशही होणार आहे. आगामी महापालिका निवडणूक आम्ही महायुती म्हणूनच लढणार असून, जास्तीत जास्त जागा निवडून आणण्यासाठी आम चा प्रयत्न राहणार असल्याचे पवार व बागवान यांनी यावेळी सांगितले. यावेळी व्यासपीठावर शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, जेष्ठ नेते चंद्रकांत दायमा, हेमंत चौधरी, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, महिला आघाडी प्रदेश सरचिटणीस सायरा शेख, कार्याध्यक्ष चित्रा कदम, युवक अध्यक्ष सुहास कदम, सेवादल विभाग अध्यक्ष प्रकाश जाधव,अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष अमीर शेख, कार्याध्यक्ष संजीव मोरे, विद्यार्थी अध्यक्ष अनिकेत व्हसुरे, दिव्यांग सेल विभाग अध्यक्ष एम एम इटकळे, सहकार सेल विभाग अध्यक्ष भास्कर आडकी, शहर सचिव दत्तात्रय बनसोडे, मौला शेख, वाहतूक सेल विभाग अध्यक्ष इरफान शेख, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख बसवराज कोळी, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष अनिल बनसोडे, सोशल मीडिया शहराध्यक्ष वैभव गंगणे, कार्याध्यक्ष सोमनाथ शिंदे, मध्य विधानसभा अध्यक्ष अल्मेहराज आबादीराजे, अल्पसंख्याक विभाग जनरल सेक्रेटरी अशपाक कुरेशी, दक्षिण विधानसभा अध्यक्ष अशपाक कुरेशी, शहर उत्तर विधानसभा अध्यक्ष मनोज शेरला, संघटक प्रकाश झाडबुके, शकील शेख अनिस शेख, निशांत तारानाईक, वाहतूक सेल उपाध्यक्ष हमीद बागवान, मुकेश चौधरी, सरदार फटफटवाले यांच्यासह प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### राष्ट्रवादी बळकटीसाठी खा. तटकरे यांचा महाराष्ट्र दौरा

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका व जिल्हा परिषद निवडणुकांच्या अनुषंगाने पक्ष संघटन वाढीसाठी व येणाऱ्या काळात पक्षाचे नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांचे हात बळकट करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे हे महाराष्ट्र दौरा करत असून, त्याच पार्श्वभूमीवर सोमवारी ते सोलापूर दौऱ्यावर येतायत. त्यानिमित विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

**– संतोष पवार,** राष्ट्रवादी शहराध्यक्ष (अजितदादा गट)

## बांगर प्रकरणी समाजकल्याण अधिकाऱ्यांवर राजकीय दबाव

**सोलापूर , दि. १९ जुलै-**

सोलापूर जिल्हा परिषदेचे तत्कालीन वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता सच्चिदानंद बांगर यांच्यावर अन्याय झाला असून समाजकल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे यांनी राजकीय दबावपोटी चौकशी केल्याचे निवेदन कास्ट्राईब माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक संघटनेकडून सीईओंना दिला आहे.

**कास्ट्राईब संघटनेचे सीईओंना निवेदन**

बांगरला आपली बाजू मांडायला संधी दिली नाही. राजकीय दबावपोटी संबंधित कर्मचाऱ्यांच्या परस्पर घाईगडबडीने हा अहवाल सादर केला आहे. समाज कल्याण अधिकारी हे अंतिम निर्णय अधिकारी असतात. कुठलाही आदेश प्रशासकीय मान्यता, वेतन देयके, कोणतेही पत्र हे जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने पाठविण्यात येतात. मग वर्ग तीनचा कर्मचारी अनियमितता कशी करू शकतो? याची चर्चा जिल्हा परिषदेच्या सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये होताना दिसून येत आहे. तक्रारदार आबासाहेब आतकरे यांची तक्रार शासनाने कशी काय विचारात घेतली ? त्यामागे कोणाचा स्वार्थ साधला जातोय. याचीही चौकशी होणे आवश्यक आहे. तसेच अतकरे यांची गुरुदेव मूकबधीर निवासी शाळेतील केलेली पदभरती निवड प्रक्रिया नियमबाह्य असून त्याची सखोल चौकशी करण्यात यावे. अन्यथा कास्ट्राईब संघटना आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष प्रा. जाधव यांनी दिला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे

### भारताचा मिश्र संघ उपांत्यपूर्व फेरीत

**सोलो** : इंडोनेशिया येथे शनिवारी झालेल्या गट ड सामन्यात संयुक्त अरब अमिरातीविरुद्ध ११०-८३ असा दमदार विजय मिळवत भारताने आशिया चषक कनिष्ठ गट मिश्र सांघिक बॅडमिंटन स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत स्थान निश्चित केले. शुक्रवारी भारताने श्रीलंकेविरुद्धच्या प्रभावी पहिल्या दिवशी केलेल्या विजयानंतर हा विजय मिळाला. हाँगकाँग चीननेही तितक्याच सामन्यांमधून दोन विजय नोंदवले आहेत, त्यामुळे दोन्ही संघांनी आता बाद फेरीत प्रवेश निश्चित केला आहे. गट डी विजेते निश्चित करण्यासाठी दोन्ही संघ रविवारी लढतील. मुलींच्या एकेरीत ऋजुला रामूने मायशा खानला ११-५ असे पराभूत केले, त्यानंतर सी. लालरामसांगा आणि तारिनी सुरी या मिश्र दुहेरी जोडीने २२-११ अशी आघाडी वाढवली. त्यानंतर तन्वी शर्माने मधुमिता सुंदरपांडियनविरुद्ध ६६-४६ अशी आघाडी वाढवली. लालरामसंगाने कोर्टवर पुनरागमन केले, यावेळी दुसऱ्या मिश्र दुहेरीत रेशिका यू सोबत भागीदारी केली, जिथे त्यांनी आदित्य किरण आणि मायशा खान यांना ११-५ असे हरवून भारताला ७७-५१ अशी आघाडी मिळवून दिली. भारत आता रविवारी हाँगकाँग चीनविरुद्ध विजय मिळवून गटात अव्वल स्थान मिळवण्याचा प्रयत्न करेल.

### ऋतुराज गायकवाडचा यॉर्कशायरशी करार रद्द

**लंडन** : भारताचा मधल्या फळीतील फलंदाज ऋतुराज गायकवाडने 'वैयक्तिक कारणांमुळे' यॉर्कशायरसाठी कौंटी क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम भागातून माघार घेतली आहे.



२८ वर्षीय ऋतुराजने २२ जुलैपासून स्कारबोरो येथे विद्यमान विजेत्या सरेविरुद्धच्या सामन्यापासून पाच सामन्यांच्या करारावर सहमती दर्शविली होती, पण यॉर्कशायरने एका निवेदनात गायकवाड उपलब्ध नसल्याची पुष्टी केली. गायकवाड मंगळवारी नॉर्थ मरीन रोडवर विद्यमान विजेत्या संघाविरुद्ध पदार्पण करणार होता व हंगामाच्या शेवटपर्यंत तो यॉर्कशायरसोबतच राहणार होता. दुर्दैवाने गायकवाड वैयक्तिक कारणांमुळे यॉर्कशायर संघात दाळक होत नाही. आम्ही संभाव्य बदली खेळाडू शोधण्याचा प्रयत्न करत आहोत, असे यॉर्कशायरचे मुख्य प्रशिक्षक अँथनी मॅकग्राथ यांनी सांगितले. इंडियन प्रीमियर लीगमध्ये चेन्नई सुपर किंग्ज आणि रणजी करंडकामध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व करणाऱ्या गायकवाडने सहा एकदिवसीय आणि २३ टी-२० सामने खेळले आहेत. पण कोपराच्या दुखापतीमुळे तो या वर्षीच्या आयपीएलमध्ये केवळ पाच सामने खेळला आहे.

### दुखापतीमुळे ग्लेन फिलिप्स टी-२० मालिकेतून बाहेर

**हरारे झिम्बाब्वे** : मेजर लीग क्रिकेट २०२५ च्या अंतिम सामन्यादरम्यान न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू ग्लेन



फिलिप्सला उजव्या मांडीला दुखापत झाली आणि तो दक्षिण आफ्रिका आणि यजमानांसह झिम्बाब्वेमध्ये सुरू असलेल्या टी-२० तिरंगी मालिकेतून बाहेर झाला आहे. झिम्बाब्वेमध्ये आगमन झाल्यानंतर न्यूझीलंडच्या खेळाडूवर लक्ष ठेवण्यात आले व आयसीसीच्या अधिकृत संकेतस्थळानुसार त्याला अनेक आठवडे पुनर्वसन करण्याचा सल्ला देण्यात आला. न्यूझीलंडचा उजवा हाताचा फलंदाज टिम रॉबिन्सन उर्वरित टी-२० तिरंगी मालिकेसाठी संघात राहील. मायकेल ब्रेसवेल, फिलिप्स, मार्क चॅपमन आणि रचिन रवींद्र हे एमएलसी खेळत होते आणि त्यामुळे अनेक बदली खेळाडूंना संधी देण्यात आली होती. फिलिप्स देखील कसोटी संघाचा भाग होता आणि त्याच्या जागी योग्य वेळी संघात खेळाडूची निवड केली जाईल.

# गिलची आता खरी परीक्षा : चॅपेल

**नवी दिल्ली, १९ जुलै**

ॲण्डरसन-तेंडुलकर चषक इंग्लंडविरुद्धच्या पच सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारतीय संघाचा कर्णधार शुभ मन गिलने उत्कृष्ट कामगिरी केलीआहे. एक युवा कर्णधार म्हणूने त्याने आपल्या क्षमतेची झलक दाखविली आहे, परंतु मालिकेत सध्या भारत १-२ ने पिछाडीवर असल्यामुळे त्याची खरी परीक्षा आता सुरू होतेय्, असे ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार ग्रेग चॅपेल यांनी म्हटले आहे.

लॉर्ड्स येथे झालेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात भारताने इंग्लंडविरुद्ध २२ धावांनी पराभव पत्करला व मालिकेत १-२ ने पिछाडीवर राहिला. २३ जुलैपासून मॅन्चेस्टर येथे होणाऱ्या मालिकेतील चौथ्या कसोटी सामन्यात दोन्ही संघ आमने-सामने उभे ठाकणार आहे.

कसोटी मलिकेतील उर्वरित दोन कसोटी सामन्यासाठी तयारी करत असताना संघ व्यवस्थापानाने २५ वर्षीय शुभमन गिलवर लक्ष केंद्रित केले आहे. शुभमन हा एक तेजस्वी तरुण प्रतिभावान खेळाडू आहे, त्याने फलंदाजीने उत्कृष्ट फलंदाजी केली व आपल्या कणखर संघ नेतृत्व क्षमतेची झलक दाखवली आहे, परंतु हा क्षण कसोटी कर्णधार म्हणून त्याची वाटचाल निश्चित करेल, असे चॅपेलने आपल्या स्तंभात लिहिले आहे.

गिलने आपल्या कृतींनी संघासाठी सूर निश्चित करावा असे वाटते. गिलने भारताला कोणत्या प्रकारचा संघ हवा आहे हे परिभाषित करावे. कर्णधार केवळ शब्दांनीच नव्हे तर कृतींनी, उद्देशाच्या स्पष्टतेने सूर निश्चित करतो.

याचा अर्थ मैदानात शिस्त लावणे आवश्यक आहे. भारताला पुन्हा एकदा वाईट क्षेत्ररक्षण संघात बदलणे परवडणारे नाही. सर्वोत्तम संघ मैदानात उत्कृष्ट असतात. ते सहज धावा देत नाहीत. ते संधी सोडत नाहीत, असे त्यांनी लिहिले.



आपल्याला सामना जिंकून देईल असे वाटत असलेला संघ निवडताना गिलने ठाम रहावे, असा सल्ला चॅपेलने दिला आहे.

गिल व निवडकर्त्यांनी संघाची निवड केली पाहिजे व ते टिकून राहिले पाहिजे. त्याने ज्या खेळाडूंवर विश्वास ठेवला, तो त्यांचा मुख्य गट ओळखला पाहिजे. एक स्पष्ट रणनीती आखली पाहिजे. प्रत्येक खेळाडूंवर त्यांच्या वैयक्तिक भूमिकांबद्दल माहिती दिली पाहिजे. प्रत्येक खेळाडूला त्यांच्याकडून काय अपेक्षा आहे व त्यांची काय जबाबदारी याची माहिती असली पाहिजे, असेही ते म्हणाले.

बऱ्याचदा, संघर्ष करणाऱ्या संघांमध्ये खेळाडूंना स्वतःसाठी ते ठरवावे लागते. अशा या परिस्थितीत संधी सोडता येत नाही, असे ऑस्ट्रेलियाच्या महान क्रिकेटपटू चॅपेलने म्हटले आहे.


कर्णधार हा एक चांगला संवादक असावा आणि गिलने तो गुण अंगिकारण्याची वेळ आली आहे. महान कर्णधार उत्तम संवादक असतात. गिलने एक उत्तम संवादक झाले पाहिजे. संघमित्रांमध्ये स्पष्ट, शांत संवाद आवश्यक आहे, असे चॅपेल म्हणाले.

गिलची बॅट नेहमीच तळपेल असे नाही, तेव्हा त्याने सवंगड्यासोबत अशा प्रकारे संवाद साधायला हवा की, त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण व्हायला हवा व त्यांना प्रोत्साहन मिळायला हवे. त्याने योग्य दृष्टिकोन स्पष्ट केला पाहिजे. फलंदाजांना सकारात्मक खेळण्यास आणि भागीदारीत फलंदाजी करण्यास सांगितले पाहिजे, , असेही ते म्हणाले.

जर एखाद्या फलंदाजाला डावाची सुरुवात करण्याची संधी मिळाली, तर त्यांनी मोठी धावसंख्या उभारणे अत्यंत महत्त्वाचे आहे, परंतु ज्या खेळाडूंवर विश्वास ठेवला व त्यांना इतके कठोर परिश्रम करायचे नाहीत तेव्हा अपयश येते, असेही ते म्हणाले.

सातत्यपूर्ण गोलंदाजीद्वारे दबाव निर्माण करणे हे बळी टिपण्याइतकेच महत्त्वाचे आहे. चांगले चेंडू टाकल्यामुळे प्रतिस्पर्धी फलंदाजांवर दबाव निर्माण होतो व त्यातून चुका निर्माण होते. ही जादू नाही, ती पद्धत आहे, असे त्यांनी लिहिले. (वृत्तसंस्था)

### कर्णधार म्हणून अधिकार सिद्ध करण्याची वेळ



गिलने केवळ फलंदाज म्हणून नव्हे, तर एक कर्णधार म्हणून आपला अधिकार सिद्ध करण्याची वेळ आली आहे, कारण भारत दोन सामने शिल्लक असताना मालिकेत पुनरागमन करू इच्छित आहे.

जर गिलला एक उत्तम कसोटी कर्णधार व्हायचे असेल, तर हा त्याचा अधिकार सिद्ध करण्याचा क्षण आहे. केवळ फलंदाजीनेच नाही, तर त्याच्या कुशल संघ नेतृत्वाने, असे त्यांनी लिहिले.

जर गिल विचारांच्या स्पष्टतेसह व उद्देशाच्या ताकदीने नेतृत्व करू शकला, तर तो केवळ या मालिकेला आकार देणार नाही तर तो भारतीय क्रिकेटचे भविष्य घडवेल, असे चॅपेल म्हणाले.

# भारतीय महिलांनी घडवला इतिहास

### फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ

### उपांत्य फेरीसाठी हरिका, दिव्यामध्ये चुरस

**बटुमी, १९ जुलै**

जॉर्जियामध्ये सुरु असलेल्या फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत भारतीय महिला बुद्धिबळपटूंनी इतिहास घडवला. ग्रॅण्डमास्टर कोनेरू हम्पी, नागपूरची आंतरराष्ट्रीय मास्टर दिव्या देशमुख, द्रोणावल्ली हरिका आणि आर. वैशाली या चारही भारतीय खेळाडूंनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. एकाच देशाच्या चार खेळाडूंनी स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीमध्ये प्रवेश केल्याची ही पहिलीच वेळ आहे.

विश्वचषकात आपले पहिले विजेतेपद जिंकण्याच्या प्रयत्नात ग्रॅण्डमास्टर कोनेरू हम्पी ही उपांत्यपूर्व फेरीत चीनच्या युक्सिन सॉन्गशी लढेल. भारताची सर्वोच्च मानांकित महिला खेळाडू आणि अनेक प्रमुख जागतिक स्पर्धांमध्ये विजेती असलेली हम्पी या स्पर्धेच्या विजेतेपदाची प्रबळ दावेदार मानली जाते.

डी हरिका अखिल भारतीय सामन्यात दिव्या देशमुखशी सामना करणार असल्याने, किमान एका भारतीय खेळाडूचे उपांत्य फेरीत स्थान निश्चित झाले आहे.

दरम्यान, आर. वैशालीसाठी सर्वात कठीण आव्हान आहे, कारण ती दुसऱ्या उपांत्यपूर्व फेरीत माजी महिला विश्वविजेती चीनच्या टॅन झोंगीशी सामना करेल. या उच्च-स्तरीय स्पर्धेच्या उपांत्य फेरीत जास्तीत जास्त तीन भारतीय खेळाडू पोहोचू शकतात, जे पुढील महिला कॅण्डिडेट स्पर्धेसाठी पात्रता म्हणून देखील काम करते.

कॅण्डिडेटसाठी पात्र ठरलेल्या अव्वल तीन खेळाडूंसह, सर्वांचे लक्ष हम्पीवर असेल. ती या स्पर्धेत पुन्हा फॉर्ममध्ये आली आहे. टायब्रेकरच्या शेवटच्या फेरीत स्वित्झर्लण्डच्या माजी विश्वविजेत्या ॲलेक्झांड्रा कोस्टेनियुकवर तिचा विजय अधोरेखित करतो. ३८ वर्षांची असतानाही, ती एक जबरदस्त शक्ती आहे. भारताची दुसरी महिला ग्रॅण्डमास्टर डी. हरिका ही एक अनुभवी मोहीमपटू आहे, तिने यापूर्वी दोनदा महिला विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. तिच्या भक्कम खेळण्याच्या शैलीची परीक्षा दिव्याविरुद्ध होईल. दिव्याने गत फेरीच्या टायब्रेकरमध्ये चीनच्या दुसऱ्या मानांकित झू जिनरला पराभूत करून स्पर्धेची जायण्ट-किलर म्हणून उदयास आली आहे. गत महिला ग्रॅण्ड स्विसची विजेती व २०२४ मध्ये कॅण्डिडेट पात्रता फेरीत सहभागी झालेली आर. वैशाली टॅन झोंगीविरुद्ध एक महत्त्वाचा सामना खेळणार आहे. अन्य उपांत्यपूर्व फेरीत चीनच्या टिंगजी लेईची जॉर्जियाच्या नाना डझाग्निझेशी लढत होईल. (वृत्तसंस्था)



डी. हरिका



दिव्या देशमुख

### चेन्नई ओपन टेनिस सुरळीतपणे होणार

**चेन्नई** : यावर्षी २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत चेन्नई ओपन टेनिस स्पर्धा यशस्वीपणे पार पडणार आहे, असा विश्वास भारताचे वरिष्ठ टेनिसपटू व टीएनटीएचे अध्यक्ष विजय अमृतराज यांनी व्यक्त केला. टूर्स लेव्हल महिला टेनिस तीन वर्षांनी भारतात परतणार असून डब्ल्यूटीए २५० स्पर्धा- चेन्नई ओपनचे यजमानपद शहराला मिळणार आहे. तमिळनाडूचे उपमुख्यमंत्री आणि क्रीडा मंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी पत्रकार परिषदेत घोषणा केली की, यासाठी १२ कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे,

# अर्जुनचे आव्हान संपुष्टात

### फ्रीस्टाईल ग्रॅण्ड स्लॅम बुद्धिबळ

### उपांत्य फेरीत ॲरोनियनकडून पराभव

**लास वेगास, १९ जुलै**

फ्रीस्टाईल बुद्धिबळ ग्रॅण्ड स्लॅम बुद्धिबळ स्पर्धेत उपांत्य फेरीत भारतीय ग्रॅण्डमास्टर अर्जुन एरिगासीचे आव्हान संपुष्टात आले. अर्जुनला आर्मेनियन-अमेरिकन लेव्हॉन ॲरोनियनकडून ०-२ असा पराभव पत्करावा लागला.

फ्रीस्टाईल ग्रॅण्ड स्लॅमच्या अंतिम चार टप्प्यात पोहोचणारा पहिला भारतीय ठरलेल्या अर्जुन एरिगासीने ॲरोनियनविरुद्धच्या सामन्यात आपला जादुई कामगिरी करण्याचा कसोशीने प्रयत्न केला.

अव्वल चारमध्ये स्थान मिळविण्यासाठी प्ले-ऑफमध्ये मॅग्नस कार्लसन आणि उपांत्यपूर्व फेरीत हिकारू नाकामुरा यांना हरवल्यानंतर अर्जुन पहिल्या डावांत आपल्या संधींचे रूपांतर करण्यात अपयशी ठरला. ॲरोनियन कठीण स्थितीत असूनही अर्जुन त्याचा फायदा घेऊ शकला नाही. सामना संतुलित स्थितीत येताच, तो अनिर्णित राहण्याची शक्यता होती, परंतु सामन्यात टिकून राहण्यासाठी विजयाची आवश्यकता असलेल्या अर्जुनने अनावश्यक जोखीम पत्करली, परिणामी त्याला मोठी किंमत मोजावी लागली.

अमेरिकेचा हान्स मोके निमन हा अंतिम फेरीत पोहोचणारा दुसरा खेळाडू असून त्याने आपलाच सहकारी फॅबियानो कारुआनाला हरवले.

जेतेपदाच्या शर्यतीतून बाहेर पडलेल्या आर. प्रज्ञानंदाने प्लेऑफमध्ये जर्मनीच्या विन्सेंट कीमरला तिसऱ्या ते आठव्या स्थानासाठी हरवले. प्रज्ञानंदाने काळ्या सोंगट्यानिशी पहिला डाव बरोबरीत राखला व परतीच्या डावामध्ये कीमरला १.५-०.५ असा पराभव पत्करला.

प्रथम विश्वमानांकित नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसननेही उझबेकिस्तानच्या जावोखिर सिंदारोव्हविरुद्ध त्याच फरकाने विजय मिळवला. इतर सामन्यांमध्ये, अमेरिकेच्या वेसली सोने उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हचा ३-१ असा पराभव केला, तर संपूर्ण अमेरिकन सामन्यात, हिकारू नाकामुराने लेनियर डोमिंग्वेझ पेरेझचा २-० असा पराभव केला. (वृत्तसंस्था)



अर्जुन एरिगासी

# भारताला ऐतिहासिक कांस्यपदक

### आशियाई १६ वर्षांखालील मुले व्हॉलिबॉल

### अंतिम सामन्यात जपानवर ३-२ ने मात

**नाखोन पाथोम, १९ जुलै**

शनिवारी थायलंडमध्ये आयोजित आशियाई १६ वर्षांखलील मुलांच्या व्हॉलिबॉल अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघाने पदार्पणातच ऐतिहासिक कांस्यपदक पटकावले.

उपांत्य फेरीत पाकिस्तानकडून क्लीन स्वीप झाल्यानंतर एका दिवसानंतर, भारताने एका रोमांचक सामन्यात जपानचा ३-२ (२५-२१, १२-२५, २५-२३, १८-२५, १५-१०) असा पराभव करून कांस्यपदक निश्चित केले. या विजयाबरोबरच भारताने स्पर्धेच्या सुरुवातीला झालेल्या ३-१ अशा पराभवाचा बदला घेतला.

तिसऱ्या स्थानासाठी खेळल्या गेलेल्या सामन्यात भारताकडून अब्दुल्ला (१६ गुण), अपर्तीम (१५ गुण), रफिक (१२ गुण) आणि चरण (४ गुण) यांनी सर्वाधिक गोल केले.

भारत, पाकिस्तान, जपान आणि इराण या चारही उपांत्य फेरीतील संघांनी १९ ते २९ ऑगस्ट दरम्यान कतार येथे होणाऱ्या २०२६ च्या १७ वर्षांखालील मुलांच्या जागतिक व्हॉलिबॉल स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.

भारताने यजमान थायलंड, ऑस्ट्रेलिया आणि चीनला सरळ सेटमध्ये हरवून गट अ मध्ये विजय मिळवला आणि जास्तीत जास्त नऊ गुण मिळवले. त्यानंतर क्रॉसओवर स्टेजच्या पहिल्या सामन्यात उझबेकिस्तानलाही हरवले. तथापि, जपानकडून झालेल्या पराभवामुळे अंतिम फेरीत स्थान मिळवण्यासाठी त्यांना पाकिस्तानशी सामना करावा लागला. (वृत्तसंस्था)



आशियाई व्हॉलिबॉल स्पर्धेत कांस्यपदक पटकावणारा भारतीय मुलांचा संघ

# भारत मालिका बरोबरीत आणू शकतो : कैफ

**नवी दिल्ली, १९ जुलै**

इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या ॲण्डरसन-तेंडुलकर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारत बरोबरी साधू शकतो, असा विश्वास माजी भारतीय क्रिकेटपटू मोहम्मद कैफने व्यक्त केला. पराभवानंतरची भीती गतीला खीळ घालू शकते यावर त्याने भर दिला आहे.

कैफने कोहली, रोहित शर्मा, शमी व अश्विनसारख्या खेळाडूंच्या अनुपस्थितीतही भारतीय संघाने केलेल्या कामगिरीचे कौतुक केले व कर्णधार शुभमन गिलला कर्णधार आणि फलंदाज म्हणून प्रगती करण्याचे श्रेय दिले.

कैफने निवडीत सातत्य राखण्याचे आवाहन केले, संघ व्यवस्थापनाला पराभवावर घाईघाईने प्रतिक्रिया देऊ नये असे आवाहन केले. तुम्ही चार दिवस चांगले क्रिकेट खेळलात आणि पाचव्या दिवशी पराभव पत्करला, याचा अर्थ असा नाही की तुम्ही तुमच्या योजना बदलता, असेही तो म्हणाला. करुण नायरसारख्या खेळाडूंना पाठिंबा देण्याची व सध्याच्या अंतिम एकादशवर विश्वास ठेवण्याची गरज अधोरेखित केली. (वृत्तसंस्था)





शनिवारी, सिंगापूर येथे जागतिक जलतरण स्पर्धेत कलात्मक जलतरणाच्या सांघिक मुक्त प्राथमिक फेरीत कौशल्य दाखवताना मेक्सिको संघाचे जलतरणपटू

# बीसीसीआयची ९,७४१ कोटींची कमाई

### सर्वाधिक कमाई आयपीएलमधून

**नवी दिल्ली, १९ जुलै**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट मंडळ आहे. बीसीसीआयला आंतरराष्ट्रीय सामन्यांसोबत आयपीएलमधून उत्पन्न मिळते. अलीकडे समोर आलेल्या माहितीनुसार बीसीसीआयने ५० टक्क्यांपेक्षा अधिक कमाई आयपीएलमधून केली आहे. बीसीसीआयने दिलेल्या माहितीनुसार २०२३-२४ मध्ये ९७४१ कोटी रुपयांची कमाई केली. मंडळाची कमाई गेल्या दोन वर्षात ५ हजार कोटींनी वाढली आहे.

बीसीसीआयने २०२३-२४ मध्ये आयपीएलमधून ५७६१ कोटी रुपयांची कमाई केली आहे. बीसीसीआयने १०४२ कोटी रुपयांची कमाई आयसीसीच्या शेअरमधून केली आहे. मंडळाने ठेवी व गुंतवणुकीतून ९८७ कोटी रुपयांची कमाई केली आहे. याशिवाय डब्ल्यूपीएलमधून ३७८ कोटी रुपयांची कमाई केली आहे. तिकीट विक्री आणि व्यावसायिक हक्क विक्रीतून बीसीसीआयने ३६१ कोटी रुपये कमावले आहेत.

**कमाई ३००० कोटींनी वाढली**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने २०२३-२४मध्ये ९७४१ कोटी रुपयांची कमाई केली. तर २०२२-२३ मध्ये बीसीसीआयने ६८२० कोटी रुपये कमावले आहेत. अर्थात बीसीसीआयची कमाई २०२३-२४ मध्ये २९२१ कोटी रुपयांनी वाढली आहे. २०२१-२२ मध्ये बीसीसीआयने ४२३० कोटी कमावले होते. दोन वर्षात बीसीसीआयची कमाई ५ हजार कोटींनी वाढली आहे.

बीसीसीआयकडे पैसे कमावण्याचे अनेक मार्ग आहे. बीसीसीआयकडे आयसीसीचे शेअर्स देखील आहेत, यातून कोट्यवधी रुपये येतात. आयपीएल आणि डब्ल्यूपीएलमधून देखील मोठी कमाई होते. याशिवाय सामन्यांच्या तिकीट विक्रीतून व व्यावसायिक प्रसारण हक्काच्या विक्रीतून मोठी कमाई होते. (वृत्तसंस्था)

# एमसीए अ संघाची पहिल्या डावात १०९ धावांची आघाडी

### २३ वर्षाखालील राज्य क्रिकेट स्पर्धा

### सोलापूरच्या यश बोरामणी याचे तडफदार शतक, अभिषेक निषदचे ९ बळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

पुरुषांच्या वरिष्ठ गटाच्या डी.बी. देवधर चषक पाठोपाठ महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे वतीने सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेच्या सौजन्याने येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियम आणि दयानंद कॉलेज मैदानावर राज्यातील २३ वर्षाखालील मुलांसाठीच्या संघ निवडीसाठी ३ दिवसीय क्रिकेट सामने सुरु झाले.

पहिल्या फेरीच्या दुसऱ्या दिवशी सोलापूरच्या यश बोरामणीचे तडफदार शतक पहायला मिळाले. कालच्या नाबाद ८१ वरून संयमी खेळी करत यश ने शतक लगावले आणि त्याच्याच जोरावर ए संघाने पहिल्या डावात १०९ धावांची आघाडी मिळवली आणि दुसऱ्या दिवशी खेळ थांबला तेव्हा अभिषेक निषद चे दुसऱ्या डावात ४ आणि एकुणात ९ बळी मुळे संघाचा दुसरा डाव २५९ धावांवर संपला. सलामीची जोडी सागर पवार आणि हर्ष मोगावीरा यांनी शतकी (११७ धावांची) भागीदारी रचली तरी बाकीचे फलंदाज तग न धरू शकल्याने तिसऱ्या दिवशी आता ए संघाला विजयासाठी १५१ धावा करायच्या आहेत. दुसरीकडे कालच्या २ बाद ८६ वरून पुढे खेळताना सी संघाने त्यांचा पहिला डाव ४१० धावांवर घोषित करत २१४ धावांची आघाडी मिळवली. सोहम शिंदे आणि अथर्व वानवे यांचे शतक तर अनुराग कवडे चे अर्धशतक होता होता राहिले. तळातील फलंदाज सारीश देसाई ने मात्र चांगले फटके लगावत नाबाद ७० धावा केल्या. दुसऱ्या डावात डी संघ ६० धावा करून देखील अद्यापि १५४ धावांनी पिछाडीवर असून तिसऱ्या दिवशी दोन्ही सामन्यांचे निकाल लागण्याची शक्यता आहे.





### संक्षिप्त धावफलक :

**इंदिरा गांधी पार्क स्टेडियम**

**एमसीए बी (१):** १०८/१० (३८.१)

**एमसीए ए (१):** २१७/१० (६२.५)

यश बोरामणी १२० (१८५ चेंडू, १८ चौकार) साहिल औताडे ३२, अजय बोरुडे २३, श्रेयस चव्हाण २८/४ बळी, निलय शिंगवी २ तर योगेश चव्हाण सोहन जमाले हर्ष ओसवाल प्रत्येकी १ बळी.

**एमसीए बी (२):** २५९/१० (५१.३)

सागर पवार ७३, हर्ष मोगावीरा ५०, ऋषिकेश दौंड २२, पेनल्टी ६५ धावा अभिषेक निषद ४४/४ बळी, शुभम मेड ३१/३ बळी, किरण चोरमले ३५/२ बळी.

**दयानंद कॉलेज ग्राउंड**

**एमसीए डी (१):** १९६/१० (५४.३)

**एमसीए सी (१):** ४१०/९ घोषित (८६) सोहम शिंदे ९३, अथर्व वानवे ८६, अनुराग कवडे ४८, अथर्व डाकवे ३९, सारिश देसाई नाबाद ७०(७३ चेंडू, १२ चौकार,१ षटकार) ओमकार राजपूत ४७/३ बळी, शुभम खरात ८५/२ बळी, तिलक जाधव अतिश राठोड ओम भाभड अश्कान काझी प्रत्येकी १ बळी.

एमसीए डी (२): ६०/१ (१३) क्रिश शहापूरकर नाबाद २४, देवराज बेद्रे ३३, अथर्व डाकवे १ बळी.

# देशांतर्गत हंगामासाठी बंगालच्या संभाव्य संघात मोहम्मद शमी

**कोलकाता** : भारतीय संघाच्या सुरु असलेल्या इंग्लंडच्या कसोटी दौऱ्याचा भाग नसलेला अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी याचा शनिवारी बंगालच्या आगामी देशांतर्गत हंगामासाठी संभाव्य खेळाडूंच्या ५० सदस्यांच्या यादीत समावेश कअरून्यात आला. बंगाल क्रिकेट संघटनेने जाहीर केलेल्या यादीत वेगवान गोलंदाज आकाश दीप व अव्वल फळीतील फलंदाज अभिमन्यू ईश्वरन् यांचाही समावेश करण्यात आला असून हे दोघेही सध्या भारतीय संघासोबत इंग्लंड दौऱ्यावर आहेत. यामध्ये उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज मुकेश कुमार आणि वरिष्ठ फलंदाज अनुस्तूप मजुमदारचाही समावेश आहे. मजुमदार पुन्हा बंगालचे नेतृत्व करण्याची शक्यता आहे. बंगाल प्रो-लीग टी-२० मध्ये झालेल्या दुखापतीतून सध्या सावरणारा फिरकी गोलंदाज अष्टपैलू शाहबाज अहमद व यष्टिरक्षक-फलंदाज अभिषेक पोरेल हे सुद्धा हंगामपूर्व शिबिरात सहभागी होणाऱ्या संभाव्य खेळाडूंमध्ये आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...



### पिलीव येथील सांस्कृतिक भवनशेजारील कुटुंबाना पिण्याच्या पाण्याची सोय करावी

**पिलीव, दि. १९ जुलै-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील सांस्कृतिक भवनाशेजारील दहा -बारा कुटुंबाना व अंगणवाडीला ग्रामपंचायतीने अनेक वर्षापासून मागणी करुनही अद्यापही पिण्याच्या पाण्याची सोय केली नाही. ताबडतोब याठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पिलीव शहराध्यक्ष पूनम भैस यांनी ग्रामपंचायतीचे प्रशासक मिसाळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी ग्राम विकास अधिकारी भंडलकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे रणजित वाघमोडे, हर्षवर्धन ठोंबरे, पांडुरंग गोरे तसेच पत्रकार संजय पाटील, प्रमोद भैस उपस्थित होते. यावेळी प्रशासक यांनी ताबडतोब यावर योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले.



### प्रभाग ९ मधील सार्वजनिक समस्या सोडविण्याबाबत आयुक्तांना निवेदन

**सोलापूर, दि. १९ जुलै-**
जुना अक्कलकोट रोड येथील प्रभाग ९ मधील गांधी नगर, झोपडपट्टी नं. ३, ४, ५, ६ अक्कलकोट रोड येथील सार्वजनिक समस्या सोडविण्याबाबत शहर काँग्रेसचे उपाध्यक्ष संजय गायकवाड यांचे आयुक्तांना निवेदन देण्यात आले. या भागातील मूलभूत सोयीसुविधा, सार्वजनिक शौचालयाची दुरावस्था, पिण्याच्या घाण पाण्याचा पुरवठा, बोअर दुरुस्ती, ड्रेनेज, रस्त्यातील खड्डे, विषारी प्राणी, लाईट दुरुस्ती, आदी समस्या आहेत. त्या तातडीने सोडविण्यात याव्यात यासाठी खासदार प्रणिती शिंदे व सोलापूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष माननीय चेतन नरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देण्यात आले. या समस्या लवकरात लवकर सोडविण्यात न आल्यास तीव्र आंदोलना करण्याचा इशारा संजय गायकवाड उपाध्यक्ष सोलापूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी यांनी दिला. यावेळी राहुल वाघमारे, नितीन माने, राहुल आरे, उमेश माशाळकर, रमेश आजगुंडे, नागेश बनसोडे, व्यंकटेश बोमन, मधुकर गाजूल, शकीला मुजावर, वाहिदा कमलेवाले, सलीमा मासुजा, गंगुबाई चौगुले, सुमन कांबळे, क्षीरसागर, सुशिला सुरवसे उपस्थित होते.



### रावगाव विद्यालयाच्या छाया बरडे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**करमाळा दि. १९ जुलै-**
रावगाव (ता. करमाळा) येथील पंडीत जवाहरलाल नेहरू विद्यालयाच्या शिक्षकेत्तर कर्मचारी छाया बरडे यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम संपन्न झाला. मुख्याध्यापक विजय कोळेकर तसेच सर्व शिक्षकवृंद यांच्या हस्ते सेवा निवृत्त कर्मचारी बरडे यांचा सत्कार आणि गौरव करुन त्यांना भेटवस्तू देण्यात आल्या. अध्यक्षस्थानी रावगावचे सरपंच संदीप शेळके, प्रमुख पाहुणे गोवर्धन करगळ, भाऊसाहेब करगळ, विलास बरडे, दादासाहेब जाधव, नानासाहेब जाधव, दास बरडे उपस्थित होते. याप्रसंगी मुख्याध्यापक अशोक बरडे, मुख्याध्यापक माधव फुंदे, माजी मुख्याध्यापक बाबासाहेब पाटील, माजी सरपंच दादासाहेब जाधव, प्रगतशील बागायतदार प्रशांत शिंदे, राजीव गांधी वाचनालयाचे सचिव भास्कर पवार, माजी सरपंच विलास बरडे, माजी मुख्याध्यापक गोरे, आप्पासाहेब सारंगकर व मुख्याध्यापक कोळेकर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन विद्यार्थीनी प्रतीक्षा बरडे व श्रावणी वारे यांनी केले.



### कुचन प्रशालेत गणवेश, पाठ्यपुस्तके वाटप

**सोलापूर, दि. १९ जुलै-**
पद्मशाली शिक्षण संस्था संचलित, कुचन प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण विभागात सदानंद नारायण बोगम व शोभना सदानंद बोगम यांचे मार्फत प्रशालेतील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले. याप्रसंगी पद्मशाली शिक्षण संस्थेचे विश्वस्त रमेश बोद्धूल यांची प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रमाच्या सुरुवात सरस्वती पूजन करण्यात आले . प्रास्ताविकात प्राचार्य युवराज मेटे यांनी प्रशालेत गरीब घरातून येणारे, शैक्षणिक सुविधांचा अभाव असणारे आमचे विद्यार्थी उज्वल यश प्राप्त करतात त्याबद्दल आम्हाला त्यांचा सार्थ अभिमान असल्याचे सांगितले. सदानंद बोगम यांनी मनोगतातून विद्यार्थ्यांना कष्ट करा व प्रामाणिकपणा व अभ्यासाचे सातत्य ठेवल्यास चांगले यश संपादन कराल असे सांगितले. तर प्रसाद बोगम यांनी अभ्यास करून खूप खूप मोठे व्हा असा संदेश दिला. कार्यक्रमाच्या शेवटी पर्यवेक्षिका प्रणिता सामल यांनी बोगम कुटुंबांनी केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली व आभार मानले. याप्रसंगी उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु , मल्लिकार्जुन जोकारे उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वप्ना मोरे यांनी केले.

# गुणवंतांचा सत्कार, शिष्यवृत्ती वाटपाचा उपक्रम प्रेरणादायी

**तहसीलदार एफ.आर. शेख यांचे प्रतिपादन**

**७० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तर ४० कुटुंबांना जातीचे पुरावे वितरीत**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ जुलै-**
समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे ही केवळ आर्थिक मदत नसून त्यांच्या पाठीवरची शाबासकी असल्याचे सांगून, ही मदत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असे मत तहसीलदार एफ.आर. शेख यांनी व्यक्त केले.

वीरशैव विद्यासंवर्धनी मंडळ, बार्शी यांच्यावतीने शहर व तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, शिष्यवृत्ती वितरण आणि लिंगायत समाजातील जाती व पोटजात प्रमाणपत्राच्या पुराव्यांचे वितरणचा कार्यक्रम लिंगायत बोर्डिंग येथे पार पडला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार शेख बोलत होते. कार्यक्रमाला अध्यक्ष बाबासाहेब मनगिरे मुख्यधिकारी बाळासाहेब चव्हाण, रावसाहेब मनगिरे, बाबासाहेब कथले, नागेश अक्कलकोटे, विलास रेणके, प्रशांत कथले गिरीष बरिदे, पिंटू माळगे, अण्णा पेठकर, अशोक मठपती, अ‍ॅड. सचिन शेटे, विवेक देवणे, प्रभुलिंग स्वामी उपस्थित होते. पुढे बोलताना शेख म्हणाले, बार्शी तालुका व शहरातील लिंगायत समाजाचा सामाजिक आणि प्रशासकीय दृष्टिकोन प्रगल्भ असून, मंडळाच्या पुढाकारातून जुने मोडी लिपीतील अभिलेख शोधून जातीचे पुरावे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले जात आहेत. प्रत्येक गावातील जुने सातबारे, फेरफार, जन्म-मृत्यू दाखले आणि मोडी भाषेतील अभिलेखांचा अभ्यास करून मिळणारे पुरावे हे समाजातील वंचित घटकांसाठी उपयुक्त ठरत आहेत. मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, रावसाहेब मनगिरे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.





**शिष्यवृत्तीचे वाटप**
प्रतीक किशोर भागवत, ऋषिकेश उमेश नागणसूरकर, आकांक्षा दत्तात्रय वायकर, सृष्टी दिलीप कुणके, सायली संतोष कानडे आदी ७० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरीत करण्यात आली.

**जातीचे पुरावे वाटप**
गंगाधर उंबरदंड, गुरुदत्त कावळे, सुहास पुरवंत, कौशल्या खंबाळे, गोपाळ शाहीर, शिवम कुंकुकरी, अमित वायचळ यांच्यासह ४० लाभार्थ्यांना जातीचे पुरावे तहसीलदार शेख व मुख्याधिकारी चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आले.

# ‘कर्मयोगी’च्या शिरपेचात मानाचा तुरा

**डॉ. उत्पात यांची विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर नियुक्ती**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ जुलै-**
तालुक्यातील शेळवे येथील कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा. डॉ. अभय उत्पात यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशात्र विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर (बोर्ड ऑफ स्टडीज) सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे.

या विद्यापीठामधील ( DB-TU ) मेकॅनिकल, प्रॉडक्शन व ऑटोमोबाइल इंजिनियरिंग या तीन अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. उत्पात यांची ही नियुक्ती आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशात्र विद्यापीठाशी राज्यातील सुमारे शंभरहून अधिक अभियांत्रिकी महाविद्यालये संलग्न आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या तंत्र विद्यापीठात कर्मयोगी इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या डॉ. उत्पात यांना प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे.



त्यांच्या या नियुक्तीमुळे औद्योगिक क्षेत्र व शैक्षणिक अभ्यासक्रम यामधील दरी कमी करून औद्योगिक क्षेत्राला पूरक असा अभियांत्रिकी अभ्यासक्रम अंमलात आणण्याची संधी मिळणार आहे असे डॉ. उत्पात यांनी आवर्जून संगितले. सध्या डॉ. उत्पात हे कर्मयोगी इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी शेळवे येथे संशोधन अधिष्ठाता या पदावर कार्यरत आहेत.

श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस पी. पाटील, कर्मयोगी पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ए. बी. कणसे, रजीस्ट्रार जी. डी. वाळके, उपप्राचार्य प्रा. जे. एल. मुडेगावकर, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा.राहुल पांचाळ, विभागप्रमुख डॉ. एस. एम. लंबे, डॉ. एस. व्ही. एकलारकर, प्रा. अनिल बाबर, प्रा. दिपक भोसले, प्रा. अभिनंदन देशमाने तसेच सर्व प्राध्यापक यांनी डॉ. उत्पात यांच्या निवडीबद्दल अभिनंदन केले आहे. तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# दुखापत व दमदाटी प्रकरण; १० आरोपींची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ जुलै-**
वैराग पोलीस स्टेशन अंतर्गत भारतीय दंड विधान संहिताचे कलम १४३ १४७ १४८ ३२३ ३२४ ५०४ ५०६ प्रमाणे आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. सदर प्रकरणातील फिर्यादीने आरोपी विरुद्ध मोटरसायकलीवरुन जात असताना काही कारण नसताना अडवून शिवीगाळ करुन काठीने व कुऱ्हाडीच्या दांड्याने डोक्यावर आणि पाठीवर मारहाण करुन चैनने हातावर पाठीवर मारहाण करुन गंभीर जखमी केल्याप्रकरणी गुन्हा नोंद केला होता. सदर प्रकरणाची सुनावणी बार्शी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचेसमोर झाली.



सदर प्रकरणी सरकार पक्षातर्फे ७ साक्षीदार तपासण्यात आले. सरकार पक्षातर्फे तपासलेले साक्षीदार यांचा पुरावा आरोपींना शिक्षा देण्यासाठी पुरेसा नाही व आरोपीविरुद्ध सबळ पुराव्याच्या अभाव असल्याबाबत युक्तिवाद अ‍ॅड. एस.एम. गुंड यांनी केला. सदर प्रकरणातील आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन सदर आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. साक्षीदार व अनेक बाबींची पडताळणी करुन न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. सदर प्रकरणी यात आरोपीच्यावतीने अ‍ॅड. एस एम गुंड, अ‍ॅड. व्ही.पी जाधव, अ‍ॅड. आर. आर. घोडके, अ‍ॅड. ए. एस.गुंड, अ‍ॅड. आर के ननवरे, अ‍ॅड. पी.ए. शेळवणे, यांनी काम पाहिले.



# संभाजी आरमारच्यावतीने बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**
सोलापूर बार असोसिएशनच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीमध्ये विजयी झालेल्या पदाधिकाऱ्यांचा संभाजी आरमारच्या वतीने फेटा बांधून राजमाता अहिल्यादेवी होळकरांचे चरित्र व गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. अध्यक्ष अ‍ॅड. बाबासाहेब जाधव, उपाध्यक्ष अ‍ॅड. रियाज शेख, सहसचिव अ‍ॅड. मीरा प्रसाद आणि खजिनदार अ‍ॅड. अरविंद देडे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. याप्रसंगी बोलताना संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून सोलापूर शहरात उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे याकरिता वकील बांधवांनी सुरु केलेल्या लढ्यात संभाजी आरमार सक्रियपणे सोबत राहणार असल्याचे सांगितले. सत्काराला उत्तर देता नूतन अध्यक्ष अ‍ॅड. बाबासाहेब जाधव यांनी संभाजी आरमारशी मागील अनेक वर्षांपासून ऋणानुबंध असलयाचे सांगत संभाजी आरमार अन्यायाविरुद्ध लढणारा ब्रँड असल्याचा आवर्जून उल्लेख केला. उपाध्यक्ष अ‍ॅड. रियाज शेख यांनी संभाजी आरमारने राजमाता अहिल्यादेवी होळकरांचे चरित्र भेट देऊन केलेला सत्कार भावणारा असल्याचे सांगून संभाजी आरमारला सदैव कायदेशीर पाठबळ देण्यासाठी सज्ज असल्याचे सांगितले. यावेळी संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, प्रदेश संघटक प्रकाश डांगे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, सरचिटणीस गजानन जमदाडे, शहरप्रमुख सागर ढगे, जिल्हा संघटक अमित कदम, गुरुनाथ निंबाळे, शिक्षण संघटना प्रमुख अजिंक्य पाटील, दिव्यांग संघटना प्रमुख वासुदेव होणकोंबडे, महिला आघाडीच्या उमा रजपूत, रेखा व्हनकडे, संध्या हेब्बाळकर, अश्विनी गायकवाड उपस्थित होते.

# रामदास नरसय्या इप्पाकायल शाळेचे राष्ट्रीय कराटे स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**
मुंबई येथे MKST यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय कराटे स्पर्धेत पद्मशाली शिक्षण संस्था संचलित रामदास नरसय्या इप्पाकायल प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले

विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळ कौशल्य दाखवत राष्ट्रीय पातळीवर शाळेचे नाव उज्ज्वल केले. मुलांच्या गटात शिरद गंधाळ व वैभव साठे यांनी सुवर्णपदके पटकावली. मुलींच्या गटात गायत्री धनुरे आणि माहेश्वरी बिराजदार यांनी कांस्य पदके मिळवली.

यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक नागेश खुने आणि क्रीडा मार्गदर्शक लक्ष्मण चंदनशिवे यांचे मार्गदर्शन लाभले. सत्कारप्रसंगी पद्मशाली शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास



कोंडी हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. पद्मशाली समाजातील श्वेता सिंद्राल हिचाही याप्रसंगी विशेष सत्कार करण्यात आला. तिने नुकतीच चार्टर्ड अकाउंटंट ही पदवी प्राप्त करून समाजाचा गौरव वाढवला आहे.

तसेच पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम, शालेय समितीचे अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली, शाळेचे देणगीदार नरसय्या इप्पाकायल, संस्थेचे विश्वस्त श्रीनिवास इप्पाकायल यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन केले.

**CHANGE IN NAME**

I No 4582027H NK Gawali Chetan Dattu, Presently Resident At Yashwantnagar Tel Malshiras Dist solapur. State Maharashtra Pin 413118 Have my service Record,Have Change My son Name from Gawali Swaraj Chetan To Correct Name to wrong Name swaraj of service Record Affidavit 17.07.25 Correct Name -Gawali Swaraj Chetan Wrong Name -Swaraj.

**CHANGE IN NAME**

I No 4582027H NK Gawali Chetan Dattu, Presently Resident At Yashwantnagar Tel Malshiras Dist solapur. State Maharashtra Pin 413118 Have my service Record,Have Change My Daughter Name from Gawali Hindavi Chetan To Correct Name to wrong Name Hindavi of service Record Affidavit 17.07.25 Correct Name -Gawali Hindavi Chetan Wrong Name -Hindavi

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India

क्षेत्रीय कार्यालय – अहिल्यानगर
प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव पुलाजवळ, नगर मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर – ४१४१११

**भाडेतत्वावर जागा पाहीजे**

युनियन बँक ऑफ इंडियाला धाराशिव, ता. जि. धाराशिव शाखेकरिता प्रामुख्याने तळमजल्यावर सर्व सुविधा असलेली १७०० स्क्वे फुट (+ – १०%) कमर्शिअल जागा भाडेतत्वावर हवी आहे. याबाबतची अधिक माहिती बँकेची वेबसाईट www.unionbankofindia.co.in / गव्हर्नमेंट्स ई प्रोक्युअरमेंट पोर्टल www.eprocure.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छुकांनी विहीत नमुन्यातील निवीदा या दि. ११/०८/२०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत वरील पत्त्यावर सादर कराव्यात. या प्रकल्पाबाबत काही सुधारणा / बदल असल्यास ते बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत वर्तमानपत्रांतुन जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाही. प्राप्त निवीदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे.

दि. २१/०७/२०२५ अहिल्यानगर
क्षेत्रीय प्रमुख
क्षेत्रीय कार्यालय,अहिल्यानगर

ARL

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि. कि. अर्ज नं ७८/२०२५
नि. नं. ५

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. सो. यांचे कोर्टात**

**श्री. बळीराम गणपती जाधव,** वय ८१ वर्षे,
धंदा शेती, रा. लाडोळे, ता. बार्शी, जि. सोलापूर -- **अर्जदार**
**विरूध्द**
**कोणी नाही** -- **सा.वाला**

अर्ज - Bombay Regulation ct Section २ प्रमाणे -
ज्या अर्थी,
मयत रामहारी गणपती जाधव यांचे नांवे मौजे लाडोळे ता. बार्शी येथील ग्रा. पं. मिळकत अ.क्र. २५८ याचा **ग्रा.पं. मिळकत नंबर २३६** ही जागा असून रामहारी गणपती जाधव हे ता. ०४/०८/२०१८ रोजी मौजे लाडोळे येथे मयत झालेले आहेत. सदर अर्जदाराशिवाय मयतास अन्य कोणीही जवळचे व कायदेशीर वारस नव्हते व नाहीत. त्यामुळे मयत रामहारी गणपती जाधव यांचे पश्चात यातील अर्जदार हो एकमेव जवळचा व कायदेशीर वारस आहे असे ठरवून जाहीर होवून मिळणेकरीता या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.
त्या अर्थी सदर अर्जदार याचे व्यतिरिक्त मयत रामहारी गणपती जाधव यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. २१/८/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.
कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्कयानिशी दिले असे.
ता. १७/०५/२०२५

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर बार्शी ता. बार्शी**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि. कि. अर्ज नं ८३/२०२५
पुढील नेमलेली ता. १२/०८/२०२५

**बाशी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सारे. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**आशाबाई विठोबा काळदाते,** वय ७० वर्षे,
धंदा-परकाम, रा. येळंब, ता. बार्शी.
जि. सोलापूर -- **अर्जदार**
**मेघराज विठोबा काळदाते**, वय ५० वर्षे
धंदा- शेती.रा.सदर
**विरुध्द**
**कोणी नाही** -- **सा. वाला**

ज्याअर्थी अर्जदार अर्जदार नं. ही अर्जदार नं.२ ची आई असून अर्जदार नं. १ भाऊ कृष्णा निवृत्ती वायकर हा अविवाहीत होता तो. दि.२६/०२/२०२३ रोजी येळंब ता. बार्शी. जि.सोलापूर येथे मयत झालेला आहे. मयत कृष्णा निवृत्ती वायकर हे अर्जदार नं.१ चा भाऊ म्हणजेच अर्जदार नं. २ चे मामा होते. मयतास अर्जदार हेच वारस असून तास अर्जदाराशिवाय अन्य कोणोही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना त्यांचे कायदेशीर व शासकीय अडचणीचे निवारणाकरीता अर्जदार हे कृष्णा निवृत्ती वायकर यांचे कायदेशीर वारस असलेबाबत वारस हे अरशिप प्रमाणपत्राची गरज भासलेली आहे सदर बारस हे अरशिप अर्जदाराकडे नसलेने अर्जदारास अनेक कायदेशीर अडचणीस सामोरे जावे लागत आहे असे कथन करुन अर्जदाराने वारस /हे अरशिप प्रमाणपत्राची मागणी केली आहे
त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमले ता. १२/८/२०२५ रोजी में कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी में कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील. हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले कसे. ता. १९/७/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर बार्शी**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर बार्शी**

## महत्वाचे...



### नूतन अध्यक्ष सातलिंग शटगार यांचा गुरुविद्या प्रतिष्ठानतर्फे सत्कार

**सोलापूर दि १९ जुलै-**

गुरूविद्या प्रतिष्ठानच्यावतीने सातलिंग शटगार यांचा अध्यक्षपदी निवड व मुख्याध्यापक म्हणून सेवानिवृत्तीबद्दल सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक सोमशेखर भोगडे, उपाध्यक्षा राजश्री तडकासे, सचिवा श्रीदेवी यळमेली, जेष्ठ सदस्य विजयकुम ार भोगडे यांच्या शुभहस्ते श्री. शटगार यांचा सन्मान करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. श्री. शटगार हे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रात अग्रेसर आहेत. त्यांनी आजवर अनेक असे गरीब, होतकरू लोकांना मदत केले. यावेळी डॉ. मंगेश शहा, चंद्रकांत सपळे, गणेश अवधूत, योगेश कोरे, चपळगावचे माजी मुख्याध्यापक शिवबाळ मुली, गणेश अवधूत यांची उपस्थिती होती. सचिवा श्रीदेवी यळमेली यांनी आभार मानले.



### बार्शीमध्ये शांतता कमिटीची बैठक संपन्न

**बार्शी, दि. १९ जुलै-**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व नागपंचमी उत्सवानिमित्त शांतता कमिटीची बैठक यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक सभागृह येथे संपन्न झाली. या बैठकीमध्ये विविध विषयावर चर्चा होऊन, नागरिकांच्या सूचनांचे पालन करत, उत्साही वातावरणामध्ये आगामी उत्सव साजरे करुन समाजासमोर एक वेगळा आदर्श निर्माण होतील, अशी अपेक्षा उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. सदरील बैठक बार्शीचे तहसीलदार एफ. आर. शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, नगरपालिके उपमुख्याधिकारी विठ्ठल पाटोळे, एम्एससीबीचे विधाते यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष योगेश लोंढे, आर.पी.आय चे माजी नगरसेवक अण्णासाहेब लोंढे, माजी बांधकाम सभापती ज्योतिर्लिंग कसबे, दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुनील अवघडे, शहराध्यक्ष संदीप अलाट, लहुजी ग्रुपचे आनंद चांदणे, अक्षी अवघडे, राज देवकुळे, बाबा शेंडगे, भास्कर बगाडे, निलेश खुडे, उमेश पवार, आकाश शिंदे उपस्थित होते.



### एकता महिला मंचतर्फे शेतकरी महिलांसाठी मार्गदर्शन मेळावा

**वैराग दि १९ जुलै-**

एकता महिला मंच आयोजित एकता महिला मंचच्या सदस्यांसाठी व गावातील शेतकरी महिलांसाठी कृषी विज्ञान केंद्र सोलापूर यांच्यावतीने मार्गदर्शन मेळावा सारोळे येथे आयोजीत करण्यात आला सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित म ान्यवरांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार व सन्मान करण्यात आला यावेळी उपस्थित कृषी विज्ञान केंद्र सोलापूरचे प्रदीपकुमार गोंजारी यांनी फलविक ऍसिड द्रावण ह्युमिक ऍसिड द्रावण, वेस्ट डी कंपोजर द्रावण दशपर्णी अर्क, जीवामृत ह्युमिक ऍसिड,गांडूळ पाणी मासे गुळ नत्र, निंबोळी अर्क या संदर्भात माहिती देत उपस्थित महिलांना त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित एकता महिला मंचचे प्रभाकर क्षीरसागर, तसेच यावेळी उपस्थित एकता महिला मंचच्या प्रभावती साबळे, स्वाती चौधरी,पूजा भोसले, पूजा चौधरी, प्रिया गाटे, सोनाली मुंबरे, पार्वती चौधरी,रेश्मा करंडे,निर्मला साळुंखे,महानंदा विभूते,गुणवंती चौधरी, सुजाता गाटे,सुमन भोसले, कौशल्या भगत,उषा साबळे,संगीता शेरखाने,लक्ष्मी भोसले,रंजना चौधरी सुमन चौधरी, मेघा मुंबरे, रिंका भोसले, निर्मला चौधरी,सुमन भोसले, कौशल्या भगत,उषा साबळे,संगीता शेरखाने,लक्ष्मी भोसले,रंजना चौधरी सुमन चौधरी, म ेघा मुंबरे, रिंका भोसले, निर्मला चौधरी,ज्योती गाटे, सुनिता लोंढे, सारिका मुंबरे,प्रिया चौधरी, संध्या मुंबरे, शिवकांता उबाळे, भाग्यश्री गाटे उपस्थित होते, सूत्रसंचालन प्रगती गाटे यांनी केले तर तर आभार पूजा भोसले यांनी मानले.

### मार्केट यार्डातून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. १९ जुलै-**

शहरातील मार्केट यार्डातून चोरट्याने दोड्डीच्या तरूणाची ५० हजारांची दुचाकी चोरून नेली. याबाबत लक्ष्मण मच्छिंद्र काळे (वय ३७, रा. दोड्डी) याने दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ जुलै रोजी पहाटे सहाच्या सुम ारास लक्ष्मण काळे हा मार्केट यार्डात आला व त्याने त्याची एमएच १३ बीझेड ३३५७ क्रमांकाची दुचाकी ही हॅन्डल लॉक करून पार्क केली. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार धुमाळ पुढील तपास करीत आहेत.



# संरक्षण उत्पादनात भारत ७० टक्के आत्मनिर्भर

## के. भोगिशयना स्मृती व्याख्यानात सुशील गायकवाड यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १९ जुलै-**

संरक्षण उत्पादनांच्या बाबतीत भारत ७० टक्के आत्मनिर्भर झाल्याचे संरक्षण मंत्रालयातील एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर सुशील गायकवाड यांनी स्पष्ट केले.

रोटरी क्लब ऑफ सोलापूरने आयोजित केलेल्या के भोगिशयना स्मृती व्याख्यानात शनिवारी ते बोलत होते. संरक्षण उत्पादनाचा विचार केला तर गेल्या दहा वर्षात संरक्षण उत्पादने तिपटीने वाढली असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या भारतातून १०० देशांना संरक्षण उत्पादनांची निर्यात होत असल्याचे सांगून गायकवाड म्हणाले की १०० टक्के आत्म निर्भर होण्याच्या दिशेने भारताची वाटचाल आहे. २०२५ हे संरक्षण सुधारणांचे वर्ष म्हणून पाळण्यात येत आहे. आज भारतात संरक्षण क्षेत्राला लागणाऱ्या ५५० वस्तू बनवल्या जातात. धनुष गन्स, सोनर सिस्टिम्स, लाईट कॉम्बॅट हेलिकॉप्टर्स भारत निर्यात करणार असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या भारताचे संरक्षण बजेट ६.८ लाख कोटी रुपयांचे असून प्रतिवर्षी त्यामध्ये नऊ ते दहा टक्के वाढ होत आहे. भारत संरक्षण दलांना आधुनिक बनवण्यासाठी प्रयत्न करत आहे. यासाठी नवीन शस्त्रे आणि तंत्रज्ञान खरेदी करणे, तसेच देशातच संरक्षण उपकरणे विकसित करणे यावर लक्ष केंद्रित केले जात आहे. यासोबतच, संरक्षण संशोधन आणि विकास संस्था देखील संशोधनात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे गायकवाड यांनी स्पष्ट केले.

रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षा धनश्री केळकर यांनी स्वागत केले. माजी अध्यक्ष सीए राजगोपाल मिणियार यांनी भोगिशयांविषयीची माहिती दिली. डॉ. राजीव प्रधान यांनी श्री. गायकवाड यांची ओळख करून दिली. सचिव निलेश फोफलिया यांनी आभार मानले. सुहास लाहोटी यांनी सूत्रसंचलन केले. यावेळी दत्ता सुरवसे, राजेंद्र गांधी, रवींद्र साळुंखे, मोहन देशपांडे, किशोर चंडक, केतन वोरा, सचिन पुराणिक, जे.जे. कुलकर्णी, आप्पासाहेब कोतली आदी उपस्थित होते.



## बसवेश्वर प्रशालेत शालेय साहित्याचे वाटप

**सोलापूर, दि. १९ जुलै-**

निंबर्गी येथील श्री बसवेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सेवानिवृत्त सहशिक्षक शशिकांत सदाफुले यांचे वतीने विद्यालयातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे दैनिक तरुण भारतचे संपादक प्रशांत माने यांच्या हस्ते मोफत वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रशालेचे प्राचार्य नितीन झाडबुके होते. यावेळी संपादक श्री माने यांनी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम व उच्च ध्येय ठेवत यशस्वी होणेविषयी मार्गदर्शन केले. या वेळी सेवानिवृत्त कलाशिक्षक शशिकांत सदाफुले, पर्यवेक्षक विठ्ठल बगले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आळगी बी.डी. यांनी केले. के.बी. जगताप यांनी आभार मानले.

## सामुदायिक अग्निहोत्र



**सोलापूर : दत्तनगर येथील श्री शिव हनुमान मंदिरात डॉ. पुरुषोत्तमजी महाराज राजीमवाले यांचा वाढदिवस व स्वरांजलीनिमित्त कोमल मित्र मंडळ आणि लंबोदर मित्रमंडळ यांनी सामुदायिक अग्निहोत्राचे आयोजन केले होते. त्यात सहभागी झालेले साधक.**

# ‘भुवैकुंठी’चा ‘आनंद सोहळा’ अवर्णनीय!



### पालकमंत्री गोरे यांची आषाढी सोहळ्याबाबत स्पष्टोक्ती

### मुख्यंमत्र्यांच्या मार्गदर्शनात पार पडला सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

पंढरीच्या आषाढी सोहळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले आणि आम्ही त्यांच्या मार्गदर्शनानुसार सर्व शासकीय यंत्रणा हलविल्याने ‘भुवैकुंठ पंढरपूर’ येथील आषाढी वारी सोहळा यंदा अत्यंत ऐतिहासिक ठरला असून, या वारीत केलेल्या कामाचे समाधान आणि मिळालेला आनंद अवर्णनीय असल्याची स्पष्टोक्ती ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज (दि. १९) प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.



आषाढी वारी सोहळा पार पडल्यानंतर ते शनिवारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या एका कार्यक्रमानिमित्त सोलापुरात आल्यावर माध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी आषाढी वारीत आलेल्या विविध अनुभवाचे बोल बोलून दाखविले. राजकीय नेतेमंडळी, सोलापूरच्या प्रशासकीय टीमने अंतर्गत दाखविलेल्या समन्वयाचेही त्यांनी कौतुक केले. प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही जुलैमध्ये पाऊस पडण्याची भीती असल्याने वारकऱ्यांसाठी शासनस्तरावरून आम्ही विविध उपाययोजना केल्या होत्या. इतकेच नाहीतर उजनीच्या पाण्याचेही योग्य नियोजन लावले होते. पंढरी नगरीतील श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिराचे सर्व विश्वस्त, दिंडीप्रमुख, पत्रकार बांधव आणि माझे प्रशासनातील सर्व अधिकाऱ्यांनी या वारीत मन लावून काम केले. यंदा जर्मन हँगर, वॉटरप्रुफ मंडप उभारणी, विविध ठिकाणी केलेले मुरमीकरण, खडीकरण अन् वारकऱ्यांच्या आरोग्याबाबत घेतलेल्या दक्षतेमुळे एकाही वारकऱ्यांची कसलीही तक्रार आमच्याकडे आली नाही. यामुळे यंदा अत्यंत उत्साही, सुंदर आणि विर्विघ्नपणे आषाढी वारी सोहळा पार पडला. यंदा वारकऱ्यांची गर्दीही मोठी होती. जवळपास २७ लाखाच्यावर भावीक या वारीत आले होते. तरीही राज्य शासन, जिल्हा प्रशासन या सर्वांनी मिळून वाळवंट अत्यंत स्वच्छ ठेवले. मुख्यमंत्री वारकरी सेवा केंद्रांतून वारकऱ्यांना चरणसेवा, आरोग्य सेवा मिळाल्याने तमाम वारकरी बांधवांनी समाधान व्यक्त केले. दरम्यान, पंढरीत प्रतिवर्षी होणाऱ्या आषाढी अन् कार्तिकी वारी सोहळ्याचे भविष्यातही असेच योग्य नियोजन होणार असल्याचेही शेवटी त्यांनी सांगितले.

# बार्शीतील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये प्रथमच ओपन हार्ट सर्जरी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १९ जुलै**



येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जगदाळे मामा हॉस्पिटलने तालुक्यातील पहिली कार्डियाक बायपास सर्जरी (उइऋ) यशस्वीपणे पार पाडली. रुग्ण सुखरुप घरी परतला असून, ही घटना ग्रामीण आरोग्य सेवेत मैलाचा टप्पा ठरली आहे.

मे २०२२ पासून कार्यरत हृदयरोग विभाग २४७ आपत्कालीन सेवा, पूर्णवेळ कार्डिओलॉजिस्ट आणि झहळश्रश्रळीं ऋऊ-१० कॅथलॅबने सुसज्ज आहे. ‘गोल्डन मिनिट्स’ संकल्पनेसह त्वरित उपचार देण्यावर भर दिला जातो. आतापर्यंत ५,४००+ अँजिओग्राफी, १,७०० अँजिओप्लास्टी, ५०,८६० एझड+ठऋ, ३०-४० कॅरोटिड स्टेंटिंग, ५८-६० डऊ डिव्हाइस क्लोजर आणि ५-६ रेनल स्टेंटिंग यशस्वीपणे पूर्ण झाले आहेत.

**मल्टीस्पेशालिटी सेवा**

हॉस्पिटल केवळ हृदयरोगापुरते मर्यादित नसून, न्यूरो सर्जरी, जनरल मेडिसिन, स्त्रीरोग, ऑर्थोपेडिक्स, पल्मोनोलॉजी आणि अपघात विभागासह सर्वसमावेशक सेवा देते. सर्व विभाग तज्ज्ञ डॉक्टर आणि आधुनिक उपकरणांनी सुसज्ज आहेत.

ग्रामीण भागात शहरांतील दर्जेदार वैद्यकीय सुविधा देणे हे आमचे ध्येय आहे, असे हॉस्पिटलच्या आरोग्य समितीने सांगितले. जगदाळे मामा हॉस्पिटल नव्या वैद्यकीय सेवांसाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

**स्थानिक पातळीवर बायपास सर्जरी**

पूर्वी बायपास सर्जरीसाठी रुग्णांना सोलापूर, पुणे किंवा मुंबईला जावे लागत होते, ज्यामुळे वेळ आणि खर्च वाढत होता. जगदाळे मामा हॉस्पिटलने प्रशिक्षित डॉक्टर, अत्याधुनिक खउण आणि ऑपरेशन थिएटरसह बार्शीतच ही जटिल शस्त्रक्रिया शक्य केली.

**ग्रामीण आरोग्यसेवेत नवा अध्याय**

या यशामुळे बार्शी आणि परिसरातील रुग्णांना परवडणाऱ्या दरात स्थानिक पातळीवर उच्च दर्जाचे उपचार मिळत आहेत. मोठ्या शहरांकडे जाण्याची गरज कमी झाली असून, हॉस्पिटल ग्रामीण आरोग्यसेवेत क्रांती घडवत आहे.

## लग्नाच्या आमिषाने अत्याचार केल्याप्रकरणी अटकपूर्व जामीन

**सोलापूर, दि. १९ जुलै-**

विवाहित महिलेवर लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याप्रकरणीच्या गुन्ह्यात आरोपीला जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. केंद्रे यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला. समीर नजीर पठाण (रा. सोलापूर) असे अटकपूर्व जामीन मंजूर झालेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पीडितेने तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी ही विवाहित असून तिचा घटस्फोट झालेला नाही. परंतु ती पतीपासून वेगळे राहत असल्याचा फायदा घेऊन आरोपीने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तसेच तिला लग्नाचे आमिष दाखवून वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन तिच्यावर अत्याचार केला. दरम्यान पीडितेने आरोपीला लग्नाबाबत विचारणा केली असता त्याने लग्नास नकार देऊन याबाबत कोठे वाच्यता केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली होती. या खटल्याच्या सुनावणी वेळी आरोपीच्या वकिलांनी न्यायालयासमोर आरोपी आणि पीडिता यांचे प्रेम संबंध होते. यातूनच पीडितेने संमतीनेच संबंध ठेवले असा युक्तीवाद केला. आरोपीच्या वकिलाने केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर करण्याचा आदेश दिला. या खटल्यात आरोपीतर्फे अॅड. डी. एस. होसमणी, अॅड. संतोष होसमणी यांनी तर सरकार तर्फे अॅड.कविता बागल यांनी काम पाहिले.

# बार्शीतील महा-ई-सेवा केंद्रांचा मनमानी कारभार

### जास्त शुल्क, अर्जंट दाखल्यांचा काळाबाजार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, १९ जुलै**




बार्शी तहसील परिसरातील महा-ई-सेवा केंद्रांचा मनमानी कारभार थांबण्याचे नाव घेत नाही. शासनाने निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा दुप्पट-तिप्पट रक्कम उकळून अर्जंट दाखले देण्याचा काळाबाजार या केंद्रांमध्ये बिनधास्त सुरु आहे. उत्पन्न दाखल्यासाठी ६९ रुपये आणि जातीच्या प्रमाणपत्रासाठी १२८ रुपये शुल्क निश्चित असताना, काही केंद्रचालक ३०० ते ५०० रुपये आकारत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. विशेष म्हणजे, अर्जंट दाखल्यासाठी दुप्पट पैसे दिल्यास अवघ्या चार तासांत दाखला हातात पडतो, तर सामान्य नागरिकांना पैसे नसल्यास १५ दिवस ताटकळत राहावे लागते. जिल्हाधिकाऱ्यांचे आदेशही या केंद्रचालकांनी केराच्या टोपलीत टाकले असून, अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून होत आहे.

जिल्हा प्रशासनाने जास्त शुल्क आकारणी रोखण्यासाठी डमी अर्जदार पाठवण्याची घोषणा केली असली, तरी बार्शी तहसील परिसरात याची अंमलबजावणी दिसत नाही. यापूर्वीही महा-ई-सेवा केंद्रचालकांनी आपल्या नोंदणीकृत ठिकाणीच व्यवसाय करावा, असा आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिला होता. मात्र, तहसील कार्यालयाच्या आसपास अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या केंद्रांवर कोणतीही कारवाई झालेली नाही. यापूर्वी केंद्रचालकांनी आपल्या मागण्यांसाठी तहसील कार्यालयासमोर उपोषणही केले होते, परंतु त्यानंतरही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही.

नागरिकांच्या तक्रारीनुसार, अर्जंट दाखल्यांसाठी महा-ई-सेवा केंद्रचालकांकडून अवास्तव शुल्क आकारले जाते. दुप्पट पैसे दिल्यास चार तासांत दाखला मिळतो, तर सामान्य प्रक्रियेत १० ते १५ दिवस वाट पाहावी लागते. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना आपली महत्त्वाची कामे रखडल्याने हतबल व्हावे लागत आहे. पैसे दिले तर लगेच दाखला, नाही तर वाट बघा, अशी दादागिरी या केंद्रचालकांची आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.

महा-ई-सेवा केंद्रचालकांच्या या मनमानी कारभाराला तहसील कार्यालयातील काही अधिकाऱ्यांचेही पाठबळ असल्याचा गंभीर आरोप होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश धाब्यावर बसवून केंद्रचालक बिनदिक्कतपणे अनधिकृत ठिकाणी व्यवसाय करत आहेत. यापूर्वीही यासंबंधी तक्रारी नोंदवण्यात आल्या होत्या, परंतु कारवाईचा अभाव असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. तक्रार करण्यासाठी पुढे येणारे नागरिक कमी असले, तरी ही परिस्थिती सर्वसामान्यांसाठी त्रासदायक ठरत आहे. जिल्हा प्रशासनाने तक्रार नोंदवण्यासाठी क्यूआर कोड सुविधा उपलब्ध करून दिली आहे. मात्र, यापूर्वीच्या तक्रारींवर कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये या सुविधेवर विश्वास उरलेला नाही. तक्रार केली तरी काय होते? केंद्रचालक आणि अधिकारी एकाच माळेचे मणी आहेत, अशी खंत स्थानिकांनी व्यक्त केली. उत्तर सोलापूर येथील एका केंद्राची मान्यता रद्द झाल्याचा दाखला असला, तरी बार्शी तहसील परिसरात अशा कारवाईची प्रतीक्षा नागरिकांना आहे. महा-ई-सेवा केंद्रांचा हा काळाबाजार आणि मनमानी कारभार थांबवण्यासाठी प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलण्याची गरज आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सर्व तहसीलदारांना केंद्रांवर नजर ठेवण्याचे निर्देश दिले असले, तरी बार्शीतील परिस्थिती पाहता हे निर्देश कागदावरच राहिल्याचे चित्र आहे. नागरिकांना पारदर्शी आणि किफायतशीर सेवा मिळावी, यासाठी प्रशासनाने तपासणी मोहीम तीव्र करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. नागरिकांनी जास्त शुल्क आकारणीविरोधात निर्भयपणे तक्रार नोंदवावी आणि आपले हक्क मिळवावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. मात्र, प्रशासन स्वतः किती गंभीर आहे, हा खरा प्रश्न आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# हॉर्ट अटॅकचं निदान करणाऱ्या ईसीजी जॅकेटला पेटंट प्रदान

## सोलापुरातील डॉ. गुरुनाथ परळे यांचे संशोधन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२० जुलै-**

सोलापुरातील प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. गुरुनाथ परळे यांनी हॉर्ट अटॅकचे निदान करणाऱ्या अनोख्या उपकरणाचे संशोधन केले आहे. त्यास नुकतेच पेटंट मिळाले आहे.

हृदयरोगाच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. बदलती जीवनशैली आणि सवयींमुळे अगदी तरुणवयातील व्यक्तींमध्ये देखील हार्ट अटॅकचे प्रमाण वाढले आहे. हे लक्षात घेऊन सोलापुरातील प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. गुरुनाथ परळे यांनी हॉर्ट अटॅकचे निदान करणाऱ्या अनोख्या उपकरणाचे संशोधन केले आहे. हृदयरोगामुळे मृत्यू होणाऱ्या रुग्णांच्या कारणांचा शोध घेतला असता उशिरा निदान होणे हे देखील प्रमुख कारण आहे. हृदयरोगाचे निदान करण्यासाठी सर्वात प्राथमिक आणि महत्वपूर्ण चाचणी म्हणजे ईसीजी (ECG). मात्र गाव-खेड्यात ईसीजी मशीन देखील उपलब्ध नसतात. अशा स्थितीत रुग्णांना लवकर उपचार मिळत नाहीत. त्यामुळे डॉ. गुरुनाथ परळे यांनी अनोख्या जॅकेटचे संशोधन केले आहे. हे जॅकेट रुग्णाने परिधान केल्यानंतर केवळ एका क्लिकवर ईसीजी रुग्णाच्या किंवा डॉक्टरांच्या मोबाईलवर पाठवता येणार आहे. सध्या बाजारात अनेक उत्पादन असून ते फक्त हृदयाचे ठोके मोजणे किंवा अनियमितता दाखवणे एवढ्यापुरतेच मर्यादित आहे. हार्ट अटॅकचे निदान करण्यासाठी आवश्यक असणारा १२ डएऊ एउत्त्र फक्त या उपकरणाद्वारे शक्य असल्याचा दावा डॉ. परळे यांनी केला आहे. वैद्यकीय चाचण्या आणि काही परवानग्यानंतर ह्या उपक्रमास नुकतेच आंतरराष्ट्रीय पेटंट मिळाले असल्याचे डॉ. गुरुनाथ परळे यांनी माहिती दिली. हृदय रुग्णांसाठी हा जॅकेट दिलासादायक ठरणार आहे.



### खेडेगावांपर्यंत उपकरण पोहोचवायचे आहे



'माझ्या तीस वर्षाच्या वैद्यकीय अनुभवानुसार अनेक रुग्णांना छातीत दुखल्यानंतर केवळ ईसीजी वेळेत झाला नाही किंवा ईसीजी व्यवस्थित इंटरप्रिएट करता आला नाही, त्यामुळे जीव गमवावा लागलाय. यामध्ये तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. त्यामुळे मला असे वाटले की रुग्णांना जर घरी ईसीजी करता आला तर मदत होऊ शकते या संकल्पनेतून या जॅकेटची निर्मिती करण्यात आली आहे. विशेषता खेडेगावांपर्यंत हे उपकरण पोहोचवायचे आहे. साधारण आठ ते दहा हजार रुपयांपर्यंत हे जॅकेट रुग्णांना उपलब्ध होईल असे आम्हाला अपेक्षित आहे.' अशी प्रतिक्रिया डॉ. गुरुनाथ परळे यांनी दिली.ह्या प्रकल्पासाठी अश्विनी रुग्णालयाचे चेअरमन बिपिनभाई पटेल सह सी सी यू २ विभाग व स्पंदन चा स्टाफ व हायन हेल्थ कंपनी चे श्री प्रशांत सदावर्ते व श्रीराम कुलकर्णी यांचे मोलाचे सहकार्य लाभले असे डॉ. गुरुनाथ परळे यांनी सांगितले.

### १३०० रुग्णांचा अभ्यास करून पॉईंट्स शोधले

सध्याचे जर ईसीजी मशीन आपण पाहिले तर त्यामध्ये १२ पॉईंट हे रुग्णांना घरी कनेक्ट करणे शक्य नाही. किंवा चुकीचे कनेक्ट झाले तर डायग्नोसिस चुकीचे होऊ शकते. साधारणत: ईसीजी करताना छाती, हात आणि पायांवर देखील पॉईंट्स असतात या जॅकेटची निर्मिती करताना सर्वात महत्त्वाचा प्रश्न हाच होता. त्यामुळे छाती आणि पोटावर असे पॉईंट्स अपेक्षित होते. ज्याद्वारे निघणारा ईसीजी हा नेहमीच्या ईसीजी सारखाच असावा. जवळपास १३०० रुग्णांचा अभ्यास करून छाती आणि पोटावर असे पॉईंट्स शोधण्यात आले. २०२० मध्ये शिकागो येथे झालेल्या वर्ल्ड काँग्रेस ऑफ कार्डीओलॉजी इन अमेरिकन कॉलेज ऑफ कार्डीओलॉजी कॉन्फरन्स मध्ये मांडण्यात आले. यासोबतच विविध अभ्यासांद्वारे हे पॉईंट्स नेहमीच्या ईसीजी पॉईंट्स सारखेचं असल्याचे सिद्ध केले. ही ह्या जॅकेट निर्मितीची पहिली पायरी होती' अशी माहिती डॉ. गुरुनाथ परळे यांनी दिली.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११८३

**जें अपत्य थानीहूंनि निगे । तयाची भूक ते मायेसीच लागे ।**
**ए-हवी तें शब्दें काय सांगे । मग स्तन्य दे येरी ।।**



अर्जुनाने मोहातून बाहेर पडून तात्काळ हे धर्मयूध्द करावे म्हणून भगवंत प्रयत्नशिल आहेत. पण अर्जुन युध्द करण्याच्या विचाराकडे न वळता, जास्तीत जास्त नवीन विषय श्रीकृष्णाकडून समजावून घेऊ इच्छित आहे. आपण युध्दभूमीत उभे आहोत हे पण अर्जुन ज्ञान जाणून घेण्याच्या लालसेत विसरला आहे. श्रीकृष्णाकडून सांगण्याचा एक विषय संपला की लगेच अर्जुन दुसरा विषय प्रश्नरुपाने विचारीत आहे. खरे म्हणजे प्रश्न विचारायला सुध्दा शहाणपण लागते. आपले लक्ष एकाग्र असेल तर कांही शंका, प्रश्न मनात येऊ शकतात. त्यासाठी लालसा, जिज्ञासा असावी लागते. अर्जुनाकडे हे सर्व आहे, म्हणूनच एखादा विषय संपत येताच तो दुसरा प्रश्न त्या विषयाच्या अनुषंगाने विचारतो आहे. अर्जुनाने आठव्या अध्यायाच्या प्रारंभी एका पाठोपाठ अनेक प्रश्न विचारले आहेत. तो म्हणतो आहे, हे पुरुषोतमा, ब्रम्ह म्हणजे काय ? कर्म कशाचे नाव आहे ? अध्यात्म ज्याला म्हणतात ते नेमक काय आहे ? अधिभूत ते कसे ? या विषयात आधीदैव ते कोण आहे ? अधियज्ञ तो काय आहे ? या देहात तो कोण आहे ? एकाग्रचित्ताच्या पुरुषाकडून देहावसनाच्या वेळी तू कसा जाणला जातोस ? ते जाणणे कशा पध्दतीने घडते ? असे अनेक प्रश्न तो विचारीत आहे. आपल्या मुलाने आपणाला एकापेक्षा जास्त प्रश्न एकाच वेळी विचारले तर आपण त्याच्यावर रागावतो. त्याला म्हणतो, एक-एक प्रश्न विचार, नाहीतर विचारुच नकोस पण अर्जुनाने अनेक प्रश्न एकदम विचारले असतांनाही, भगवंत रागावले नाहीत ते हसत-हसत म्हणाले, व्वा अर्जुना तुझी जिज्ञासा पाहून मला आनंद वाटत आहे. मी तुझे समाधान होईल असे तुझ्या प्रश्नाचे उत्तर देतो.

माऊलींना या दोघांच्या एकमेकांवरील अधिकाराचे, प्रेमाचे कौतुक करावेसे वाटते. वक्ता आणि श्रोत्याचे असेच संबंध चोहीकंडे निर्माण झाले तर आनंदाला अंतच असणार नाही. अर्जुनाच्या मनातील विचार अगोदरच जाणून घेऊन भगवंतानी त्याच्यासमोर उत्तररुपी पक्वान्नाचे ताट वाढून ठेवले आहे. अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर देण्याची भूक श्रीकृष्णांलाच अगोदर कशी लागली आहे हे सांगतांना माऊली म्हणतात, जें अपत्य थानीहूंनि निगे । तयाची भूक ते मायेसीच लागे । ए-हवी तें शब्दें काय सांगे । मग स्तन्य दे येरी ।। अर्थात जे बाळ स्तनापासून दूर निघाले आहे, त्यावेळी त्या बाळाची भूक मातेला लागते. एरवी मला भूक लागली आहे, म्हणून मला दूध पाज असे बाळ मातेला सांगते काय ? बाळाने भूक लागल्याचे सांगीतले म्हणून माता नंतर दूध पाजते काय ? बाळ मातेला भूक लागल्याचे सांगत नाही, बाळाच्या अगोदरच त्याला पाजण्याची भूक मातेला लागत असते. तसे अर्जुन श्रीकृष्णाचे नाते आहे. अर्जुन प्रश्न विचारण्यापुर्वीच भगवंत त्याचे समाधान करण्यास उत्सुक आहेत. माऊलींनी येथे आई आणि बाळाच्या संबंधाची आठवण करुन दिली आहे. लहानपणी बाळाला एवढे जपणा-या मातेला मोठेपणी हे बाळ जपते का ? आईच्या दुधाची किंमत कशानेही चुकविता येत नसली तरीही आईची मन:पुर्वक सेवा करुन आनंदाने तिच्या ऋणात जगण्याचा प्रयत्न प्रत्येकांनी करावा अशी अपेक्षा. हा प्रयत्न आनंदात भर घालेल यात शंका नसावी.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष- चांगला दिवस |
| दि. २० जुलै २०२५ | |
| विक्रम संवत् २०८१ | |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - आषाढ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. दशमी (१२.१३) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - कृत्तिका (२२.५३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - गंड (२१.४७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (२२.५३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा. आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.

**वृषभ :** आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल. मुलांची काळजी राहील.

**मिथुन :** कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत. स्पर्धेमध्ये यश मिळेल.

**कर्क :** उतावीळपणामुळे नुकसान होण्याची शक्यता. कामात झालेल्या बदलामुळे कष्ट होण्याची शक्यता. व्यापार मध्यम राहील.

**सिंह :** आपल्या कामाचे प्रतिफळ ताबडतोब मिळेल. कार्याचा विस्तार वाढून अनकूल परिस्थिती निर्माण होईल. काही महत्वपूर्ण निर्णय घ्याल.

**कन्या :** आपले प्रयत्न यशस्वी होतील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. विचार पूर्वक निर्णय घेतल्याने फायदा होईल.

**तुळ :** प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

**वृश्चिक :** आपल्या पराक्रम िवृत्तीमुळे आपल्याकडे येणाऱ्या लोकांचा ओढा जास्त राहील. कोणाचाही तिरस्कार करू नका.

**धनु :** न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृध्द व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या.

**मकर:** अनिश्चितता राहील. सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा. विशेष सहकार्य व मार्गदर्शन मिळेल. विलासी प्रवृत्ती वाढेल.

**कुंभ :** प्रभावशाली व्यक्तित्वाम ुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल. आर्थिक लाभ झाल्याने आनंदी रहाल.

**मीन :** आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. आपल्या कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे. वाहन चालवतांना सावधानी बाळगा.



## एच.पी.व्ही. लसीकरणाने गर्भाशय कॅन्सरवर करू मात : डॉ. कहाते

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा संचलित 'अध्या' प्रकल्प, ज्वेलेक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठान,कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार बाजार, रंगा चौक, जोडबसवन्ना चौक येथील माहेर हॉस्पिटलमध्ये गर्भाशय कॅन्सर विरुद्ध लढणाऱ्या एच.पी.व्ही. लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना सुप्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ डॉ. गौरी कहाते म्हणाल्या की, कॅन्सरचे दिवसेंदिवस प्रमाण वाढताना दिसत आहे. महिलांमध्ये प्रामुख्याने गर्भाशयाचा व स्तनाचा कॅन्सर होण्याचे प्रमाण जास्त आढळते. गर्भाशयाचा कॅन्सर रोखायचा असेल तर एच.पी.व्ही. लसीकरण करून घेतले पाहिजे. प्रतिबंधात्मक लस उपलब्ध असलेला हा एकमेव कॅन्सर आहे. एच.पी.व्ही. लस केवळ वैयक्तिक संरक्षणापूर्तीच नाही. व्यापक लसीकरणामुळे या संसर्गाविरोधात प्रतिकारशक्ती निर्माण होऊ शकते. सध्या माहेर हॉस्पिटलमध्ये 'अध्या' प्रकल्पअंतर्गत ९ ते १४ वयोगटातील किशोरवयीन मुलींना एच.पी.व्ही. लसीचे दोन डोस अवघ्या १३०० रुपयात उपलब्ध करून देण्यात आले आहे. १५ वर्षे ते ४५ वर्षापर्यंतच्या मुली व महिला घेऊ शकतात. या वयोगटातील महिलांना लसीचे तीन डोस घ्यावे लागतात. ही मोहीम मर्यादित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवायची असल्याने पालकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मी बागल, डॉ. कविता चंडक, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी आदी उपस्थित होते. शिबिरात २२ किशोरवयीन मुलींनी व ५ महिलांनी एच.पी. व्ही. लसीचा पहिला डोस घेतला. अधीपरिचारिका रोजमेरे गायकवाड, आशालाता मस्के, सुकेशनी सोनकांबळे यांनी लसीकरण केले. सूत्रसंचालन आकाश गायकवाड यांनी केले. स्वागत कल्पना गडगडे यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार विकी शिवशरण यांनी मानले.

## संगणकतज्ञ अच्युत गोडबोले यांचे गुरुवारी व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या वतीने ए.आय.चे Artificial Intelligence वादळ या ज्वलंत विषयावर सुप्रसिध्द संगणकतज्ञ आणि लेखक अच्युत गोडबोले यांचे व्याख्यान गुरुवार दि. २४ जुलै रोजी सायं. ६ वा. श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहात आयोजित करण्यात आलेले आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले आहे.



**तयारी श्रावणाची...**

**श्रावण महिन्यात सिद्धेश्वर मंदिरात भाविकांची संख्या वाढते. त्या पार्श्वभूमीवर मंदिरात तयारी सुरु झाली आहे. प्रवेशद्वारातील डोमची साफसफाई करताना टिपलेले छायाचित्र.**

## ब्रह्मगर्जना प्रतिष्ठानचा आज कृतज्ञता सोहळा

**सोलापूर, दि. १९ जुलै-**

ब्रह्मगर्जना प्रतिष्ठानच्या वतीने रविवार दि.२० जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता विजापूर रोड वरील माशाळ वस्तीतील समृध्दी गार्डन येथे कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जुळे सोलापुरात श्री भगवान परशुराम जन्मोत्सव भव्य प्रमाणात संपन्न झाला. त्यास सहकार्य केलेल्या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संयोजक जयतीर्थ पडगानूर यांनी दिली. कार्यक्रमास सहकार्य केलेल्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. पडगानूर यांनी केले आहे.

## विकास सहकारी बँकेस सहा कोटींचा ढोबळ नफा




### संचालक सीए राजगोपाल मिनीयार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

विकास सहकारी बँकेस चालू वर्षी ५ कोटी ८२ लाख इतका ढोबळ नफा झाला आहे. तसेच महत्वाचे म्हणजे बँकेचे नेट एनपीएचे प्रमाण मागील सलग पाच वर्षापासून सतत शून्य टक्के आहे. बँकेने ५५० कोटींचा व्यवसाय उद्दिष्ट पार केले असून CRR २४.५० टक्के आहे, असे प्रतिपादन बँकेचे संचालक सीए राजगोपाल मिनीयार यांनी केले.

विकास सहकारी बँक लिमिटेड या संस्थेची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा माहेश्वरी सांस्कृतिक भवन, तुळजापूर वेस येथे संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. सभेत बँकेचे अध्यक्ष कमलकिशोर राठी यांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा सादर केला. आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी महाराष्ट्र राज्य अर्बन बँक फेडरेशनचा राज्यस्तरीय द्वितीय क्रम ांकाचा उत्कृष्ट बँक पुरस्कार प्राप्त झाला, तसेच सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप असोसिएशन मार्फत देण्यात येणार आदर्श बँक प्रथम पुरस्कार प्राप्त झाला असे मिनीयार यांनी सांगितले. मिणियार यांनी ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकांचे विशलेषण सादर केले. बँकेने मोबाईल बँकिंग सेवा सुरू केली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सभासदांना १२ टक्के लाभांशाची घोषणा करण्यात आली.

आभार राजेंद्र कुमार आसावा यांनी केले. सभेस संचालक राजगोपाल चंडक, हरीनिवास जाजू, राजकुमार राठी, ओमप्रकाश तिवाडी, मनीष बलदवा, डॉ. नवनीत तोष्णीवाल, चंद्रशेखर स्वामी,सुरेश बिटला, ज्योती आसावा, व्यवस्थापक पांडुरंग मंत्री उपस्थित होते.




## सेवा, राह फाउंडेशनच्या वतीने प्रमाणपत्र वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

सेवा फाउंडेशन, राह फाउंडेशन आणि एंजेल वन यांच्या संयुक्त विद्यमाने बिझनेस असोसिएट कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांचा प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्साहात पार पडला.


समारंभात ५० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा कौशल्य विकास व रोजगार कार्याल अधिकारी प्रशांत नलावडे, तृष्णा गायकवाड आणि राह फाउंडेशन मुंबईचे वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक शुभम खरात यांची उपस्थिती होती. सेवा फाउंडेशनच्या केंद्र व्यवस्थापक मनिषा वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रशांत गर्गे यांनी केले. शीतल कांबळे यांनी आभार मानले.

## प्रतिबिंब प्रतिष्ठानतर्फे पत्रकारांच्या मुला-मुलींच्या करिअरसाठी सहाय्य देणार

### राजा माने : गरजू पत्रकारांनी अर्ज करावेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

प्रतिबिंब प्रतिष्ठानच्या वतीने आता राज्यातील पत्रकारांच्या मुला-मुलींच्या करिअरसाठी तसेच त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्यासाठी प्रत्यक्ष मदत देण्यास प्रारंभ झाला आहे, अशी माहिती प्रतिबिंब प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी पत्रकार परिषदेत दिली.




केवळ पत्रकारांच्या मुला-मुलींच्या करिअरसाठी प्रतिबिंब प्रतिष्ठान ही देशातील पहिली संस्था स्थापन करण्यात आली. महाराष्ट्रातील पत्रकारांच्या कुटुंबासाठी तसेच मुला-मुलींच्या करिअरसाठी सहाय्य करणारी संस्था स्थापन करा, त्यासाठी आवश्यक ते सहकार्य आपण करु! , असा शब्द राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्राच्या कणेरी मठ कोल्हापूर येथे झालेल्या महाअधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी दिला होता.

त्यानुसार त्यांनी पूर्ण पाठबळ दिले आहे. राज्यभरातील पत्रकारांच्या म ुला-मुलींच्या करिअरसाठी तसेच त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्यासाठी प्रत्यक्ष मदत देण्यास प्रारंभ झाला आहे. आत्तापर्यंत गरजूंना एकूण अकरा लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे, असे

डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेचे अध्यक्ष राजा माने यांनी सांगितले. राज्यातील गरजू पत्रकारांनी कागदावरील अर्ज व्हॉट्सअॅप द्वारे ८६६८३४३०२४ या नंबरवर पाठवावा. तर शैक्षणिक मदत आर्थिक सहाय्यासाठी - ऑनलाईन अर्ज https://forms.gle/URaTFEWhFc7rzVQ9 , वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदतीसाठी https://forms.gle/rDK8kiLWGZhQfQ5Y6 येथे अर्ज करावेत असे आवाहन संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस सचिव दीपक नलावडे, राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत, राज्य संघटक तेजस राऊत, राष्ट्रीय सहसमन्वयक मुरलीधर चव्हाण, मुंबई शहर कार्याध्यक्ष शशिकांत देशमुख, सोलापूर जिल्ह्याचे समन्वयक राजाराम मस्के, सरचिटणीस इम्रान सगरी, उपाध्यक्ष शहानवाज शेख आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# रेशन कार्डला ई-केवायसी करा अन्यथा धान्य बंद

## अन्नधान्य वितरण अधिकारी पडोळे यांचा इशारा; सोलापुरात दीड लाख युनिटची अजून ई-केवायसी नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

रेशन दुकानांसाठी ई-केवायसी करणे आता महत्त्वाचे झाले आहे. सरकारने ई-केवायसी अनिवार्य केले असून, ज्यांनी अजूनपर्यंत ई-केवायसी केलेले नाही, त्यांनी लवकरात लवकर ई-केवायसी करावी, अन्यथा त्यांचे रेशन धान्य बंद होवू शकते, असा इशारा अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी दिला आहे.

मार्च २०२५ पासून ई-केवायसी करण्याचे काम चालू असून, जवळपास ४ वेळा शासनाकडून ई-केवायसीची मुदतवाढ होवूनही लोक ई-केवायसीला गांभीर्याने घेत नसल्याचे दिसून येत आहे. सध्या सोलापूर शहरातील १ लाख ५० हजार ३८८ लोकांची ई-केवायसी करायची राहिली असल्याचेही त्यांनी सांगितले.

### ई-केवायसीचा काय होणार फायदा

ई-केवायसी म्हणजे नो युवर कस्टमर किंवा तुमच्या ग्राहकाला जाणून घ्या. या प्रक्रियेमध्ये, रेशन कार्डधारकांची ओळख आणि इतर माहिती जसे की आधार कार्ड आणि मोबाईल नंबर सत्यापित केला जातो. आता ई-केवायसी केल्यानंतरच तुम्हाला सरकारी रेशन दुकानांमध्ये स्वस्त दरात मिळणारे धान्य मिळेल. या ई-केवायसीमुळे रेशन वितरणात होणारी अनियमितता कमी होते आणि पारदर्शकता वाढते.

आधार कार्ड, पॅनकार्डप्रमाणे रेशनकार्ड हा एक महत्वाचा दस्ताऐवज आहे. आज राज्यातील बहुतांश लोकांकडे रेशन कार्ड आहे. या रेशन कार्डचे तीन प्रकार आहेत, पांढरं, केशरी आणि पिवळं. यापैकी पिवळ्या आणि केशरी रेशन कार्डधारकांना सरकारकडून मोफत किंवा परवडणाऱ्या किंमतीत अन्नधान्य दिले जाते. या रेशन दुकानांसाठी ई-केवायसी करणे आता महत्त्वाचे आहे. सरकारने ई-केवायसी अनिवार्य केले आहे आणि ज्यांनी अजूनपर्यंत ई-केवायसी केलेले नाही, त्यांनी लवकरात लवकर करावे, अन्यथा त्यांचे रेशन कार्ड रद्द होऊ शकते. सध्या सोलापूर शहरात ५ लाख ३४ हजार २७६ युनिटपैकी ३ लाख ८३ हजार ८८८ जणांनी ई-केवायसी केली आहे. अजून १ लाख ५० हजार ३८८ जणांची ई-केवायसी पेंडिंग आहे. तर ८ हजार लोकांची स्थलांतर, मयत, लग्न होवून सासरी जाणे वगैरे कारणाने नावे यादीतून काढून टाकली आहेत.

आता अजून जुलै अखेरपर्यंतची शासनाकडून मुदतवाढ आहे. यामुळे या महिनाखेरपर्यंत उर्वरित कार्डधारकांनी आपल्या युनिटची ई-केवायसी करून घेणे गरजेचे आहे. जर का ई-केवायसी केली नाही आणि शासनस्तरावरुन आपल्याला मिळणारे धान्य बंद झाले तर पुन्हा त्या कार्डधारकांची अडचण होणार आहे. यामुळे आता वेळ न दवडता आपल्या जवळच्या राशन दुकानात ई-पॉस मशीनद्वारे किंवा मेरा राशन ॲपवर आपल्या कार्डची ई-केवायसी करून घ्या आणि धान्य मिळण्यासाठी निर्धास्त राहा, असेही आवाहन अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी केले आहे.

### ऑनलाईननेही करता येते ई-केवायसी

आपल्या घरी बसूनही ई-केवायसी करता येते. तुमच्या राज्याच्या सार्वजनिक वितरण प्रणालीच्या पोर्टलला भेट द्या. तिथे, 'लिंक आधार विथ रेशन कार्ड' या पर्यायावर क्लिक करा. तुमचा रेशन कार्ड नंबर, आधार नंबर आणि नोंदणीकृत मोबाईल नंबर प्रविष्ट करा. तुमच्या मोबाईल नंबरवर आलेला ओटीपी प्रविष्ट करून ई-केवायसी पूर्ण करा. ई-केवायसी करणे तुमच्यासाठी आणि तुमच्या कुटुंबासाठी आवश्यक आहे. त्यामुळे, लवकरात लवकर ई-केवायसी पूर्ण करा आणि सरकारी रेशन सुविधेचा लाभ घ्या.

**-ओंकार पडोळे, अन्नधान्य वितरण अधिकारी**

---

## महत्वाचे...



### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिनी जिल्ह्यात रक्तदान शिबिराचे आयोजन

**सांगोला, दि. १९ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दि.२२ जुलै रोजी सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दि.२२ जुलै रोजी वाढदिवस आहे. त्यानिमित्ताने जिल्ह्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व मंडळात रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदान करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी चेतनसिंह केदार-सावंत यांनी प्रत्येक मंडलात बैठका घेऊन नियोजन केले आहे. भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, विविध मोर्चा, आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन चेतनसिंह केदार-सावंत यांनी केले आहे.




### रोटरी क्लब स्मार्ट सिटीचा पदग्रहण समारंभ उत्साहात

**सोलापूर, दि. १९ जुलै-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटीच्या वर्ष २०२५-२६ चा दहावा पदग्रहाण समारंभ दमाणी ब्लड बँकेच्या हॉलमध्ये संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून म्हणून डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इलेक्ट रोटे. जयेश पटेल, असिस्टंट गव्हर्नर रोटे, अजय डोईजोडे, नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. अकबर नदाफ, नवनिर्वाचित सचिव रोटे, प्रा. बसवराज बिराजदार, माळवते अध्यक्ष रोटे, महेश साळुंखे उपस्थित होते. प्रारंभी महेश साळुंखे यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. त्यानंतर मावळते सचिव अकबर नदाफ यांनी मागील वर्षी केलेल्या कामाचा रिपोर्ट सादर केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय नागेश शेंडगे व अनिल चंडक यांनी करून दिले. नवनिर्वाचित अध्यक्ष व सचिव यांचा परिचय सत्यम दुधनकर यांनी केले. त्यानंतर असिस्टंट गव्हर्नर अजय डोईजोडे यांनी डिस्ट्रीक्ट गव्हर्नर सुधीर लातूरे यांचा संदेश सर्वांना समोर सादर केले. त्यानंतर डारेक्टर यांना प्रमुख पाहुणे जयेश पटेल यांच्या हस्ते पीन लावून महेश साळुंके, अनिल चंडक, नागेश शेंडगे, योगीनाथ कुडते, सत्यम दुधनकर, इक्बाल बागबान यांनी पदभार स्वीकारला तर डॉ. शिवगंगा मैंदर्गी, समीर नदाफ, तोफिक काझी यांचे नूतन सदस्य म्हणून पदग्रहण करण्यात आले. नूतन अध्यक्ष नदाफ यांनी चालू वर्षात 'लोकसहभागातून समाज परिवर्तन' व डिस्ट्रिक्ट रोटरी यावर्षीचा 'युनाइट फॉर गुड'चा उपक्रम राबवण्याचा संकल्प केला. कार्यक्रमास संतोष सपकाळ, धनश्री केळकर, विजय जाधव, मुकुंद राठी, ऑर्किड महाविद्यालयाचे डॉ. उमाकांत जाधव, प्रा. मल्लिकार्जुन आवटे, प्रा. रवी मस्के, शिक्षिका सुनंदा बिराजदार, भारती विद्यापीठाचे भारत कदम, दस्तगीर मुल्ला, मोहसिन मोमीन, सिव्हिल हॉस्पिटलचे ओफ्त्याल्मिक असिस्टंट शफिया नदाफ, सुहास भोसले, सुहास बिराजदार, परमेश्वर कलशेट्टी उपस्थित होते. सचिव प्रा. बसवराज बिराजदार यांनी आभार मानले.

### 'फॅबटेक'च्या सुशांत बिलेची स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकपदी निवड

**सांगोला, दि. १९ जुलै-**



फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागात शिक्षण घेतलेल्या पाचेगाव (बु) (ता. सांगोला) येथील सुशांत तुळशीराम बिले यांची जलसंपदा विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकपदी निवड झाली असल्याची माहिती सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा. शिवानंद माळी यांनी दिली. २०२४ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या सरळ सेवा पदभरती मध्ये सुशांत बिलेनी जलसंपदा विभागातील (स्थापत्य) गट ब (अराजपत्रीत) परीक्षा दिली होती. निवड झाल्याबद्दल फॅबटेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ. अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा.प्राजक्ता रूपनर, प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे, उपप्राचार्या डॉ. विद्यारणी क्षीरसागर, प्रा. शिवानंद माळी, प्रा. शरद आदलिंगे यांनी सुशांत बिलेचे अभिनंदन केले.

### शेळी शेतात सोडून नको म्हणल्याने मारहाण

**सोलापूर, दि. १९ जुलै -**

शेतात चरण्यासाठी शेळी सोडू नको म्हणाल्याच्या रागातून कु-हाडीच्या दांडयाने मारून एकास जखमी केले. ही मारहाण दक्षिण सोलापूर तालुक्यातील विंचूर येथे गुरुवारी १७ रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास घडली. मंजुनाथ रेऊ पवार (वय ४५, रा. शंकरनगर, विंचूर ता द सोलापूर) असे मारहाण झालेल्याचे नाव आहे. विंचूर परिसरात मंजुनाथ यांची शेती आहे. या शेतात शेळी चरण्यासाठी सोडू नका असे त्यांनी शिलसिध्द कोरे यास सांगितले. त्यावर चिडलेल्या शिलसध्दि याने कु-हाडीच्या दांडयाने मंजुनाथ यास मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने मंद्रुप येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून शनिवारी दुपारी १२ च्या सुमारास स्वत: शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाला आहे.

---

## पद्मशाली सखी संघमच्या क्रियाशील पदाधिकारी, सदस्य निवडीसाठी नावनोंदणी सुरु

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१९ जुलै-**

श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन संचलित पद्मशाली सखी संघमच्या २०२५-२६ या एका वर्षाकरिता पद्मशाली समाजातील महिला भगिनींना नवीन क्रियाशील पदाधिकारी व सदस्यपदी निवड करण्यात येणार आहे. त्यासाठी विनामूल्य नांवनोंदणी सुरु करण्यात आली आहे.

यंदाच्या वर्षांपासून उद्योग, व्यवसाय आणि स्वयंरोजगार या माध्यमातून पद्मशाली महिलांना समृद्ध व भरारी देण्याचा छोटासा प्रयत्न करण्याचा मानस आहे, अशी माहिती संस्थापक गौरीशंकर कोंडा यांनी दिली. नांवनोंदणीची ५ ऑगस्टपर्यंत ९०२१५५१४३१ या व्हाटसअपवर पूर्ण पत्त्यांसह नोंदवावीत. यापूर्वी झालेल्या जुन्या महिला भगिनी सदस्यांनाही नोंदणी करण्याची संधी आहे. परंतु, ज्या भगिनी सदस्य होतील त्या सखी संघमच्या वतीने आयोजित उपक्रमांना उपस्थिती राहणे आवश्यक आहे. महिलांना नवनवीन व्यवसाय करण्यासंदर्भात प्रोत्साहन देण्याबरोबरच महिलांना आर्थिक साक्षरतेबद्दल माहिती देणे, सक्षमीसाठी मार्गदर्शन, कर्जाविषयी माहिती, कायदेविषयक, सुरक्षासंदर्भात व सायबर गुन्ह्याबाबतीतही मार्गदर्शन, महिलांसाठी विशेष आरोग्य शिबीराचे उपक्रम, यासोबत विविध अभिनव सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

---

## आयटीआय प्रवेश प्रक्रियेमध्ये दुहेरी लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर कारवाई

### मंत्री मंगलप्रभात लोढा यांचा पवित्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

विधान परिषदेत २६० च्या प्रस्तावावर उत्तर देताना कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी स्पष्ट केले की, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेताना अनुसूचित जाती आणि अल्पसंख्याक दोन्ही सवलतींचा गैरफायदा घेतलेल्या विद्यार्थ्यांवर शासनाद्वारे कारवाई करण्यात येणार आहे. खोट्या मार्गाने मिळवलेले फायदे थांबवून प्रामाणिक विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

या अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला देत स्पष्ट केले होते की, अनुसूचित जातींच्या आरक्षणाचा लाभ केवळ हिंदू, बौद्ध आणि शीख समाजातील नागरिकांनाच मर्यादित आहे. इतर धर्मांतील काहींनी जर अशी जात प्रमाणपत्रे वापरून हा लाभ घेतला असेल, तर त्यांच्या प्रमाणपत्रांची वैधता रद्द करण्यात येईल, त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई केली जाईल आणि सरकार या संदर्भात आणखी प्रभावी उपाययोजना करण्याच्या तयारीत आहे. या पार्श्वभूमीवर खढख मध्ये बनावट प्रमाणपत्रांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांविरोधात होणारी कारवाईही महत्त्वाची ठरणार आहे. मंत्री लोढा यांनी स्पष्ट केले कि विविध माध्यमांतून पाच लाख विद्यार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी पाठबळ पुरवण्याचा सरकारचा मानस आहे. स्टार्टअप सुरू करण्यापूर्वी संबंधित क्षेत्राचा आवश्यक अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी विशेष प्रशिक्षणाची योजना राबवण्यात येणार आहे. तसेच, स्टार्टअप्स आणि व्यवसायांसाठी मुंबईजवळ जगातील सर्वोत्तम 'इनोव्हेशन सिटी' उभारण्याचे काम सरकारने हाती घेतले आहे. प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत इनक्युबेशन सेंटर सुरू करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि तांत्रिक मदत दिली जाईल.

### कौशल्य विकासासाठी सरकारची नवी दिशा

मंत्री लोढा यांनी राज्य सरकारच्या रोजगार, स्टार्टअप आणि कौशल्य विकास योजनांचा आढावा सादर केला. ते म्हणाले की, आयटीआय अद्ययावत करण्यासाठी पीपीपी मॉडेल अंमलात आणण्याचा क्रांतिकारी निर्णय आमच्या विभागाने घेतला. याद्वारे आयटीआयमध्ये पायाभूत सुधारणा, नवीन सुविधा, तंत्रज्ञान आणि विकासासाठी आवश्यक पाठबळ पुरवले जाईल. इतकेच नाही तर विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, नवीन अभ्यासक्रम, रोजगार आणि स्वयंरोजगारासाठी सहकार्य उपलब्ध होईल. आयटीआयमधील कोर्सेसला डिप्लोमा दर्जाची मान्यता मिळावी यासाठी देखील आम्ही प्रयत्नशील आहोत, असेही त्यांनी सांगितले.

---

## प्रवाशास मारहाण करून ऐवज लुटला

### १२ तासाच्या आत तिघे मुद्देमालासह ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

रात्रीच्या वेळी रेल्वे स्थानकापासून पायी जाणाऱ्या प्रवाशास मारहाण करून जबरदस्तीने ऐवज लुटणाऱ्या तीन चोरट्यांना फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने १२ तासाच्या आत ताब्यात घेऊन मुद्देमाल जप्त केला आहे.

मयूर बसवराज व्हट्टे (रा. धरमशी लाईन, मुरारजी पेठ) हे पहाटे पावणेचारच्या सुमारास कन्याकुमारी एक्सप्रेसने सोलापूर रेल्वे स्टेशन येथे उतरले. ते पायी एसटी स्टँड कडे जात असताना सुपर मार्केट समोर एका मोटरसायकल वर बसून आलेल्या १८ ते २० वयाच्या तीन मित्रांनी त्यांना अडवून मारहाण करून त्यांच्या खिशातील १८५० रुपये व हातातील मोबाईल जबरदस्त ने काढून घेतला होता. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

डीबी पथकाने तांत्रिक पद्धतीने व बातमीदाराकडून शोध घेऊन जुना पुणे नाका येथील स्मशानभूमीजवळ तीन आरोपींना ताब्यात घेतले. कुणाल किसन कांबळे (वय २०), ग्रंथराज उर्फ मंथन शरणप्पा महेंद्रकर (वय १९, दोघे रा. रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ) व एक अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले. त्यांच्याकडून गेलेला मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेली ८० हजारांची दुचाकी असा सुमारे एक लाखाचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त एम राज कुमार, पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रताप पोमन, पोलीस निरीक्षक महादेव राऊत, तानाजी दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय क्षीरसागर, पोलीस अंमलदार प्रवीण चुंगे, बसवराज परीट, शिवानंद भीमदे, अजय चव्हाण, विनोद व्हटकर आदींनी केली.



### वाहतूक शिस्तीचे पालन कधी?

**सोलापूर : सहापदरी झालेल्या अक्कलकोट रोडवर सर्रास वाहनाधारकांकडून बेशिस्तीचे दर्शन घडते. विडी घरकुल, गांधीनगर परिसरातील नागरिक आपला जीव धोक्यात घालून विरुद्ध दिशेने येताना व जाताना दिसतात. त्यामुळे आम्ही शिस्तीचे पालन कधी करणार? असा प्रश्न निर्माण होतो. (छायाचित्र : केवल तिवारी)**

---

## डॉ. महेश चोप्रा यांनी वयाच्या ८८ व्या वर्षी मिळवली पीएच.डी. पदवी

### वयाचं बंधन झुगारून ज्ञानसाधनेचा विजय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

डॉ. महेशजी चोप्रा यांनी वयाच्या ८८ व्या वर्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून पीएच.डी. पदवी संपादन केली, ही एक उल्लेखनीय शैक्षणिक घडामोड ठरली आहे. त्यांनी इंग्रजी विषयात या विषयावर संशोधन केलं. या प्रबंधात त्यांनी श्री अरविंद यांच्या सॉनेट्समधील अध्यात्मिक विचारांचा अभ्यास केला आहे. ही प्रक्रिया केवळ साहित्यिक नव्हे, तर वैचारिक आणि आत्मिक शोध घेणारी होती. या विषयाच्या निवडीतून त्यांच्या वैचारिक रसिकतेचा आणि गहनतेचा प्रत्यय येतो.

डॉ. चोप्रा सध्या डीएव्ही सीएमसी, नवी दिल्लीचे डायरेक्टर आणि डीएव्ही संस्था सोलापूरचे स्थानिक सचिव म्हणून कार्यरत आहेत. संस्थेच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कामकाजात त्यांचा सहभाग सातत्यपूर्ण राहिला आहे. संस्थेच्या आर्थिक आणि सामाजिक दृष्टीनेही त्यांनी जबाबदारीने भूमिका बजावली आहे. शाळेतील विद्यार्थ्यांपासून ते शिक्षक व पालकांपर्यंत सर्वांशी संवाद ठेवत त्यांनी संस्थेच्या कार्याला एक मानवकेंद्रित दिशा दिली.



श्री अरविंद यांचे साहित्य गूढ आणि चिंतनशील आहे. त्यांच्या सॉनेट्समधून आत्म्याच्या विकासाचा आणि ईश्वरी जाणिवेचा प्रवास मांडलेला आहे. डॉ. चोप्रा यांनी या सॉनेट्सचा अभ्यास करताना केवळ कवितेच्या भाषिक सौंदर्याकडे न पाहता त्यामधील अंतमुखतेचे आणि तात्त्विक विचारांचे विश्लेषण केले आहे. या विश्लेषणातून अध्यात्म आणि साहित्य यांचं परस्परसंबंध किती गहिरा असतो, हे अधोरेखित झालं आहे. त्यांच्या प्रबंधातील काही भाग वाचताना वाचक स्वतःलाच अंतर्मुख झाल्यासारखं वाटतं.

या शैक्षणिक यशामुळे, शिक्षण आणि वय यांचं नातं नव्याने अधोरेखित झालं आहे. अभ्यासासाठी वयोमर्यादा नसते, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिलं आहे. या उदाहरणातून आजच्या विद्यार्थ्यांनी ज्ञानाकडे केवळ पदवीसाठी नव्हे तर वैचारिक समृद्धीसाठी बघावं, असा सूचक संदेश मिळतो. त्यांनी दाखवून दिलं आहे की, शिस्त आणि सातत्य या दोन मूल्यांमुळे आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर नवे क्षितिज गाठता येते. शिक्षण ही आजीवन प्रक्रिया असते, हे त्यांनी आपल्या कृतीतून अधोरेखित केलं आहे. डॉ. चोप्रा यांचं कार्य व अनुभव हे शैक्षणिक व्यवस्थापन आणि वैचारिक अभ्यास या दोन्ही अंगांनी विचारात घेण्यासारखं आहे. त्यांच्या संशोधनाची दिशा आणि अंमलबजावणीची शैली यावरून एक सुसंगत आणि अभ्यासपूर्ण दृष्टिकोन लक्षात येतो. त्यांचं हे योगदान एक अभ्यासक, प्रशासक आणि मार्गदर्शक म्हणून पुढील पिढ्यांसाठी विचार करण्यासारखं ठरतं. आजच्या शिक्षणव्यवस्थेला मूल्यनिष्ठ अभ्यासकांची आणि जीवनाकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहणाऱ्या विचारवंतांची नितांत गरज आहे. या दृष्टीने डॉ. चोप्रा यांचं उदाहरण निश्चितच लक्षवेधी आहे.

---

## सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंचचे पुरस्कार जाहीर

### कलढोणे, डॉ. पुजारी डॉ. ढेरे, प्रा. शहा, यांचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंचचे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. स्व. रंगनाथ लोहार साहित्य पुरस्कार ज्येष्ठ गायक दीपक कलढोणे यांना, स्व. सुमतीबाई येळेगावकर स्मृति पुरस्कार प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे व प्रा. धनंजय शहा यांना,तर स्व. डॉ.मीर इसहाक शेख स्मृति पुरस्कार उपप्राचार्य डॉ. सुहास पुजारी यांना प्रदान करण्यात येतील.






एन आर. बेरिया सभागृह लष्कर येथे शनिवार २६ जुलै रोजी दुपारी ४.३० वा. पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित केला आहे. माजी महापौर यु.एन. बेरिया यांच्या अध्यक्षतेखाली, अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु डॉ.इरेश स्वामी यांच्या हस्ते हे पुरस्कार सन्मानपूर्वक देण्यात येतील. पुरस्काराचे स्वरूप शाल, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात येणार आहे. तरी कृपया कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन मंचच्या वतीने अध्यक्ष फैय्याज शेख व कार्यवाह सुनील पुजारी यांनी केले आहे

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...




### आषाढी वारीमध्ये 'सिंहगड'मधील विद्यार्थ्यांचा पोलिस मित्र म्हणून सहभाग

**पंढरपूर, दि. १९ जुलै-**
येथील एस.के.एन सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ६ जुलै २०२५ या दिवशी पार पडलेल्या आषाढी वारी मध्ये ४ ते ६ जुलै दरम्यान माहिती व मदत पोलीस प्रशासन सोलापूर विभाग यांच्या सोबत वारक-यांच्या सेवेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून खुप महत्वपूर्ण मदत करून सामाजिक बांधिलकी जोपासली. या विद्यार्थ्यांचे सन्मानपत्र देऊन कौतुक करण्यात आले सिंहगड महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पोलीस प्रशासनाकडून प्रमाणपत्र देऊन अभिनंदन व कौतुक करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी दिली. यादरम्यान पोलिस प्रशासनाचे अधिकारी, पीएसआय मोनिका खडके-पाटील, प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा.चंद्रकांत देशमुख, प्रा. सुमित इंगोले, प्रा. गुरुराज इनामदार, प्रा. सिद्धेश्वर गंगोंडा, प्रा.अर्जुन मासाळ, एनएसएस प्रेसिडेंट अथर्व कुराडे उपस्थित होते. यादरम्यान पोलिस प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करून सिंहगड कॉलेजचे व विद्यार्थ्यांचे आभार मानले. याशिवाय वारी मध्ये सेवा करत असताना आलेले अनुभव विद्यार्थ्यांनी यादरम्यान मनोगत व्यक्त करताना सांगितले.



### कौठाळी येथे आरोग्य शिबिरात ७१ जणांची तपासणी

**सोलापूर, दि. १९ जुलै-**
श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा आणि लोकमंगल जीवन वेदा आयुर्वेदिक हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने समृद्ध गाव योजना आणि राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत मौजे कौठाळी (ता. उत्तर सोलापूर) येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर राबविण्यात आले. शिबिराचे उद्घाटन कौठाळी गावच्या प्रथम नागरिक सरपंच श्वेता पाटील आणि लोकमंगल जीवन वेदा आयुर्वेदिक हॉस्पिटलचे डॉ. अमजद बिजापुरे यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरामध्ये ७१ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिराच्या आयोजनासाठी लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. शिबिराच्या संपन्नतेसाठी लोकमंगल जीवनवेदा हॉस्पिटलचे डॉ. अमजद बिजापुरे, किरण वाघमोडे, प्राजक्ता गायकवाड, सुवर्णा भोसले आणि रमेश पवार यांचे सहकार्य लाभले. उद्घाटन प्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक धनंजय पाटील, समाधान पाटेकर, अशोक जाधव, आशा सेविका शितल जाधव, गंगासागर झुंजारे, बालिका माळी आणि गावातील नागरिकांची उपस्थिती होती. शिबिराच्या यशस्वी आयोजन व संपन्नतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे आणि प्रा. नम्रता गोरे तसेच तृतीय वर्षातील रासेयो स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

### घरकुल लाभार्थी वाढीव अनुदानाच्या प्रतीक्षेतच

**पिलीव, दि.१९ जुलै-**
प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेतील लाभार्थींना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये वाढीव पन्नास हजार रुपयांची घोषणा केली होती. याचा ग्रामविकास विभागाने रितसर शासन निर्णय सुध्दा काढला पण अदयापही लाभार्थींना हे पन्नास हजाराचे वाढीव अनुदान मिळालेच नसल्याने लाभार्थी या अनुदानाच्या प्रतिक्षेत आहेत. या योजनेअंतर्गत सोलापूर जिल्हयात जवळपास एक लाख पाच हजार घरकूले मंजूर झाली आहेत. यामध्ये या लाभार्थीना पहीला हप्ता १५ हजार रुपयांचा, दुसरा हप्ता ७० हजार व तिसरा हप्ता ३० हजार रुपयांचा याशिवाय मनेरगातुन २८ हजार रुपये तर शौचालयासाठी १२ हजार रुपये वाढीव पन्नास हजार रुपयातुन १५ हजार रुपये सौर पॅनल साठी तर ३५ हजार रुपये असे अनुदान देणयाचे शासनाने जाहीर केले आहे. मात्र शासनाने अदयापही त्या निर्णयाची अंमलबजावणीच केली नाही. वाढीव अनुदान नाही, मोफत वाळु नाही, तसेच मनरेगातुन मिळणारे पैसे सुद्धा मिळत नाहीत. यामुळे प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेतील लाभार्थी चांगलेच अडचणीत सापडले असुन अनेक लाभार्थ्यांनी अद्यापही कामच सुरू केलेले नाही. अधिकारी मात्र म्हणतात शासनाचे वाढीव पन्नास हजाराचे अनुदान शासनाकडुन नक्की मिळणार आहे पण नक्की कधी मिळणार आहे हे मात्र माहित नसल्याचे अधिकारी सांगतात. फेब्रुवारी २०२५ मध्ये मंजूर झालेल्या घरकुलांची तिन बिले मिळाली आहेत पण मनरेगातील बिल व पुढचे बिल मात्र मागणी करुनही अद्यापही लाभार्थींना मिळण्यास प्रचंड विलंब झाला आहे.

### उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिनी ५ हजार वह्या वाटप करणार : शिंदे

**पंढरपूर, दि. १९ जुलै-**
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने दि.२२ ते ३० जुलै या कालावधीत वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम राबविण्याचा सप्ताह आयोजित केलेला आहे. यानिमित्त राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे यांच्यावतीने गोरगरीब गरजू विद्यार्थ्यांना ५ हजार वह्या व ग्रामीण भागातून येणाऱ्या गरजू मुलींना सायकली वाटप करण्यात येणार आहेत. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच वर्षभर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या माध्यमातून श्रीकांत शिंदे हे गुणवंत विद्यार्थ्यांचा, आदर्श मातांचा सन्मान, कुस्ती स्पर्धेचे आयोजन, वकृत्व स्पर्धेचे आयोजन, शिव गर्जना सांस्कृतिक कार्यक्रम यासह विविध उपक्रम राबवत असतात. आता याही वर्षी ५ हजार विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात येणार आहेत तसेच मुलींना सायकली वाटप करण्यात येणार आहे अशी माहिती श्रीकांत शिंदे यानी दिली.

# स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांची होतेय लूट

## सामान्य नागरिकांतून संताप व्यक्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**
महावितरण विभागाकडून वीजचोरी व सुरळीत वीज बिलासाठी स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहे. पूर्वीचे वीज मीटर चांगले व सुरळीत असताना पण महावितरण विभागाकडून स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती करण्यात येत आहे. मात्र या स्मार्ट मीटरमुळे वीज ग्राहकांना अतिरिक्त वीज बिलाचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्यामुळे वीज ग्राहकांमधून स्मार्ट मीटर बंद करण्याची मागणी होत आहे.




सामान्य ग्राहकांना स्मार्ट मीटर बसविण्यापूर्वी महिन्याला पाचशे रूपयापासून ते सातशे रूपयापर्यंत वीज बिल येत होते. त्या वीज ग्राहकांना आता महिन्याला दोन हजारापर्यंत बिल येत आहे. त्यामुळे सर्वसामान्य वीज ग्राहकांची आर्थिक लूट होत आहे. अनेक ग्राहकांनी वीज वापर केला नसताना पण त्या ग्राहकांना हजार रूपयाच्या पुढे बिल येत आहे. बिल दिल्यानंतर वसूली सक्ती करण्यात येत असल्याने व बिलाअभावी वीज पुरवठा बंद झाल्याने वीज ग्राहकांवर अंधारात बसण्याची वेळ आली आहे. त्यामुळे मुलांच्या अभ्यासावर परीणाम होत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने विषारी प्राण्यांचे वर्दळ दिसून येत आहे. अशावेळी वीज पुरवठा बंद झाल्यानंतर दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून स्मार्ट मीटर सक्ती बंद करून वीज पूर्वीप्रमाणे वीज बिल देण्याची मागणी करण्यात येत आहे.

### आमदारांमार्फत पाठपुरावा सुरू

मंद्रूपमधील कमी वीज वापरणाऱ्या वीज ग्राहकांना स्मार्ट मीटरमुळे चार ते पाच हजार रूपये बिल आले आहे. स्मार्ट मीटरच्या माध्यमातून वीज ग्राहकांची आर्थिक लूट सुरू आहे. याबाबत म हावितरण अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे मिळत आहेत. वीज ग्राहकांची समस्या आमदार सुभाष देशमुख यांना सांगितल्यानंतर अधिवेशन संपल्यानंतर बैठक घेऊन उपाययोजना करणार असल्याचे सांगितले आहे.

- **गौरीशंकर मेंडगुदले**, तालुका संघटन सरचिटणिस, भाजपा

## नवीन नोंदणी बंद झाल्याने कामगार लाभापासून वंचित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**
असंघटीत कामगारांची ऑनलाइन नोंदणी बंद करण्यात आल्याने अनेक कामगार शासनाच्या विविध लाभांपासून वंचित राहत आहेत. त्यामुळे कामगारांची ऑनलाइन नोंदणी सुरू करण्याची मागणी होत आहे.

असंघटीत कामगारांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळावे म्हणून नोंदणीकृत कामगारांची ऑनलाइन नोंदणी करण्यात येत आहे. कामगारांनी ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर त्यांची कार्यालयीन पडताळणी करण्यात येते. कार्यालयीन पडताळणी झाल्यानंतर त्या कामगाराची नोंदणी होते. त्यानंतर बांधकाम साहित्य , मुलांसाठी शिष्यवृत्ती व इतर लाभ मिळण्यास सुरूवात होते. कामगारांनी ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर कार्यालयाकडून पडताळणी करण्यात येत नसल्याने अनेक कामगारोचे अर्ज प्रलंबित आहेत. त्यामुळे मुलांची शिष्यवृत्ती प्रलंबित राहीली आहे. परीणामी कामगारांना आर्थिक भुर्दंड सहन करावे लागत आहे. याशिवाय कामगारंच्या इतर फायदा मिळत नसल्याचे सांगण्यात येत आहे. म्हणून कामगारांची ऑनलाइन नोंदणी सुरू करण्याची मागणी होत आहे.

# संवाद मेळाव्यात निर्भया पथकाचे मार्गदर्शन

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १९ जुलै-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेजमध्ये रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सीलचे सदस्य तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थी संवाद मेळाव्यात किशोरवयीनांना निर्भया पथकामार्फत मार्गदर्शनासह वृक्षारोपण करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरवात कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पांजली वाहुन करणयात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विदयालयाचे मुख्याध्यापक अशोक बागल सर यांनी केले. अकलुज येथील निर्भया पथकाच्या पोलीस उपनिरीक्षक वनरे मॅडम यांनी किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी सोशल मीडियाचा योग्य वापर करा गैरवापर करु नका, सोशल मीडियावरुन किंवा प्रत्येक्षपणे कोण त्रास देत असेल तर थेट आमच्यशी संपर्क साधावा, या किशोरवयीन मुला-मुलींनी या वयात अभ्यासाकडे लक्ष देत आपले ध्येय निश्चित करा असे आवाहन यावेळी त्यांनी केले. यावेळी निर्भया पथकाचे घाडगे यांनीही मुलांना मार्गदर्शन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस संघटक हर्षवर्धन ठोंबरे, रणजित वाघमोडे, पांडुरंग गोरे, निर्भया पथकाचे प्रसाद सुर्यवंशी ,राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्ष पुनमताई भैस, पत्रकार संजय पाटील, प्रमोद भैस, अतुल नष्टे, रघुनाथ देवकर, दामोदर लोखंडे, सुजित सातपुते, डॉ. निलेश कांबळे, अंकुश भैस, सातपुते मॅडम यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करणयात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. झाडे यांनी केले तर श्री. आभार भंडारे यांनी मानले.

## संदीप कोहिणकर यांच्याकडे डीआरडीएचा पदभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. १९ जुलै -**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचा प्रभारी पदभार जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर तर बांधकाम विभाग दोनच्या कार्यकारी अभियंता पदाचा प्रभारी पदभार बांधकाम विभाग एकचे कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे यांच्याकडे देण्यात आला आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे यांची अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर जिल्हा परिषद हिंगोली येथे बदली झाली आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक पदाचा तात्पुरता पदभार जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक दोनचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांची राष्ट्रीय महामार्ग विभाग सोलापूरच्या कार्यकारी अभियंता पदी बदली करण्यात आली आहे. जिल्हा परिषद बांधकाम क्रमांक दोनचे प्रभारी पदभार तात्पुरत्या स्वरूपात जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक एकचे कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे यांच्याकडे सोपीविणयात आला आहे.

# मोहोळ-पंढरपूर पालखी मार्ग अपूर्णच

## ३ वर्षापासून पोखरापूर अन् तुंगत येथे काम अर्धवटच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जुलै-**
गेल्या तीन वर्षापासून मोहोळ-पंढरपूर पालखी महामार्ग काम अपूर्ण आवस्थेतच आहे. तरीसुध्दा मार्ग पूर्ण झाले म्हणून टोल वसुली मात्र सुरू आहे. पोखरापूर, तुंगत तसेच मोहळजवळीही काम अपूर्णच असल्याने अपघाताला आमंत्रम मिळत आहे.

या महामार्गावरून शेकडो दिंड्या पंढरपूरला जातात. या माहमार्गावर वाहतूकही मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे अपूर्ण काम लवकर पूर्ण गरजेचे आहे. महामार्ग प्राधिकरणाने या समस्येकडे लक्ष द्यावे.



मोहोळ, पोखरापूर, तुंगत येथील काम अर्धवट आवस्थेत आहे. बोगद्यामध्ये पावसाचे पाणी जाण्यासाठी व्यवस्था नाही. पोखरापूर येथे पावसाचे पाणी शिरल्याने दुकानात जात आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष घालण्याची मागणी होत आहे. मोहोळ बसस्थानकासमोर मोठा खड्डा पडल्याने पाणी साचत आहे. तेथे नुकताच कोळशाने भरलेला ट्रक रुतला होता. त्याला क्रेनच्या सहाय्याने काढण्यात आले.

# मुरूम उत्खननात अधिकारीच सामील?

## चिंचोलीकाटी ग्रामपंचायत सदस्याचा आरोप; जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.१९ जुलै-**
चिंचोली काटी एमआयडीसीत अवैध मुरूम उत्खननास मंडल अधिकाऱ्या कडून अभय मिळत असल्याची तक्रार ग्राम पंचायत सदस्या यल्लूताई वाघमारे यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे केली आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी काय कारवाई करणार ? याकडे लक्ष लागले आहे.

मोहोळ तालुक्यातील अवैध मुरूम उपसा प्रकरण दोन वेळा विधान सभेत गाजले आहे. माजी आमदार यशवंत माने व विद्यमान आमदार राजू खरे यांनी मांडले. त्यामुळे काही काळ अवैध मुरूम उत्खनन करणाऱ्यावर चांगलाच वचक बसला होता. काही काळ गेल्यानंतर पुन्हा चोरी छुप्या मार्गाने हळूहळू मुरुमाचे टिपर धावू लागले आणि सध्याच्या परिस्थितीत तर कहरच चालू आहे .नावालाच रॉयल्टी काढायची अन पाचपट मुरूम उचलायचा ही सवय नित्याचीच होवू लागली असून त्यास तलाठी व मंडल अधिकारी सामील होवू लागले अन या गोष्टीकडे लागेबाधे निर्माण झाल्याने तक्रारदारास टाळण्याचे प्रकार होवू लागले. असाच काहीसा प्रकार चिंचोलीकाटी एम आयडीसीत होवू लागला. तक्रारदाराची दखल न घेणे जास्तच तक्रारी होवू लागल्या तर तक्रारदाराचे फोन नंबर ब्लॅक लिस्ट मध्ये टाकणे असेही प्रकार यापूर्वी झाल्याचे तक्रारदार सांगतात. समोरासमोर भेट झालीच तर तुम्ही लेखी तक्रार द्या कारवाई करतो म्हणून सांगायचे. तक्रार दिल्यानंतर माझ्याकडे तुमचा अर्ज आलाच नाही म्हणून थांबल्याचे सांगायचे अन ज्यांच्या विरोधात तक्रार आहे त्यांच्या भेटी गाठी अधिकारी घेतात अन कारवाई चालू असल्याची बतावणी करतात. असाच प्रकार वारंवार सावळेश्वर परिसरात होत असल्याचे नागरिक सांगतात. ग्राम पंचायत सदस्या वाघमारे यांनी अवैध मुरूम उत्खननाबाबत तक्रार केल्यावरून मंडल अधिकारी यांना सांगितले असता मला काय तेवढेच काम नाही अशी उत्तर देत पाठराखण केली जाते. या अवैध मुरूम उपसा प्रकरणाची चौकशी व्हावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा वाघमारे यांनी दिला आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय काय कारवाई करणार? याकडे या भागातील नागरीकांचे लक्ष लागून राहिले आहे.

# सामाजिक विकास निधीतून २३ कोटी निधी मंजूर

## अनुसूचित जातीच्या नागरी वस्तीतील कामांना निधी उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जुलै-**
शहर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तीतील रस्ते, पाणी, पथदिवे व अभ्यासिका आदी कामांसाठी २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षात राज्य सामाजिक न्याय विभागाच्या वतीने १५८ कामांना २३ कोटींचा निधी उपलब्ध झाला आहे.

शहर जिल्ह्यातील मातंग, चर्मकार, नवबौद्ध, होलार, ढोर यासह अन्य अनुसूचित जातीच्या वसाहतीत रस्ते, पाणी, अभ्यासिका, अंतर्गत रस्ते, गटार बांधणे, पर्जन्य पाण्याचा निचरा, व्यायाम शाळा, सार्वजनिक सुलभशौचालय, स्मशानभूमीची विकास करणे, मलनिस्सारण आदी प्राथमिक सुविधा निर्माण करण्यासाठी २३ कोटींच्या रकमेतून १५८ कामांसाठी आर्थिक तरतूद केली आहे. ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका व महापालिका या स्थानिक सुराज्य संस्थेने सुचवलेल्या कामांना त्या प्रकल्पाच्या अंदाजपत्रकानुसार आमदाराच्या शिफारसी वरून निधीची तरतूद केली आहे.

> अनुसूचित जातीच्या वस्तीतील प्राथमिक सुविधांसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार व ज्या त्या विधानसभेच्या मतदार संघातील आमदारांच्या शिफारसीनुसार निधीची पूर्तता केली जाते.
>
> - **सुलोचना सोनवणे-महाडिक,** सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय विभाग

> अनुसूचित जातीच्या नागरी वस्तीत प्राथमिक सुविधा देण्यासाठी निधीची पूर्तता होणे. सकारात्मक असून निधीच्या रकमेत भरीव वाढ केल्यास दर्जेदार कामे होतील. यासाठी निधी वाढीची गरज आहे.
>
> - **अतुल गायकवाड, संचालक,** सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर

## अज्ञात कारणावरुन तरुणाची गळफास घेवून आत्महत्या

**मंगळवेढा दि. १९ जुलै-**
सलगर बु|| येथे अज्ञात कारणावरुन राहते घरी पत्र्याच्या अँगलला दोरीने गळफास घेवून एका ३६ वर्षीय तरुणाने आत्महत्या केली असून पापण्णा बिराजदार असे त्या तरुणाचे नाव आहे. दरम्यान या घटनेची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील मयत पापण्णा बिराजदार याने दि.१४ जुलै रोजी सकाळी ११.३० च्या पुर्वी सलगर येथील राहते घरी अज्ञात कारणावरुन पत्र्याच्या अँगलला पांढर्या रंगाच्या दाव्याने गळफास घेवून जीवनाचा शेवट केला असल्याची खबर मलाप्पा बिराजदार याने पोलीसात दिल्यानंतर अकस्मात मयत अशी नोंद झाली असून याचा अधिक तपास पोलीस हवालदार काळे हे करीत आहेत.

# जिल्हा परिषदेच्या ६५४ शिक्षकांची बदली

## २ जुलैपर्यंत संवर्ग दोन बदली प्रक्रिया

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**
जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदलीमध्ये विशेष संवर्ग एकमधील इच्छुक शिक्षकांना ऑनलाईन पद्धतीने बदली पसंतीक्रम देण्यात आला आहे. यात संवर्ग एकमधील ६५४ शिक्षकांच्या बदल्या झाल्या आहेत. जिल्ह्यातील ७,८३७ शिक्षकांपैकी ४,४३८ शिक्षक बदलीस पात्र ठरले आहेत. त्यामुळे सोलापूर जिल्हा परिषदेच्या एकूण शिक्षकांपैकी निम्म्यापेक्षा जास्त शिक्षकांच्या बदल्या यावर्षी होणार आहेत.

जिल्हा परिषदेतील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून रिक्त पदे बदली पोर्टलवर जाहीर करण्यात आली होती. बदली प्रक्रियेतील टप्प्याप्रमाणे विशेष संवर्ग एकमध्ये कर्करोग, हृदयविकार शस्त्रक्रिया, विधवा, परित्यक्ता, कुमारी शिक्षिका आणि दिव्यांग शिक्षक अशा विशेष बाबींमुळे प्राधान्य असलेल्या शिक्षकांना सोयीनुसार पसंती क्रम देऊन शाळा निवडण्याची प्रक्रिया

झाली, त्यानंतर बदली प्रक्रिया पूर्ण झाली. ग्रामविकास विकास विभागाव्दारे बदली प्रक्रीया राबवली जात आहे. याचा लाभ जिल्ह्यातील साडेचार हजार शिक्षकांना मिळणार आहे.

> संवर्ग एकमधील शिक्षकांच्या बदली प्रक्रियेचा टप्पा पूर्ण झाला आहे. दुसरा टप्प्यातील बदलीसाठी अर्ज करण्यास सुरुवात झाली आहे. शिक्षकांनी आवर्जून बदलीसाठी अर्ज करावेत. बदली अर्ज करण्यापासून कोणी वंचित राहिल्यास संबंधित शिक्षक स्वतः जबाबदार राहणार आहेत.
>
> **-कादर शेख, शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद**

### शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण

जिल्हांतर्गत बदली प्रक्रिया सुरू झाल्यामुळे बदली इच्छूक शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. विशेष संवर्ग एक प्राधान्य क्रममधील शिक्षकांना बदली अर्ज भरण्याची संधी दिल्यानंतर विशेष संवर्ग दोन, अवघड क्षेत्रातील बदली पात्रताधारक शिक्षक, सर्वसाधारण बदली पात्र शिक्षक अशा पद्धतीने इतर शिक्षकांनाही बदली प्रक्रियेसाठी संधी मिळणार आहे.

### संवर्ग दोन मधील प्रक्रियेस प्रारंभ

बदली पोर्टलवर संवर्ग दोनची प्रक्रिया आजपासून विशेष संवर्ग शिक्षक भाग १ चा बदली टप्पा पूर्ण झाला आहे. १८ जुलै रोजी सुधारित यादी प्रसिध्द करण्यात आली. त्यानंतर १९ ते २२ जुलै २०२५ या कालावधीमध्ये बदली पोर्टलवर बदली अर्ज करता येणार आहे. यात पती - पत्नी दोघेही नोकरीला असणारे व दोघांच्या नियुक्तीचे ठिकाणामधील अंतर एकमेकांपासून ३० किमीपेक्षा जास्त असलेले शिक्षक बदलीस पात्र ठरणार आहेत.

### भाषानिहाय बदली शिक्षक संख्या

मराठी.. ६२६
कन्नड... १७
उर्दू... ११



आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांवर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत श्रुती भूषण खटावकर (वय २७, रा. जोडभावी पेठ, चांभार गल्ली, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती भूषण, दीर कुमार, सासू रत्नमाला, नणंद वंदा साळे (सर्व रा. सांगली) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील विवाहिता श्रुती खटावकर या सन २०१५ ते ३१ मे २०२५ या कालावधीत पतीसोबत सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती भूषण हा दारू पिऊन येऊन श्रुती यांच्या चारित्र्यावर संशय घेऊन सतत मारहाण करून माहेरून १० लाख रुपये घेऊन ये म्हणून दमदाटी करीत होता. तसेच श्रुती यांना दोन मुली झाल्याचे कारणावरून पती व इतरांनी वारंवार मानसिक त्रास दिला. पती भूषण याने वॉटसअॅपवर बदनामीकारक व अश्लिल पोस्ट करून श्रुती व तिच्या वडीलांची समाजामध्ये बदनामी केली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस निरीक्षक शेख पुढील तपास करीत आहेत.

## महत्वाचे...



### प्रा. धनाजी चव्हाण जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

**सांगोला, दि. १९ जुलै-**

सूर्योदय परिवार, सांगोला आयोजित अहिल्यादेवी होळकर सभागृहात ज्येष्ठ नागरिक स्नेहमेळाव्यात सुर्योदय ग्रुपचे अनिल इंगवले, प्रमुख पाहुणे डॉ.मच्छिंद्र सोनलकर यांचे हस्ते व सुभाष लऊळकर, आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सूर्योदय ग्रुपचे सुभाष दिघे, डॉ.बंडोपंत लवटे, जगन्नाथ भगत यांच्या उपस्थितीत प्रा.धनाजी चव्हाण यांना जीवन गौरव पुरस्काराने सहकुटुंब सन्मानित करण्यात आले. प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या मार्गदर्शनाखाली लायन्स क्लब, महाराष्ट्र साहित्य परिषद व सांगोला विद्यामंदिर येथील सामाजिक, साहित्यिक व शैक्षणिक कार्य प्रमाण मानून प्रा.चव्हाण यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यापूर्वी प्रा.चव्हाण यांचा तालुका, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर पुरस्काराने सन्मान झाला आहे. या यशाबद्दल सां. ता.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासो नरूटे यांनी प्रा.धनाजी चव्हाण यांचे अभिनंदन केले.



### श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाने प्रसन्न वाटले : न्यायमूर्ती स्वप्ना जोशी

**अक्कलकोट, दि. १९ जुलै-**

मुंबईमध्ये श्री स्वामी समर्थांचे अनेक भक्त आहेत. स्वामी भक्तीतूनच दृढ निश्चय करून अक्कलकोटला येण्याचे ध्येय बाळगून श्री स्वामी समर्थांचे आज दर्शन घेतले आहे. आजच्या या श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाने मन खूप प्रसन्न झाले आहे. मंदिर समितीच्या वतीने समितीचे प्रमुख महेश इंगळे यांनी अगत्यपूर्वक श्री स्वामी समर्थांचे दर्शन घडविल्याबद्दल आपण श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे आभारी असल्याचे मनोगत मुंबई येथील मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य स्वप्ना जोशी यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी न्यायमूर्ती स्वप्ना जोशी व कुटूंबियांचा सन्मान केला. यावेळी न्यायमूर्ती स्वप्ना जोशी बोलत होत्या. याप्रसंगी प्रथमेश इंगळे, अक्कलकोटचे न्यायाधीश एम.एम.कल्याणकर, न्यायाधीश एन. ए. एल.शेख, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, स्वप्नील मोरे, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ, विपुल जाधव, महेश मस्कले उपस्थित होते.



### माजी विद्यार्थ्यांकडून ढोराळे येथील प्रशालेस वॉटर फिल्टर भेट

**वैराग, दि. १९ जुलै-**

ढोराळे येथील कै. शहाजीराव काकडे प्रशालेतील २०१५-१६ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच पार पडला. तब्बल १० वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांनी एकत्रित येत शाळेविषयी आत्मीयता दर्शवत शाळेला २० हजार किंमतीचा पाणी फिल्टर भेट देऊन विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. कै. शहाजीराव काकडे प्रशाला ढोराळे (ता .बार्शी) येथील सन २०१५ मध्ये दहावी मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांनी एकत्र येत विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन केले होते. ज्या शाळेमुळे आपण घडलो त्या शाळेचे आपण काहीतरी देणे लागतो या उदात्त हेतूने विद्यार्थ्यांनी शाळेसाठी विद्यार्थ्यांना पाणी पिण्यासाठी पाण्याचा फिल्टर भेट दिला. शालेय जीवनात आपल्याला आलेले अनुभव, जुन्या आठवणी व्यक्त करीत शाळेविषयी आत्मियता व्यक्त केली. तसेच शिक्षकांनी या सर्व माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सुनील कोळी हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून बाळासाहेब मस्के उपस्थित होते. यावेळी शिक्षक सर्जेराव हजारे, रामेश्वर मस्के, दिनेश शेंडगे, भगवान सातपुते, लहू शिंदे, सत्यवान राजगुरू उपस्थित होते.

### महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १९ जुलै-**

पैशाच्या व्यवहारातून झालेल्या तक्रारीनंतर महिलेने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार शुक्रवारी मोडनिंब (ता. माढा) येथे घडला. सरिता अमोल कडगावकर (वय २५, रा. मोडनिंब) असे महिलेचे नाव आहे. सरिताने पैशाच्या कारणावरून रागाने साडीच्या सहाय्याने पंख्याला गळफास घेण्याचा प्रयत्न केला. नातेवाईकांना समजताच त्यांनी सरिताची गळफासातून सोडवणूक केली. त्यानंतर पती अमोल यानी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# अरण येथील बेपत्ता मुलाचा मृतदेह कॅनॉलमध्ये सापडला

- पोलिस, फॉरेन्सिक टीम, श्वानपथकाचा तपास सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १९ जुलै-**

अरण (ता. माढा) येथून मंगळवार (दि. १५) पासून बेपत्ता असलेला अल्पवयीन मुलगा आज दि.१९ जुलै रोजी सकाळच्या सुमारास जाधववाडी हद्दीतील कोरड्या कॅनॉलमध्ये मृत अवस्थेत आढळून आला. तीन दिवसांपासून बेपत्ता असलेला कार्तिक बळीराम खंडाळे (रा. अरण) याचा मृतदेह छिन्नविच्छिन्न अवस्थेत सकाळी आढळून आला.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. अरण येथील कार्तिक बळीराम खंडाळे १५ जुलैपासून बेपत्ता होता. कार्तिक मंगळवारी (दि. १५) सायंकाळी ६ वाजता गावातील जत्रेत जातो असे सांगून घरातून बाहेर पडला. शाळेच्या मैदानावर बराच वेळ तो खेळत असल्याचे सीसीटीव्हीमध्ये दिसत आहे. याप्रकरणी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून मुलाला पळवून नेल्याचा संशय असल्याची तक्रार मुलाच्या वडिलांनी टेंभुर्णी पोलिसात दिली होती. याबाबत अज्ञातावर गुन्हा दाखल केला होता.


कार्तिक खंडाळे

टेंभुर्णी पोलिसात तक्रार प्राप्त होतास पोलिस निरीक्षक नारायण पवार व सहायक पोलिस निरीक्षक गिरीश जोग यांच्या पथकाने रात्री अकरा वाजल्यापासून ते पहाटे तीन वाजेपर्यंत त्याचा अरण व आसपासच्या परिसरात शोध घेतला. त्या भागातील सीसीटीव्ही तपासले. परंतु त्याचा शोध लागला नाही. सकाळी जाधववाडी हद्दीतील कोरड्या कॅनलमध्ये त्यांचा मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी तातडीने टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक नारायण पवार व कर्मचारी दाखल झाले, श्वान पथक व फॉरेन्सिक टीमच्या मदतीने तपास सुरु करण्यात आला. ओळख पटवून पुढील वैद्यकीय तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे. हा घातपात असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. याप्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस यंत्रणा कार्तिकला शोधण्यास अपयशी ठरली आहे. अशी चर्चा ग्रामस्थांमधून होत आहे

> पाच पथकांची नेमणूक करण्यात आली होती. पण शनिवार दि.१९ रोजी सकाळी एका नागरिकाने सांगितले की, येथे एक मृत व्यक्ती असल्याचे दिसत आहे. तेथे पोलीस व कार्तिकचे नातेवाईक तेथे आले व ती बॉडी कार्तिक खंडाळे ची असल्याचे त्याच्या नातेवाईकांनी ओळखले. या ठिकाणी फॉरेन्सिक टीम, एनसीबी टीम व श्वान पथक बोलावण्यात आले असून सर्व बाजूने याचा तपासा सुरु आहे. शवविच्छेदनाचा रिपोर्ट आल्यावरती त्याच्या बाबत काय घडले. ते समजेल व पुढील तपास त्याप्रमाणे करू. घटना स्थळावरून दोन चाकू, दोन हात मोजे व एक दगड हे घटनास्थळी मिळून आलेले असून ते पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत.
>
> – **नारायण पवार,** पोलिस निरीक्षक, टेंभुर्णी पोलीस ठाणे

> फॉरेन्सिक तपासणी ही ऑन कॅमेरा व्हावी लवकरात लवकर काही तांत्रिक गोष्टी तपासून कमीत कमी वेळेमध्ये आम्हाला योग्य न्याय मिळावा. पोलिसांच्या दिरंगाईमुळे हा प्रसंग आमच्यावर ओढवलेला आहे. तसेच यापुढील तपासामध्ये त्यांनी दिरंगाई केल्यास रस्तारोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.
>
> – **धनंजय खंडाळे,** कार्तिकचे चुलते

## यशस्वी पीक, फळबागांसाठी पाणी खत व्यवस्थापन महत्त्वाचे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ जुलै -**



ऊस पिकासह द्राक्ष, डाळिंब व केळी या फळबागांत अन्न, पाणी आणि खत व्यवस्थापन महत्वाचे आहे. सध्याच्या काळात सेंद्रिय खताचा वापर कमी झाला असून, त्याचा जास्तीत जास्त वापर करणे गरजेचे आहे. सेंद्रिय खत मातीची संरचना व सेंद्रिय कर्ब सुधारण्याचे काम करतो मातीचे, जमिनीचे आरोग्य उत्तम ठेवले की मानवाचेही आरोग्य उत्तम राहते, असे प्रतिपादन दयाल ग्रुपचे पश्चिम महाराष्ट्र एरिया मॅनेजर महेंद्र पाटील यांनी पापरी (ता. मोहोळ) येथे केले.

पापरी येथे दयाल फर्टिलायझर व किसान अॅग्रो सर्व्हिसेस यांच्या विद्यमाने मंगळवारी रात्री शेतकरी चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यात पाटील उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत होते. ऊस, डाळिंब, केळी द्राक्ष या पिकांवरील समस्या, कीड रोग, अन्न, पाणी व खत व्यवस्थापन यावर आधारित चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

पोटॅश, फॉस्फेटयुक्त खते ही इस्राइलसारख्या आखाती देशातून येतात, आखाती देशांत सध्या युद्धजन्य परिस्थिती असल्याने खतांच्या, फवारणी औषधांच्या किमती वाढल्या असल्याचे पाटील यांनी शेतकरी वर्गाने खतांच्या औषधांच्या किमती का वाढू लागल्या आहेत? असे विचारताच स्पष्ट केले. या चर्चासत्रात प्रयोगशील शेतकरी समाधान भोसले, अजित भोसले, राजाभाऊ शेळके, सचिन भोसले, विक्रम टेकळे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

जमिनीचे आरोग्य उत्तम अतिरिक्त खर्चाची बचत शेतकऱ्यांना अधिक मार्गदर्शन करताना महेंद्र पाटील म्हणाले, जमिनीचे आरोग्य जपले तरच पीक, फळबाग जोमात येऊन अपेक्षित उत्पन्न प्राप्त होते. वेळोवेळी माती-पाणी परीक्षण करणे गरजेचे आहे, त्यावरूनच आवश्यक असलेल्या खतांच्या मात्रा पिकास मिळत अनावश्यक खते व त्यावर होणारा अतिरिक्त खर्च वाचला जाईल, शेतीत बचत हेच प्रॉफिट असते.



## सोलापूरला खंडपीठ होण्यासाठी आंदोलन, कायदेशीर लढा उभारणार

- राजकीय पाठपुरावा करण्याचाही ठराव मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ जुलै -**

सोलापूरला खंडपीठ होण्यासाठी सर्व प्रकारचे आंदोलन, कायदेशीर लढा आणि राजकीय पाठपुरावा करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.सोलापूरमध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे स्वतंत्र खंडपीठ स्थापन करण्याच्या प्रलंबित मागणीसाठी तातडीची सर्वसाधारण सभा शुक्रवारी बार असोसिएशनच्या हॉलमध्ये झाली. त्यावेळी विविध ठराव मंजूर करण्यात आले. यावेळी शहर व जिल्ह्यातील वकिल उपस्थित होती.

या सभेत सर्वसमावेशक भूमिका ठरली. सोलापूरला खंडपीठ मिळवण्यासाठी आंदोलन, राजकीय पाठपुराव्याचा ठराव मंजूर करण्यात आला. सभेत बार असोसिएशनचे अध्यक्ष बाबासाहेब जाधव म्हणाले, सोलापूरचे भौगोलिक स्थान, जिल्ह्यातील दीड लाख प्रलंबित खटले आणि नागरिकांच्या न्यायाची प्रतीक्षा लक्षात घेता खंडपीठ होणे ही गरज आहे. उपाध्यक्ष अॅड. रियाज शेख यांनी खंडपीठ मिळवण्यासाठी आक्रमक पद्धती अवलंबली जाईल. आम्ही सर्व काही करून ही मागणी मूर्त स्वरूपात आणू असे सांगितले. महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलचे सदस्य अॅड. मिलिंद थोबडे म्हणाले, यापूर्वीच्या प्रयत्नांना गती देऊन, राज्यस्तरीय न्यायिक संस्थांसमोर सोलापूरची बाजू मजबूतपणे मांडली जाईल. तर अॅड. शिवशंकर घोडके म्हणाले, खंडपीठामुळे नागरिकांपासून ते नवोदित वकिलांपर्यंत सर्वांना लवकर न्याय मिळेल आणि खटल्यांचा ओघ कमी होईल. यावेळी ज्येष्ठ वकील बापूसाहेब



देशमुख, निलेश ठोकडे, मंगला जोशी चिंचोळकर, एच.एम. अंकलगी, राजन दीक्षित, मळसिद्ध देशमुख, व्ही. सी. दरगड, पी.ए. कुलकर्णी, संजीव सदाफुले यांनी एकमताने खंडपीठाच्या मागणीला पाठिंबा दर्शविला. यावेळी अध्यक्ष जाधव यांच्या प्रस्तावानुसार वकिलांच्या नेतृत्वाखाली एक कृती समिती स्थापन करण्यात आली. या समितीचे कार्य खंडपीठासाठी ठोस पावले उचलणे, शासनाशी संवाद साधणे आणि आंदोलनांची रणनीती तयार करणे हे असणार आहे. ही कृती समिती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, कायदामंत्री आणि उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांची भेट घेऊन मागणी सादर करेल. शहर आणि ग्रामीण भागात सभा, मोर्चे आणि जाहीरनाम्यांद्वारे समाजाचा पाठिंबा मिळविण्याचे काम करेल. सर्व पक्षांच्या नेत्यांना एकत्र आणण्यासाठी बहुपक्षीय बैठका घेण्यात येतील. सभेचे सूत्रसंचालन सचिव अॅड. बसवराज हिंगमिरे यांनी केले तर आभार खजिनदार अॅड. अरविंद देडे यांनी मानले.

### पायी चालत जाताना सापाचा दंश

**सोलापूर, दि. १९ जुलै -**

उत्तर सोलापूर तालुक्यातील कुमठे येथील परिसरातून बॉम्बे पार्ककडे पायी चालत जाताना लक्ष्मीमंदिराजवळ तरुणाला सापाने दंश केला. गौरीशंकर सिध्दाराम येडगे (वय ३३, रा. औराद ता. द. सोलापूर) असे सर्पदंश झालेल्या तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी रात्री ७.३० च्या सुमारास गौरीशंकर हा कुमठे येथील सुरवसे यांच्या शेतातून बॉम्बे पार्क येथे पायी जात होता. तो यादरम्यान असलेल्या लक्ष्मी मंदिराजवळ आल्यानंतर त्याच्या उजव्या पायाला सापाने दंश केला. यानंतर तो रात्री रुग्णालयात उपचारास दाखल झाला.

## १७ वर्षांपासूनचा प्रलंबित प्रश्न सीईओंनी काढला निकाली

### झेडपीच्या ४४ कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

जिल्हा परिषदेच्या ४४ कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्यात आली आहे. गेल्या १७ ते १९ वर्षांपासून प्रलंबित याप्रश्नी कर्मचाऱ्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. याबाबत राज्य सरकारच्या ग्रामविकास विभागाचे मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी याबाबतचा आदेश काढला आहे. तसेच सुमारे दोन कोटी रुपये कर्मचाऱ्यांना देण्याची प्रक्रिया सुरू आहे.



अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या पाच वर्षांतील गोपनीय अहवालाच्या प्रतवारीनुसार आगाऊ वेतनवाढ देण्याचा राज्य सरकारचा निर्णय आहे. मात्र, सोलापूर जिल्हा परिषदेकडील सहायक प्रशासन अधिकारी, सहाय्यक लेखा अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, विस्तार अधिकारी पंचायत, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक, वाहनचालक व परिचर असे ४४ कर्मचाऱ्यांना १ ऑक्टोबर २००६, २००७ व २००८ पासून आगाऊ वेतनवाढ मिळाली नव्हती. याविरोधात कर्मचारी मुंबई उच्च न्यायालयात गेले होते. त्यावर चार जुलै २०२२ रोजी उच्च न्यायालयाने आगाऊ वेतनवाढ देण्याचा आदेश दिला होता. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने राज्य सरकारकडे मार्गदर्शन मागितले होते. वेतनवाढ न मिळाल्याने कर्मचाऱ्यांनी अवमान याचिका दाखल केली होती. राज्य सरकारच्या ग्रामविकास विभागाने आठ जुलै रोजी न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेला दिली. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी त्या ४४ कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करून आगाऊ वेतनवाढ देण्याचा आदेश काढला आहे.



> **कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण**
>
> गेल्या १७ ते १९ वर्षांपासून प्रलंबित असणाऱ्या आगाऊ वेतनवाढीचा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी मंगळवारी आदेश काढल्याने कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाल्याचे पाहायला मिळते आहे.

### गरम तेलाच्या कढईवर पडून बालक जखमी

**सोलापूर, दि. १९ जुलै -**

घरात खेळत असताना अचानक तोल जाऊन गरम तेलाच्या कढईवर पडल्याने हाताला आणि छातीला भाजल्याने पाच वर्षाचा बालक भाजून जखमी झाला. हा प्रकार धाराशिव येथे घडला. मुलास वडील राजकुमार यांनी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केल्यानंतर उपचार सुरु आहेत. शिवम राजकुमार भोसले (वय ५.५ वर्ष, रा. धाराशिव) असे बालकाचे नाव आहे. शिवम गरम तेलाच्या कढईवर पडला. यात त्याच्या उजव्या हाताला व छातीला भाजले. नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## मंगळवेढ्यातील नूतन ग्रा.पं. कार्यालय बांधकामासाठी ७५ लाखांचा निधी

- आमदार समाधान आवताडे यांच्या प्रयत्नांना यश
- प्रशासकीय भवनांच्या वैभवात मोठी भर पडणार

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १९ जुलै**

आ. समाधान आवताडे यांच्या प्रयत्नांतून पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान अंतर्गत सन २०२५-२६ या वार्षिक आराखड्यानुसार मतदारसंघामध्ये नूतन ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यासाठी ७५ लाख निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार जनसंपर्क कार्यालय मंगळवेढा यांच्याकडून देण्यात आली आहे. सदर निधीतून मंगळवेढा तालुक्यातील नंदेश्वर, हुलजंती व निंबोणी या तीन गावांना नवीन ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यासाठी प्रत्येकी २५ लाख निधी मंजूर आहे.



गाव-खेड्यातील स्थानिक नागरिकांच्या विकासाचे आणि शासकीय कामकाजाचे मुख प्रशासकीय भवन म्हणजे ग्रामपंचायत कार्यालय असते. गावातील मूलभूत आणि पायाभूत सोयी-सुविधांची पूर्तता होण्यासाठी नागरिकांना विश्वासात घेऊन नियोजित ग्रामपंचायत कार्यालयाचा गुणात्मक आणि दर्जात्मक बांधकाम आराखडा तयार होऊन प्रशस्त व सुसज्ज ग्रामपंचायत भवन उभारणीसाठी मोठी या निधीमुळे मोठे अर्थसहाय्य मिळणार आहे.

ग्रामपंचायत संस्थांच्या तांत्रिक व कागदपत्रे समस्या आणि इतर अडी-अडचणी अनुषंगाने संबंधित गावातील ग्रामसेवक व इतर ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी सदर बांधकामा संदर्भात आवश्यक कागदपत्रे व इतर बाबींची लवकरात लवकर आमदार जनसंपर्क कार्यालय मंगळवेढा यांच्याकडे पूर्तता करावी असेही सांगण्यात आले आहे.

> आमच्या नंदेश्वर व इतर दोन गावांमध्ये नवीन ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यासाठी मंजूर झालेल्या वरील भरीव निधीमुळे गावगाड्यातील नागरिकांचे प्रशासन केंद्र असलेल्या ग्रामपंचायत कार्यालयांचे देखणं रूप ग्रामपंचायत कारभारात मोठी क्रांती घडवून आणणार आहे. आमदार समाधान आवताडे यांनी ठेवलेल्या विकासात्मक दृष्टिकोनामुळे मतदार संघात अक्षरशः निधीचा पाऊस पडत आहे.
>
> – **दत्तात्रय साबणे,** सामाजिक कार्यकर्ते, नंदेश्वर